नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक २७१ * * नागपूर * | गुरुवार, दिनांक १ जानेवारी २०२६ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## नाशिक - अक्कलकोट कॉरिडोरला मंजुरी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३१ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज देशातील पायाभूत सुविधांना गती देणाऱ्या २ प्रमुख महामार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली. सुमारे २० हजार ६६८ कोटी रुपयांच्या या प्रकल्पांत महाराष्ट्रातील नाशिक - सोलापूर - अक्कलकोट या ३७४ किलोमीटरच्या कॉरिडोरसह ओडिशातील २०६ किलोमीटर रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाचा समावेश आहे. नाशिक अक्कलकोट कॉरिडोर हा १९१४२ कोटींचा ग्रीनफिल्ड प्रकल्प आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने बीओटी तत्त्वावर (बांधा-वापरा-हस्तांतरित करा) या कॉरिडोरच्या बांधकामाला मंजुरी दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्र सरकारच्या या निर्णयाची माहिती दिली.

## नवे वर्ष शुभ फलदायी ठरो !




गतवर्षी १२ वाजून एक मिनिटांनी २०२५ ची सुरुवात झाली. डिसेंबरचा शेवटचा क्षण आणि जानेवारी एकचा पहिला क्षण या दोघांच्या मिलनाला आपण नवीन वर्षाची सुरुवात म्हणतो. पाश्चात्य लोक नव्या दिवसाची सुरुवात रात्री बारा वाजता करतात, म्हणजे ते अंधाराकडून उजेडाकडे जातात आपण उजेडाकडून व्हाया अंधार ते पुन्हा उजेडाकडे येतो. अंधार म्हणजे काटेकुटे, खाचखळगे आणि ओबड धोबडपणाचा रस्ता अशी संकल्पना आहे. पण नव्या प्रभातीच्या आशेने आपण नवीन वर्षाचे स्वागत करतो. आपले नवीन वर्ष खरे म्हटलं तर गुढीपाडव्याला सुरू होते. गुढीपाडवा ते गुढीपाडवा संवत्सर म्हणजे आपले वर्ष आहे. बरं आपल्या वर्षात कधीकधी १३ महिनेही असतात ते जाऊ द्या. सध्या आपण तसेही ५०% इंग्रजाळलेलोच आहोत. मराठीच्या शाळा ओस पडत आहेत. आज-काल बहुतेक मुलांच्या आया आपल्या बाळाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करत आहेत. या भव्य भव्य इमारतींच्या शाळा पाहिल्यावर डोळे दिपून जातात. त्यांचा शिक्षणासाठीचा खर्च ज्याला आपण फी म्हणतो तो वर्षाला सहा आकड्यांमध्ये असतो. कोणे एकेकाळी या देशांमध्ये सामान्यांसाठी शिक्षण मोफत होते, आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. पूर्वीच्या काळी गरीब आणि श्रीमंत एकाच वर्गात आणि एकाच शाळेत शिकत असत. तेव्हा महिन्याला चार ते आठ आणे देणारा श्रीमंत समजला जाई. त्यावेळी शिक्षणात तरी कुठलाही भेदभाव नव्हता कारण त्याकाळी शिक्षक तळमळीने शिकवित असत. संपूर्ण अभ्यासक्रम ज्याला हल्ली आपण सिलॅबस म्हणतो तो अपूर्ण राहिला असेल. तर तेव्हाचे शिक्षक शाळा सुटल्यावरही आपला ज्यादा वेळ देऊन विद्यार्थ्यांना शिकवणे, हे आपले कर्तव्य आहे या भावनेतून शिकवीत असत. तेव्हाचे शिक्षक हे गुरुजी होते ते सरस्वतीचे उपासक होते, काही तसेच चांगले अपवाद सोडून आत्ताचे शिक्षक लक्ष्मी देवीची आराधना करतात. शाळेत भरमसाठ पगार मिळत असला तरी काही अपवाद सोडता सरकारी शाळा आता शिक्षणाचे केंद्र आहे असे वाटत नाही. हल्ली शिक्षकांनाही विविध कामे दिली जातात त्यामध्ये आपल्या गावात किती कुत्रे आहेत यांची गणती करण्याचे कामही दिल्याचे आम्ही ऐकलेले आहे. मतदानासाठी नाव नोंदणी करणे, गणना करणे वगैरे सारखी कितीतरी कामे सरकारी शाळांच्या शिक्षकांना करावी लागतात. खाजगी शाळांची परिस्थिती वेगळी आहे, शिक्षणाच्या नियमित राशी शिवाय इमारतीच्या बांधकामा पासून स्वच्छतागृहापर्यंत आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या नावाने वर्षभर वसुली चालूच असते. खरे पाहिले तर प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे पण आपली सर्व सरकारे याबाबतीत डोळे उघडे ठेवून झोपलेली दिसतात. त्यांचे कानही त्यांना जे ऐकायचे असते तेवढेच ऐकतात. आपले हे वर्ष तर संपले, संपणारे वर्ष आणि नवीन वर्ष यांच्या संधी काळात मोठ्या प्रमाणावर मानसिक सौख्यासाठी रात्रभर भिन्नभिन्न प्रकारचा उत्सव सुरू असतो. या उत्सवाच्या सुवासाने अनेक घटना आणि दुर्घटनाही घडतात पण आजच्या शुभ संधी काळात त्याची चर्चा न करता चांगल्याची चर्चा करूया. 'जुने जाउद्या मरणा लागूनि' असे न म्हणता 'जुने ठेवूया स्मरणासाठी, नववर्षात शुभ वर्तमानाच्या बांधू गाठी' इतकेच आपण म्हणूया. पुढील वर्षी नवनवीन शोधांद्वारे नव्यानव्या संधी प्रकाशात भाग्योदयाची नवी संधी शोधूया आणि इंग्रजाळलेल्या नववर्षाचेस्वागत करूया!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# जगभरात नवीन वर्षाचा जल्लोष!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. ३१ :
संपूर्ण विश्वात नूतन वर्षाचा जल्लोष करण्यात आला. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलियानेही नवीन वर्षाचे स्वागत केले आहे. सिडनी हार्बर येथे पारंपारिक आतषबाजी पाहण्यासाठी हजारो लोक जमले होते. सात मिनिटांच्या आतषबाजीने मेलबर्नचे आकाश उजळून निघाले.






न्यूझीलंडमधील ऑकलंड हे २०२६ वर्षाचे स्वागत करणारे जगातील पहिले मोठे शहर बनले. जगाच्या पूर्वेकडील भागात स्थित, न्यूझीलंडने प्रथम नवीन वर्ष साजरे केले. देशातील सर्वात उंच स्काय टॉवरवर हजारो लोकांनी आनंदोत्सव साजरा केला आणि आतषबाजी केली.

जगभरातील वेगवेगळ्या टाइम झोनमुळे, २९ देश भारतापूर्वी नवीन वर्षाचे स्वागत करतात. यामध्ये किरिबाटी, सामोआ आणि टोंगा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पापुआ न्यू गिनी, म्यानमार, जपान, इंडोनेशिया, बांगलादेश आणि नेपाळ यांचा समावेश आहे.

ऑस्ट्रेलियाच्या सिडनीत हार्बर ब्रिजवर आतषबाजीसह नव्या वर्षाचे स्वागत करण्यात आले.

भारतभर सर्वत्र नवीन वर्षाचे धडाक्यात स्वागत करण्यात आले. नववर्षानिमित्त शहरांसह ग्रामीण भागातही तरूणाईमध्ये उत्साह दिसून आला. भारतात पर्यटक म्हणून आलेल्या विदेशी नागरिकांनी आग्रा येथे ताजमहाल समोर नूतन वर्षाचे स्वागत केले. नववर्षानिमित्त हॉटेल, पब्ज गर्दीने फुलून गेले होते.

## न्यूरोसर्जन डॉ. पाखमोडे यांचे आकस्मिक निधन

### वैद्यकीय क्षेत्राला मोठा धक्का

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :
नागपूरमधील वैद्यकीय क्षेत्रात डॉ. चंद्रशेखर पाखमोडे (वय ५०) यांच्या अकस्मात निधनाने शोककळा पसरली आहे. धंतोली येथील न्यूरॉन हॉस्पिटलशी घनिष्ठ नातं असलेले डॉ. पाखमोडे, हे प्रख्यात न्यूरोसर्जन व न्युरॉलॉजिस्ट होते. बुधवार, ३१ डिसेंबरच्या पहाटे, हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला.



डॉ. पाखमोडे यांना पहाटे अचानक हृदयविकाराचा झटका आला. सुमारे ४.३० ते ६.०० वाजेपर्यंत नागपूरमधील वरिष्ठ कार्डिओलॉजिस्ट व डॉक्टर्स यांनी तातडीने उपचार सुरु केले आणि सीपीआरचा वापर करून प्राण वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. वैद्यकीय क्षेत्रात डॉ. पाखमोडे यांना त्यांच्या क्लिनिकल कौशल्य आणि रुग्णसेवेतील समर्पणासाठी मोठा सन्मान होता. मध्य भारतातील न्युरोलॉजी आणि न्यूरोसर्जरी क्षेत्रातील प्रगत सेवांना घडवून आणण्यास मोलाचा वाटा उचलला होता. त्यांच्या अकस्मात निधनाने नागपूरच्या आरोग्य व्यवस्थेतच मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

नागपूरमध्ये डॉक्टर्स, रुग्ण आणि शुभेच्छुकांकडून त्यांच्यासाठी शोकसंवेदना व्यक्त होत आहेत. डॉ. पाखमोडे यांचे कौशल्यपूर्ण शस्त्रक्रियेतील योगदान आणि रुग्णसेवेतील आदर्श, पुढील वर्षांपर्यंत स्मरणात राहणार आहे.

## अंबादेवी संस्थानाला चिखलदऱ्यात मोठी जमीन मंजूर

**राज्य मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय**

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.३१ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अमरावती जिल्ह्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.


महसूल विभागाशी संबंधित या एकमेव निर्णयानुसार, अमरावती येथील श्री अंबादेवी संस्थानास चिखलदरा तालुक्यातील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची, एमटीडीसीची ३ एकर ८ आर जमीन देण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पर्यटन आणि देवस्थान विकासाला चालना मिळणार असल्याचे मानले जाते.

चिखलदरा येथील ही जमीन मूळतः १९७५ साली पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उभारण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला देण्यात आली होती. मात्र, अनेक दशकांनंतरही सुमारे साडे सात एकर क्षेत्रातील ही जमीन वापरात न आल्याने ती पडून होती. शासनाच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर या जमिनीचा उपयुक्त वापर व्हावा, यासाठी पर्यायी मार्ग शोधण्यात येत होता. त्याच पार्श्वभूमीवर हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

अमरावतीच्या श्री अंबादेवी संस्थानाकडे चिखलदरा येथील देवी पॉईंट आणि विराट देवी देवस्थान यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या दोन्ही देवस्थानांचा विकास, सुविधा विस्तार आणि भाविकांसाठी आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थानाने शासनाकडे जमिनीची मागणी केली होती.

## उमेदवारी नाकारल्यावरून धिंगाणा सुरूच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :
उमेदवारी नाकारल्या गेलेल्या संतप्त कार्यकर्त्यांचा धिंगाणा दुसऱ्या दिवशीही सुरूच होता. छ. संभाजीनगरमध्ये कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला काळे फासून निषेध नोंदवला, तर डॉ. भागवत कराड यांची गाडी आंदोलकांनी रोखून धरली.




## सदानंद दाते नवे डीजीपी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.३१ :
महाराष्ट्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे, वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि माजी एनआयए प्रमुख सदानंद दाते यांची महाराष्ट्राच्या डीजीपी म्हणून नियुक्ती केली आहे.



दाते हे महाराष्ट्राच्या डीजीपी रश्मी शुक्ला यांची जागा घेणार आहेत. १९९० च्या बॅचचे आयपीएस अधिकारी सदानंद दाते यांना त्यांच्या मूळ कॅडरमध्ये परतण्याची केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. त्यांनी यापूर्वी विविध शाखेत काम केले आहे.

## संजय राऊतांच्या घराबाहेर 'बॉम्ब'ची धमकी!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.३१ :
मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत सक्रिय असलेले शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



आज सकाळी भांडुप येथील त्यांच्या निवासस्थानाबाहेर उभ्या असलेल्या एका गाडीवर बॉम्ब से उडा दुंगा असे लिहिलेले आढळून आले. मुंबई पोलिसांचे बॉम्ब शोधक आणि नाशक पथक संजय राऊत यांच्या घरी दाखल झाले.


















# राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा हार्ट अटॅकने मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३१ :
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मीरा - भाईंदर येथील एका उमेदवाराचा निवडणुकीच्या धावपळीत हार्ट अटॅकमुळे मृत्यू झाल्याची दुःखद घटना घडली आहे. यामुळे मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, नागपुरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने आईला मुखाग्नि देणाऱ्या एका उमेदवाराला स्मशानभूमीतच पक्षाचा एबी फॉर्म दिल्याची घटना घडली आहे. या घटनेची राज्याच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

महाराष्ट्रात सध्या मुंबईसह 29 महापालिकांच्या निवडणुकांचा फड रंगला आहे. यासाठी मंगळवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. त्यासाठी सर्वच उमेदवाराची चांगलीच दमछाक झाली. मीरा भाईंदर येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार जावेद पठाण (66) यांनी मंगळवारी सकाळी प्रभाग क्रमांक 22 मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर दुपारी 3.30 च्या सुमारास शहरातील हैदरी चौक परिसरात त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तत्काळ उपचारासाठी लगतच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण तोपर्यंत खूप उशीर झाला. डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

**अजित पवारांनी व्यक्त केले दुःख**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जावेद पठाण यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले, मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 साठीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार जावेद पठाण यांचं आकस्मिक दुःखद निधन झालं. जनसेवेचं ध्येय मनी बाळगणाऱ्या आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस परिवारातील सदस्याचं असं निघून जाणं मनाला चटका लावून जाणारी बाब आहे. मात्र काळाच्या पुढे कोणाचं काही चालत नाही. हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

### कल्याण-डोंबिवलीत भाजपने विजयाचे खाते उघडले
## रेखा चौधरी यांची बिनविरोध निवड निश्चित



■ महासागर प्रतिनिधी
कल्याण, दि. ३१ :
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या प्रत्यक्ष मतदानापूर्वीच भाजपने विजयाचे खाते उघडत मोठी बाजी मारली आहे. प्रभाग क्रमांक 18 (अ) मधून भाजपच्या उमेदवार रेखा राजन चौधरी यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला असून, या विजयामुळे भाजप गोटात उत्साहाचे वातावरण आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला या आरक्षित जागेसाठी विहित मुदतीत केवळ रेखा चौधरी यांचाच एकमेव अर्ज दाखल झाला असून, इतर कोणत्याही पक्षाने किंवा अपक्ष उमेदवाराने येथून अर्ज भरलेला नाही. परिणामी, या प्रभागात निवडणूक न होताच भाजपने आपला पहिला विजय नोंदवला असून, अधिकृत घोषणेनंतर रेखा चौधरी या महापालिकेच्या पहिल्या बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेविका ठरतील.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदानापूर्वीच भाजपने विजयाचा श्रीगणेशा केला असून, प्रभाग क्रमांक 18 (अ) मधून भाजपचे खाते उघडले आहे. या प्रभागातील 'नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला' या राखीव जागेसाठी विहित मुदतीत केवळ रेखा राजन चौधरी यांचाच एकमेव अर्ज दाखल झाल्याची अधिकृत माहिती निवडणूक अधिकारी वरुण कुमार सहारे यांनी दिली आहे.

इतर कोणत्याही पक्षाने किंवा अपक्ष उमेदवाराने अर्ज दाखल न केल्यामुळे रेखा चौधरी यांची बिनविरोध निवड आता निश्चित झाली असून, निकालाआधीच मिळालेल्या या मोठ्या यशाचे श्रेय भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नांना आणि निवडणूक नियोजनाला दिले जात आहे.

रेखा चौधरी या विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्या आहेत. रेखा चौधरी यांचा विजय हा हिंदुत्वाचा पहिला विजय असल्याची अधिकृत प्रतिक्रिया भाजपने दिली आहे. भाजपच्या कल्याण विभागाच्या महिला मोर्चाच्या चौधरी या जिल्हाध्यक्ष आहेत.

## मिक्सर हायवा व दुचाकीची धडक
## १ युवक ठार

■ महासागर प्रतिनिधी
बिडकीन, दि. ३१ :
मिक्सर हायवा आणि दुचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार युवक ठार झाला. दुचाकीवरील दुसरा युवक गंभीर जखमी झाला. ही दुर्घटना मंगळवारी (दि. ३०) सकाळी दुर्गा हायस्कूलसमोर घडली. यामध्ये विशाल भगवान राठोड (२२, रा. सहयोगनगर, बिडकीन) याचा मृत्यू झाला. सचिन जाधव (२१, रा. खंडाळे, ता. अहमदपूर) याच्या पायाला गंभीर दुखापत झाली.

मिक्सर हायवा (एमएच २०-ईजी ८०३३) बिडकीन येथून चित्तेगावकडे जात होता. दरम्यान, दुचाकी (एमएच २० जीएम ७९५७) यांच्यात धडक झाली. दुचाकीचा चक्काचूर झाला. घटना घडताच अनेक नागरिकांनी धाव घेऊन ॲम्ब्युलन्स बोलावली. जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. वेदपाठक यांनी विशाल राठोड यास मयत घोषित केले. जखमी सचिन जाधव यास प्रथमोपचार करून पुढील उपचारार्थ छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## पुण्यातील युतीचा निर्णय 'शिंदे-फडणवीस' घेतील



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३१ :
राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असली, तरी अनेक ठिकाणी शिवसेना आणि भाजप युतीबाबत कोणतेही चित्र स्पष्ट झालेले नाही. या पार्श्वभूमीवर पुण्यात निर्माण झालेला भाजप-शिवसेना युतीचा पेच आणि मुंबईच्या महापौराबाबत भाजप नेत्यांकडून होणारी विधाने यावर मंत्री उदय सामंत यांनी आज माध्यमांशी बोलताना पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट केली.

पुण्यामध्ये युती असल्याचे उदय सामंत काल म्हणाले होते. तर आम्ही अर्ज मागे घेणार नाही, असा आक्रमक पवित्रा रवींद्र धंगेकर यांनी घेतला आहे. यावर उदय सामंत यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, "धंगेकर हे पक्षाची भूमिका मांडणारी व्यक्त नाही. ते महानगरप्रमुख आहेत. काल मी एकनाथ शिंदे यांच्या निदेशाने पुण्यात गेलो होतो. त्यावेळी मी धंगेकर आणि नीलम गोरे यांच्याशी चर्चा केलेली आहे. फॉर्म ठेवायचा की नाही, यासंदभार्तील निर्णय एकनाथ शिंदे घेतील. धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार पक्षाने मला देखील दिलेले नाहीत. त्यामुळे पुण्याच्या संदर्भात आमची सगळ्यांची एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री फडणवीसांसोबत चर्चा होईल. त्यानंतर निर्णय होईल." उदय सामंत म्हणाले की, "मी काल पुण्यातही सांगितले की, युती तुटली ही एका महानगरपालिकेची बातमी महाराष्ट्रभर होऊन उपयोग नाही. आज आम्ही युती म्हणून सरकारमध्ये काम करतोय.

# मुर्तिजापूरचा कारभार नव्या पर्वात
### नगराध्यक्ष हर्षल साबळे यांचा भव्य पदग्रहण सोहळा आज



■ महासागर प्रतिनिधी,
मुर्तिजापूर, दि. ३१ :
शहराच्या राजकारणात आणि विकासाच्या प्रवासात नव्या पर्वाची सुरुवात होत असून, नवनिर्वाचित नगराध्यक्ष श्री. हर्षल रेखा रामेश्वर साबळे यांच्या पदग्रहणाचा भव्य आणि मंगलमय सोहळा गुरुवार, १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मुर्तिजापूर नगरपरिषद कार्यालय परिसरात पार पडणार आहे. शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या नव्या नेतृत्वाच्या शपथविधीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

या पदग्रहण सोहळ्यास खासदार मा. अनुप संजय धोत्रे, आमदार हरिष मारोतीआप्पा पिंपळे, आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार प्रकाशभारसाकळे तसेच संतोष शिवरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, विकासाच्या मुद्द्यावर सर्वांचे लक्ष केंद्रित होणार आहे. मुर्तिजापूर नगरपरिषद निवडणूक २०२५ मध्ये विजयी झालेले भाजपा, अपक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सर्व नगरसेवक व नगरसेविका या सोहळ्याचे साक्षीदार ठरणार आहेत. यामध्ये सचिन देशमुख, गजानन नाकट, राहुल गुल्हाने, शालिनी रामभाऊ हजारे, भूपेंद्र (बंटी) पिंपळे, लखन मिलांदे, रोहित अव्वलवार, प्रज्ञा निलेश वानखडे, सोनल मुकेश काळपांडे, सुप्रिया राम खंडारे, पंकज कांबे (भाजपा) यांच्यासह ममता कैलास महाजन, सारिका राहुल पाटील, शुभांगी संदीप सरनाईक, संदीप दौलतराव सरनाईक (अपक्ष) तसेच इब्राहिम घाणीवाला व पुनम रविंद्र मारकड (राष्ट्रवादी काँग्रेस) यांचा समावेश आहे.

भारतीय जनता पार्टी प्रणित विकास आघाडीच्या माध्यमातून शहराचा विकास वेगाने साधण्याचा संकल्प या सोहळ्यातून पुन्हा एकदा व्यक्त होणार आहे. नागरिकांच्या विश्वासावर सुरू होणारा हा प्रवास मुर्तिजापूरला प्रगतीपथावर नेणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी मुर्तिजापूर शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्मृती २०२५ च्या

## महाकुंभात ६६ कोटी लोकांनी बुडी मारली



■ वृत्तसंस्था, प्रयागराज, दि. ३१ :
वर्षाची सुरुवात महाकुंभाने झाली. 45 दिवसांच्या आयोजनात 66 कोटी लोकांनी डुबकी मारल्याचा दावा करण्यात आला. मात्र, मौनी अमावस्येच्या स्नानावेळी 28-29 जानेवारी रोजी कुंभ परिसरात चेंगराचेंगरी झाली. प्रशासनाने 30 लोकांच्या मृत्यूची पुष्टी केली, परंतु खरा आकडा यापेक्षा जास्त असू शकतो.

### दिल्लीत २७ वर्षांनंतर भाजपचे पुनरागमन



■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. ३१ :
दिल्ली विधानसभा निवडणुकीत 27 वर्षांनंतर भाजपचे सरकार स्थापन झाले. मागील निवडणुकीत 70 पैकी 62 जागा जिंकणारी आम आदमी पार्टी केवळ 22 जागांवर मर्यादित राहिली. भाजपला 48 जागा मिळाल्या, तर काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. विजयानंतर पंतप्रधान मोदींनी भाजप मुख्यालयात कार्यकर्त्यांसोबत जल्लोष केला.

## दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू



■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. ३१ :
नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर रात्री अंदाजे 09:30 वाजता चेंगराचेंगरी झाली, ज्यात 18 लोकांनी आपला जीव गमावला. कुंभमेळ्याला जाणारे भाविक आणि गाड्या उशिरा असल्याने प्लॅटफॉर्मवर सामान्य दिवसांपेक्षा जास्त गर्दी होती. प्राथमिक माहितीनुसार, ट्रेनचे प्लॅटफॉर्म बदलल्यामुळे चेंगराचेंगरी झाली. ऑगस्टमध्ये रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, एका व्यक्तीच्या डोक्यावरून एक जड पिशवी इतर लोकांवर पडली, त्यानंतर चेंगराचेंगरी झाली.




## मुस्कानने निळ्या ड्रममध्ये पतीचा मृतदेह लपवला

■ वृत्तसंस्था,
मेरठ, दि. ३१ :
लंडनमध्ये नोकरी करणाऱ्या पती सौरभची मुस्कानने बॉयफ्रेंड साहिलसोबत मिळून हत्या केली. त्याच्या मृतदेहाचे 4 तुकडे करून निळ्या ड्रममध्ये टाकून सिमेंट भरले. त्यानंतर दोघे शिमला फिरायला गेले. परत आल्यानंतर मुस्कानने तिच्या आईला सौरभच्या खुनाबद्दल सांगितले. कुटुंबाने मुस्कानला पोलिसांच्या स्वाधीन केले. सध्या मुस्कान आणि साहिल दोघेही तुरुंगात आहेत. मुस्कानने नोव्हेंबरमध्येच मुलीला जन्म दिला आहे.



## १२ वर्षांनंतर भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली



■ वृत्तसंस्था, दुबई, दि. ३१ :
भारताने न्यूझीलंडला 4 विकेट्सने हरवून 12 वर्षांनंतर चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले. कर्णधार रोहित शर्मा 'प्लेअर ऑफ द मॅच' ठरला. या स्पर्धेचे यजमान पाकिस्तान होते, परंतु भारताने तिथे जाण्यास नकार दिल्यानंतर भारतीय संघाचे सर्व सामने यूएईमध्ये खेळले गेले. भारताने स्पर्धेत एकही सामना गमावला नाही. प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीरचे हे पहिले आयसीसी स्पर्धेतील यश होते.

## ऑपरेशन सिंदूरमध्ये ९ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३१ :
पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, 7 मेच्या रात्री भारताने 9 दहशतवादी ठिकाणांवर हल्ला करून तळ नष्ट केले. यापैकी 5 PoK मध्ये आणि 4 पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात होते. यात जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय-मरकझ सुभानल्लाह आणि लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय- मरकझ तैयबा यांचाही समावेश आहे. दुसऱ्या दिवशी पाकिस्ताननेही भारतावर हवाई हल्ले केले आणि राफेल जेट पाडल्याचा दावा केला. 10 मे रोजी दोघांमध्ये युद्धविराम झाला.

## आरसीबीने पहिल्यांदा जिंकली आयपीएल

■ वृत्तसंस्था,
अहमदाबाद, दि.३१ :
रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने आयपीएल फायनलमध्ये 6 धावांनी विजय मिळवून, 18 वर्षांत पहिल्यांदाच ट्रॉफी जिंकली. विजयाची क्षण जवळ येताच, क्षेत्ररक्षण करत असलेले विराट कोहली रडू लागले. त्यांनी 35 चेंडूत 43 धावांची खेळी केली होती. विजयाच्या दुसऱ्या दिवशी बंगळूरच्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरी झाली, ज्यात 11 लोकांचा मृत्यू झाला.




## पहलगाम हल्ल्यात २६ ठार



■ वृत्तसंस्था, पहलगाम, दि.३१ :
बैसरन खोऱ्यात 4 दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार करून 26 पर्यटकांची हत्या केली. यामध्ये एक मृत नेव्हीचे लेफ्टनंट विनय नरवाल होते, ज्यांचे 7 दिवसांपूर्वीच लग्न झाले होते. दहशतवाद्यांनी पत्नीसमोरच त्यांना गोळ्या घातल्या. एनआयएनुसार हल्ल्याचा कट पाकिस्तानात रचण्यात आला होता. जुलैमध्ये भारताने 'ऑपरेशन महादेव' राबवून चारही दहशतवाद्यांना ठार केले.

## हिंसाचार सुरू झाल्यानंतर २ वर्षांनी मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांचा राजीनामा



■ वृत्तसंस्था,इंफाळ, दि.३१ :
मणिपूरमध्ये हिंसाचार सुरू झाल्यानंतर सुमारे 2 वर्षांनी मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी राजीनामा दिला. तेव्हापासून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू आहे. हिंसाचारात आतापर्यंत सुमारे 260 लोकांनी आपला जीव गमावला आहे. तर 70 हजारांहून अधिक लोकांना आपले घर सोडून जावे लागले. आता केंद्र सरकार आणि कुकी संघटनांनी शांततेसाठी करार केला आहे, त्यानंतर पंतप्रधान मोदींनीही प्रथमच राज्याला भेट दिली.

### अहमदाबाद विमान दुर्घटनेत २४१ लोकांचा मृत्यू



■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. ३१ :
एअर इंडियाचे अहमदाबादहून लंडनला जाणारे विमान टेक ऑफच्या 32 सेकंदांनंतरच क्रॅश झाले. यामध्ये असलेले 242 प्रवासी आणि क्रू मेंबर्सपैकी 241 जणांचा मृत्यू झाला. विमान सिव्हिल हॉस्पिटलच्या वसतिगृहावर आदळले. जे तांत्रिक बिघाडामुळे यापूर्वीही थांबवण्यात आले होते. प्राथमिक तपासात विमानाचे दोन्ही इंधन इंजिन बंद पडल्याने अपघात झाल्याचे सांगण्यात आले.

## दिव्या देशमुख पहिली भारतीय बुद्धिबळ विजेती



■ वृत्तसंस्था, बटुमी, दि. ३१
19 वर्षीय दिव्या देशमुख FIDE महिला विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली. तिने अंतिम फेरीत भारताच्याच कोनेरू हम्पीला टायब्रेकर फेरीत हरवले. यासाठी तिला 42 लाख रुपये मिळाले. यापूर्वी दिव्याने वर्ल्ड टीम रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ चॅम्पियनशिपमध्ये जगातील नंबर-1 बुद्धिबळपटू हाऊ यिफानलाही हरवले होते. यावर्षी तिला अर्जुन पुरस्कारासाठी नामांकन मिळाले.

# रस्त्याची दयनीय अवस्था



■ महासागर प्रतिनिधी, पुसद, दि. ३१:

पुसद ते गुंज पर्यंतच्या रस्त्याच्या मेंटेनन्स कडे ठेकेदारांकडून दुर्लक्ष होत आहे. अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सोबत गुंज ते सवना रस्ता पूर्णपणे खड्डेमुक्त झाला आहे. या खड्डेमुक्त रस्त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून उसाने भरलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होण्याच्या घटने दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे शेतकरी व ट्रॅक्टर मालक आर्थिक संकटात सापडला आहे.

गुंज ते महागाव पर्यंत १४ किलोमीटरचा रस्ता पूर्णतः खड्डेयुक्त झाला आहे. दिवस रात्र या रोडवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरु राहते. प्रवासादरम्यान सुसाट धावणाऱ्या वाहनामुळे मोठ्या प्रमाणात मातीची धूळ उडत आहे. यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सध्या उसाचा हंगाम सुरू असून शेतकरी साखर कारखान्यावर मोठ्या प्रमाणात ऊस घेऊन येत आहे.

गुंज गावाजवळ रस्त्याची डागडुजी सुरू आहे. परंतु ती डागडुजी थातूरमातूर होत आहे. डांबराचे अत्यल्प प्रमाणात वापरल्या जात असल्यामुळे टाकलेली गिट्टी पूर्णपणे बाजूला पसरत आहेत.त्या ठिकाणच्या रस्त्याची तात्पुरती पण तात्काळ डागडुजी करावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून सध्या जोर जोरात आहे.

शेतकरी आर्थिक अडचणीत गुंज गावाजवळ अनेक ठिकाणी भले मोठे खड्डे पडल्यामुळे ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होण्याच्या घटनात वाढ होत आहे. ट्रॅक्टर ट्रॉली पलटी झाल्यामुळे ते भरण्याकरिता मजूर लावल्याने दुप्पट खर्च वाढत आहे. यामुळे ऊस रस्त्यावर पसरत असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शेतकरी सुद्धा यामुळे आर्थिक संकटात सापडत आहे. येथे ट्रॅक्टर ट्रॉली पडण्याच्या घटना वाढत आहे.

# मुख्याधिकाऱ्यांना घेराव, गोंधळात सुनावणी

## अवाजवी कर वसुलीने नागरिकांकडून रोष व्यक्त

■ महासागर प्रतिनिधी, आर्णी, दि. ३१:



आर्णी नगर परिषदेकडून लावण्यात आलेल्या अवाजवी व अन्यायकारक करोविरोधात सोमवारी शहरात संतप्त जनआक्रोश उसळला. विविध करांच्या नावाखाली नागरिकांवर आर्थिक बोजा लादल्याचा आरोप करीत आर्णीकरांनी नगर परिषदेच्या मुख्याधिका?यांना घेराव घातला. यामुळे सुनावणीच्या ठिकाणी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

वृक्ष प्राधिकरण अस्तित्वात नसताना वृक्ष कराची वसुली का केली जात आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला. तसेच अग्निशमन प्राधिकरण नसतानाही नागरिकांकडून अग्निशमन कर आकारला जात असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. महाराष्ट्र शिक्षण कर नेमका किती टक्के घेतला जात आहे आणि त्याचा कायदेशीर आधार काय, याचे स्पष्ट उत्तर देण्याची मागणी करण्यात आली.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाकडून आक्षेप नोंदवणे व सुनावणीसाठी एक दिवसाची मुदतवाढ जाहीर करण्यात आली. मात्र या निर्णयानंतरही नागरिकांचा असंतोष कायम असून, नगर परिषदेच्या कारभाराविरोधात आंदोलनाची धार अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी माजी आरोग्य सभापती गणेश हिरोळे यांच्यासह प्रवीण मुनगिनवार, विठ्ठल देशमुख, दर्शन कोषटवार, अमोल मांगुळकर, विशाल देशमुख, अनिल बेलगमवार, अजय छल्लाणी, कांतीलाल कोठारी, भिकूसेठ पटेल, रवी नालमवार, जयंत डोल्हारकर, आबीद फानन, राजू बुटले,धरिवाला, आरिफ शेख, रब शेख, इरफान रजा, प्रीतेश भोगे, संदेश भगत, क्षितिज भगत उपस्थित होते.

मुख्याधिकाऱ्यांवर सरबत्ती दरम्यान, प्रशासकाला केवळ धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार असताना झोन बदलणे, भाडेमूल्य वाढविणे आणि त्याआधारे अवाजवी कर लादणे कितपत योग्य आहे, असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला. या सर्व मुद्द्यांवर मुख्याधिकाऱ्यांवर प्रश्नांचा भडीमार करण्यात आला. मात्र नागरिकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने वातावरण अधिकच तापले. अखेर सुनावणीच्या ठिकाणावरून मुख्याधिकाऱ्यांनी माघार घेतल्याचा आरोप नागरिकांनी केला

# हॉस्पिटलच्या बिलापेक्षा हेल्मेट स्वस्त

## हेल्मेट मॅन राघवेंद्र सिंग यांची शहरात जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१:



गाडीचा वेग आनंद देतो पण सुरक्षितता जीव वाचवते. हेल्मेट पोलिससांसाठी नसून ते तुमच्या कुटुंबासाठी आहे. एक अपघात तुमचे संपूर्ण आयुष्य बदलू शकतो. शिवाय हेल्मेट हे हॉस्पिटलच्या बिलापेक्षा खुप स्वस्त आहे. त्यामुळे दुचाकीवर प्रत्येकाने हेल्मेट वापरायलाच हवे असे प्रतिपादन हेल्मेट मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे राघवेंद्र सिंग यांनी केले.

स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन विंग्समध्ये मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, संस्थेचे अध्यक्ष अजाबराव वातिले, डॉ. शीतल वातिले, पवन वातिले, डॉ. प्रविण डाखोळे, डॉ. विजय भांबेरे, डॉ. राहुल बिजवार, सर्व विभाग प्रमुख, कार्यक्रम समन्वयक अमोल दूमणे, धनश्री पोहेरे,ओम अडपावार, दर्शना शंभरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

हेल्मेट मॅन ऑफ इंडिया राघवेंद्र कुमार यांनी विद्यार्थ्यांना हेल्मेटचे महत्व पटवून देताना सांगितले की तुम्ही विद्यार्थी हे भविष्याचे नागरिक आहात त्यामुळे लहानपणापासूनच रस्ते सुरक्षा शिका व हेल्मेट घालण्याची सवय टाका कारण जीवन अमूल्य आहे त्याचे रक्षण करा.

त्यांनी पालकांना संदेशात म्हटले की तुम्ही स्वतः आदर्श बना व हेल्मेट घाला म्हणजेच तुमची मुलेही घालतील कारण हेल्मेट हा पर्याय नाही ती गरज असल्याचे समजावून सांगितले. राघवेंद्र सिंग यांनी पूर्ण राज्यामध्ये आतापर्यंत ७५,००० पेक्षा जास्त हेल्मेटचे वाटप केलेले आहे. जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालया तर्फे राघवेंद्र सिंग व कुमार चिंता यांच्या हस्ते सुमारे २५० हेल्मेटचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

# 16.70 कोटींच्या रकमेवर दावाच नाही संपत्ती आरबीआयकडे जमा

■ महासागर प्रतिनिधी, वाशीम, दि. ३१:



जिल्ह्यातील खातेदारांची सुमारे १८ कोटी रुपयांची दावा न केलेली संपत्ती रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) कडे जमा असून, यापैकी १५७ खातेदाराना सोमवारी २९ डिसेंबर रोजी १ कोटी २३ लाख रुपयांची रक्कम संबंधित हक्कदारांना वितरित करण्यात आली आहे. मात्र अद्यापही सुमारे १६ कोटी ७० लाख रुपयांच्या रक्कमेवर कुणीही दावा दाखल न केल्यामुळे ही रक्कम आरबीआयकडे जमा करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

आपला पैसा-आपला अधिकार या विशेष मोहिमेला सोमवारी २९ डिसेंबरपासून वाशीम जिल्ह्यात सुरु करण्यात आलेली आहे. आर्थिक क्षेत्रातील दावा न केलेल्या मालमत्तेचे जलद व कार्यक्षम वितरण व्हावे, या उद्देशाने वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय (भारत सरकार) यांच्या पुढाकाराने हे विशेष अभियान राबवण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, आरसेटी संचालक धनाजी बोईले, नागपूर आरबीआयचे प्रबंधक महेश थूल, एसबीआय मुख्य शाखेचे प्रबंधक मोहित कुमार यांच्यासह विविध बँकांचे अधिकारी, कर्मचारी व प्रतिनिधी तसेच खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी दावा न केलेल्या बँक खात्यांची यादी संबंधित बँकांच्या नोटीस बोर्डवर तसेच ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून देण्यात आली असून, नागरिकांनी ही माहिती मिळावी हा या मागील मुळ हेतू असल्याचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले.

हक्क न सांगितलेल्या संपत्तीचे वितरण करण्यासाठी प्रशासन थेट नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचे हे ह्राप्रो-ॲक्टिव्ह गव्हर्नन्सचे उत्तम उदाहरण असल्याचे गौरवोद्?गार मान्यवरांनी काढले. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व जिल्हा आग्रमी बँकेचे व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी विविध बँकांच्या स्टॉलला भेट देऊन पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधला.

# एमआयडीसी परिसरात २५ लाखांचे ११,८२० किलो प्लास्टिक जप्त

## मनपाची आजवरची सर्वात मोठी कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३१:



शहर प्लास्टिकमुक्त करण्याच्या मनपा प्रशासनाच्या ठोस व कठोर निर्देशांनुसार एमआयडीसी परिसरात बंदी असलेल्या सिंगल युज प्लास्टिकविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान एका गोदामातून ३९४ पोते प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला असून त्याचे एकूण वजन ११ हजार ८२० किलो आहे. जप्त करण्यात आलेल्या प्लास्टिकची अंदाजे किंमत २५ लाख रु.आहे. बंदी असलेल्या प्लास्टिक विरोधातील ही मनपा पथकाची आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे.

सदर ठिकाणी पंचनामा करून प्लास्टिक बंदी नियमांनुसार संबंधितावर रु. ५ हजाराचा दंड आकारण्यात आला. ही कारवाई सोमवारी २९ रोजी उशिरा रात्री १२.३० वाजेपर्यंत सुरू होती. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनात राबवण्यात आलेल्या या कारवाईमुळे शहरात प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठवणूक व वापर करणाऱ्यांना या कारवाईमुळे मोठा इशारा मिळाला असून, भविष्यातही अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सातत्याने राबवण्यात येणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

या कारवाईच्या वेळी प्लास्टिक कारवाई नोडल अधिकारी विनोद टांक, स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, बिटप्युन नरेंद्र दुगलज तसेच अतिक्रमण विभागाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. याआधी २८ रोजी १२७० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करून नियमभंग करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. शहरात कुठेही कितीही मोठा प्लास्टिकचा साठा पहिल्यांदा जप्त करण्यात आला तर त्या साठेबाजाविरोधात फार मोठी कारवाई होत नाही. त्याला केवळ ५ हजाराचा दंड आकारला जातो. अर्थात एक किंवा दोन किलो बंदी असलेले प्लास्टिक आढळले तरी ५ हजार व ११ हजार किलो प्लास्टिक आढळले तरी ५ हजार रुपयेच दंड करून त्या गोदामाला सील ठोकले जाते. यामुळेच बंदी असलेले प्लास्टिक विकणाऱ्यांना कोणताही वचक बसत नाही. एक गोदाम सील झाले तरी ते दुसऱ्या ठिकाणावरून त्यांचा व्यावसाय करीत आहेत. दुस?यांदा तोच साठेबाज बंदी असलेले प्लास्टिक विकताना आढळला तर १० हजाराचा दंड होतो. तिसऱ्यांदा त्याच्या विरोधात कायदेशीर कारवाई केली जाते. त्यामुळे शहरातून सिगल युज प्लास्टिकचे समूळ उच्चाटन होत नसल्याचा ठपका सुज्ञ नागरिकांनी ठेवला आहे.

# विविध मागण्यांसाठीशेतकऱ्यांनी आंदोलन

## महामार्गावर तासभर होती वाहतूक ठप्प



■ महासागर प्रतिनिधी, विरेगाव, दि. ३१:

विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांकडून पिंपरी फाटा येथे आंदोलन करण्यात आले आहे. जालना-मंठा महामार्गावर तासभर रास्ता रोको करण्यात आला. त्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. मागण्यांमध्ये शेतकऱ्यांना दिवसा १० तास थ्रीफेज लाइट पूर्ण दाबाची मिळावी. जालना जिल्ह्यामध्ये बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांना २४ तास लाइट देण्यात यावी. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करण्यात यावी. बुलडाणा जिल्ह्यातील तहसीलदार यांनी शेतकऱ्यांची केलेली विटंबना याचा निषेध नोंदवून तहसीलदारांना सस्पेंड करण्यात यावे. नाफेडचे खरेदी केंद्र सुरळीत चालू करण्यात यावे. घोडेगाव पाटी ते घोडेगाव पर्यंत डांबरीकरण करण्यात यावे. या प्रमुख मागण्यांसाठी जालना-मंठा महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला होता. या आंदोलनामुळे दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

# 35 कोटी रुपयांच्या मैदानांची दुरवस्था

## दयनीय मैदानामुळे खेळाडू अडचणीत?

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१:



सुमारे ३५ कोटी रुपयापेक्षा अधिकचा खर्च करून जिल्हा क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक, फुटबॉलचे मैदान आणि इतर मैदाने तयार करण्यात आली होती. मात्र केवळ देखभाल दुरुस्ती अभावी आता या मैदानांची दयनीय अवस्था झाली आहे. टर्फचे मैदान तर अतिशय खराब झाले आहे. या ठिकाणी खेळाचा सराव करण्यासाठी येणाऱ्या खेळाडूंना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या मैदानाची तातडीने डागडुजी व्हावी अशी मागणी आता क्रीडाप्रेमी करीत आहेत.

जिल्हाभरातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा मिळाव्यात यासाठी गोधनी मार्गावरील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये कोरोना काळापूर्वी मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात आली. ३ सप्टेंबर २०१८ रोजी या कामाची सुरुवात झाली होती. त्यात तब्बल ७ कोटी रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यात आला.

त्याचप्रमाणे २७ कोटी रुपये खर्च करून ट्रॅकच्या मध्ये हिरव्या गवताचे टर्फ मैदान, बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बास्केटबॉल, स्केटिंग ही मैदाने आणि परिसरातील सर्व रस्ते तयार करण्यात आले. त्यानंतर मैदानावर फ्लड लाइट लावण्यात आले. त्यासाठी १.३० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला.

मशीनही मिळाली नाही टर्फचे मैदान तयार केल्यानंतर त्याची देखभाल करण्यासाठी एक विशिष्ट मशीन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाला देण्यात येणार होती. मात्र हे मैदान तयार झाल्यानंतर अशी कुठलीही मशीन या कार्यालयाला मिळाली नसल्याचे वास्तव आहे. यासोबतच काम केल्यानंतर त्याच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आल्यानेही या मैदानाची वेळेपूर्वीच ही अवस्था झाली असल्याचे सांगण्यात येत आहे.

# राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनानिमित्त मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी, दिग्रस, दि. ३१:



खोट्या जाहिराती, फसवणूक व अन्यायकारक व्यापार पद्धतीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी ग्राहकांनी सजग राहणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक ग्राहकाने आपल्या हक्कांची माहिती करून घेणे गरजेचे आहे. ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी ग्राहक पंचायत कटिबद्ध असल्याचे मत अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे दिग्रस तालुकाध्यक्ष रामदास पद्मावार यांनी व्यक्त केले.

ग्राहक हा बाजार व्यवस्थेचा केंद्रबिंदू असून त्याच्या हक्कांचे संरक्षण होणे ही काळाची गरज आहे. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत त्यांना सक्षम व जागरूक करण्यासाठी दरवर्षी २४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन साजरा केला जातो. याच अनुषंगाने तहसील कार्यालय, दिग्रस यांच्या वतीने तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा दिग्रस यांच्या सहकार्याने जागतिक ग्राहक हक्क ठाणेदार वैजनाथ मुंडे, सुरेंद्र मिश्रा, सत्यम बांते, के. जी. देशपांडे, अभय इंगळे व डॉ. मुरलीधर राठी आदी मान्यवर मंचावर उपस्थित दुद्दलवार, अमित पडगीलवार, रामभाऊ मार्शटवार, अब्दुल रफिक, विनायक दुधे यांच्यासह विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी, रास्त भाव दुकानदार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने विशेष पुढाकार घेतला. या कार्यक्रमात विविध वक्त्यांनी ग्राहकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.


महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## सुचना-एसआरएम-८६

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६६० मेगावॅट/ओएस/ टी-५६३/आरएफएक्स- ३००००६४२४६ | ३X६६० मेगावॅट के.टी.पी.एस., कोराडी येथील विविध विभागांसाठी संगणक डेटा एंट्रीकरिता मनुष्यबळ सहाय्य पुरवण्यासाठी द्विवार्षिक कामाचा करार. | रु. २१७,०७७.२४ / रु. २१,३५७,७२३.५६ |
| २ | ६६० मेगावॅट/ईएमटी/ टी-५६४/आरएफएक्स- ३००००६४२९६ | ३X६६० मेगावॅट, के.टी.पी.एस., कोराडी येथील यू-१० एओएचसाठी ईएसपी रेक्टिफॉर्मर्सकरिता सिलिकॉन ऑइलचा पुरवठा. | रु. १६,८८५.०० / रु. १,३३८,४८०.०० |
| ३ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-५६५/आरएफएक्स- ३००००६४३०८ | ३X६६० मेगावॅट, के.टी.पी.एस. कोराडी येथील सीएचपीमधील ट्रान्सफर शूटसच्या फ्लॅप गेटची बदली आणि वॅगन टिपलर ग्रिल्सच्या बदलीचे काम. | रु. ८,७६०.०० / रु. ५२६,०००.०० |
| ४ | ६६० मेगावॅट/एफएफ/ टी-५६६/आरएफएक्स- ३००००६४०२४ | कोराडी टीपीएससाठी अग्निशमन पोर्टेबल पंपांची खरेदी. | रु. ७,७००.०० / रु. ४२०,०००.०० |
| ५ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-५६७/आरएफएक्स- ३००००६४२९७ | के.टी.पी.एस. येथील विविध वाहने, लोको आणि बुलडोझरच्या सीट कुशनची आवश्यकतेनुसार दुरुस्ती. | रु. ४,९४२.६१ / रु. १६४,७५३.७२ |
| ६ | ६६० मेगावॅट/आयटी/ टी-५६८/आरएफएक्स- ३००००६४०२३ | खुल्या निविदेद्वारे के.टी.पी.एस.च्या आयटी विभागासाठी एसएसडी (सॉलिड स्टेट ड्राइव्ह) ची खरेदी. | रु. ११,७६२.७१ / रु. ८२६,२७०.५० |
| ७ | ६६० मेगावॅट/ईएमटी/ टी-५६९/आरएफएक्स- ३००००६४२८८ | आरडब्ल्यूपी देवी मंदिर, कोराडी येथे ५० एएच, २२० व्होल्ट निकेल-कॅडमियम बॅटरीचा पुरवठा, उभारणी, प्रतिष्ठापना आणि चाचणी. | रु. १९,३४८.०० / रु. १,५८४,८००.६५ |
| ८ | २१० मेगावॅट/ईएमटी/ टी-५७०/आरएफएक्स- ३००००६४३३२ | २१० मेगावॅट, के.टी.पी.एस., कोराडी येथील युनिट ०६ च्या ऊर्जा मीटरच्या कॅलिब्रेशन/चाचणीचे काम. | रु. ५,१६०.०० / रु. १७२,०००.०० |
| ९ | २१० मेगावॅट/सीएचपी/ टी-५७१/आरएफएक्स- ३००००६४३०६ | २१० मेगावॅट, के.टी.पी.एस., कोराडी येथील डब्ल्यूटी प्लांटमधील सॉल्ट कन्व्हेयरच्या खराब झालेल्या स्टील स्ट्रक्चरची, ज्यात डीई/ एनडीई फाउंडेशनचा समावेश आहे, संपूर्ण बदलीचे काम. | रु. २६,८३६.२९ / रु. २,३३३,६२९.०० |
| १० | ६६० मेगावॅट/बीएम/ टी-५७२/आरएफएक्स- ३००००६४४२९ | कोराडी टीपीएस येथील ६६० मेगावॅट युनिट-१० च्या ओव्हरहॉल दरम्यान बॉयलर ट्यूब्सचे अल्ट्रासोनिक थिकनेस मापन करण्याचे काम. | रु. ८,२१० / रु. ४७१,०००.०० |
| ११ | २१० मेगावॅट/डब्ल्यूटीपी/ टी-५७३/आरएफएक्स- ३००००६४४४० | के.टी.पी.एस. कोराडी येथील पाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी (२१० मेगावॅट) स्टेबल ब्लीचिंग पावडरची खरेदी. | रु. ६,३५१.२० / रु. २८५,१२०.०० |
| १२ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-५७४/आरएफएक्स- ३००००६४४०८ | के.टी.पी.एस., कोराडी येथील ३X६६० मेगावॅट युनिट्सच्या कोल हँडलिंग प्लांटमधील १८०० मिमी रुंदीच्या कन्व्हेयर्ससाठी गार्लंड आयडलर्सची खरेदी. | रु. ७,५२५.०० / रु. ४०२,५००.०० |

ई-टेंडरिंगसाठी बोलिदात्यांना त्यांच्या फर्मची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
अधिक माहितीसाठी संपर्क: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१-८४११९५८६२२
ई-मेल आयडी : eepurchasekoradi@mahagenco.in

हस्ता/-
मुख्य अभियंता,(सं. व सु.)
महानिर्मिती, केटीपीएस, कोराडी


# काँग्रेसचा 2 माजी नगरसेवकांना नकार?

## भाजपने 10 माजी नगरसेवकांच्या कुटुंबात दिले तिकीट

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३१:



महापालिका निवडणुकीत उमेदवार अर्ज भरण्याची मुदत मंगळवारी संपली. सत्ताधारी भाजप व प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसमध्ये उमेदवारीवरून पक्षांतर्गत घमासान झाले. भाजपकडून उमेदवारी न मिळालेल्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांसह थेट निवडणूक प्रमुखांच्या घरीच धाव घेतली. तेथे त्यांच्या अश्रूंचा बांधच फुटला. एक महिला तर भोवळ येऊन पडली. त्यांनी थेट पैशांचा आरोप करत आपल्यावरील अन्यायाचा पाढाच वाचला.

भाजपने २१ माजी नगरसेवकांना उमेदवारी नाकारली. मात्र उमेदवारी न दिलेल्या या २१ पैकी १० माजी नगरसेवकांच्या कुटुंबीयांना उमेदवारी देत रोष कमी करण्याचा प्रयत्न केला. तसेच काँग्रेसनेही दोन माजी नगरसेवकांना उमेदवारी दिली नाही. परिणामी उमेदवारी न मिळालेल्या समर्थकांनी आमदारांचा फोटो असलेल्या फलकाला काळे फासत संताप व्यक्त केला. एकूणच निष्ठावानांना बाहेरचा रस्ता अन् आयारामांना ह्यरेट कार्पेट असे काहीसे चित्र होते.

महापालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये हालचालींना वेग आला. युती-आघाडीसाठी त्या-त्या घटक पक्षांमध्ये चर्चेच्या फैरी झडल्या. मात्र महायुतीमधील भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात युती झाली तर शिवसेनेच्या शिंदे गटाला स्वबळावर लढावे लागत आहे. तसेच महाविकास आघाडीतील महाविकास आघाडीतील काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आघाडी झाली असून, शिवसेनेने (ठाकरे गट) "एकला चलोरे'चा नारा दिला.

परिणामी ३० डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी सर्वाधिक घमासान सत्ताधारी भाजप व विरोधक असलेल्या काँग्रेस, शिवसेनेत झाले. स्वपक्षाने उमेदवारी नाकारलेल्यांनी अन्य पक्षातून उमेदवारी अर्ज भरला. आता राजकीय व अधिकृत उमेदवारांसमोर बंडोबांना शात करत त्यांचे अर्ज मागे घेण्यासाठी समजूत काढण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

आम्हाला हे फळ मिळत आहेत : महायुतीमध्ये राकाँच्या वाट्याला प्रभाग सुटल्याने उर्वरित पान ४ शिवसेना ठाकरे गट : ५५ उमेदवार असून, यात काँग्रेसचे २ , भाजपच्या दोघांनाही संधी दिली आहे. भाजपने ठाकरे गटातील एका माजी नगरसेविकेला तिकीट दिल्याने हिशेब चुकता केला. वंचित बहुजन आघाडी : पक्षाने ५७ ठिकाणी उमेदवार उभे केले असून, एका माजी नगरसेविकेला तिकिट नाकारले आहे. मुंबईत काँग्रेससोबत आघाडी असली तरी शहरात नाही.

निवडणुकीपूर्वी भाजपमधील दुरावलेल्यांकडून तिसरी आघाडीची तयारी करण्यात आली. काहींनी थेट जनतेमध्ये जात बैठकही घेतली. यात माजी नगरसेवक हरिश आलीमचंदानी, डॉ.अशोक ओळंबे, आशिष पवित्रकार, गिरीश गोखले आदींचा समावेश होता.

# 'पुणे तेथे काय उणे'!

संपूर्ण देशात सत्तेच्या पाठीमागे धावणारे राजकारणी आपण पाहत आहोत. पण 'पुणे तेथे काय उणे' असे म्हटले जात असले, तरी पुण्यात मात्र माजी महापौर प्रशांत जगताप यांनी इतिहास घडविला. त्यांनी चक्क विकलांग झालेल्या काँग्रेसमध्ये प्रवेश करून खरोखरच विचारावर आधारित व तत्वावर आधारित पहिला राजकीय प्रवेश अलीकडच्या काळात करून दाखविला. कम्युनिस्ट विचारांचे लोक तत्व पाळतात, हे आपण पाहतोच. परंतु शरद पवार यांना खंबीर साथ देतानाच भाजपला साथ देणाऱ्या अजितदादा बरोबर जाणे पसंत नसल्याने शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून राजीनामा देऊन थेट काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्यांनी तत्व व विचारावर आधारित कार्यकर्ता कसा असतो, हेच जणू महाराष्ट्राला दाखवून दिले. एका बाजूला सारेच राजकीय पक्ष सत्तेकडे फिरकत असताना त्याकडे पाठ करणारे प्रशांत जगताप यांच्यासारखा राजकारणी विरळाच म्हणावा लागेल. विचारांवर राजकारण कालही होत होतं. ते आजही होतंय आणि पुढेही होत राहील. निष्ठेला पायाखाली तुडवत सत्तेच्या परिघात नाचणारांची कितीही गर्दी झाली, तरी निष्ठेवर ठाम राहून आपले पाय तसूभरही थिरकू न देणारेही इथं भेटतील. म्हणूनच राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिला. का दिला? तर भाजपच्या वळचणीला गेलेले अजित पवार यांच्यासोबत पुणे महापालिकेत शरद पवारांचा राष्ट्रवादी युती करणार होती. ही गोष्ट विचारांच्या लढाईत योग्य नाही असं मत जगताप यांचं होत. त्यांनी ते मत खा. सुप्रिया सुळे यांना बोलून दाखवलं. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर जगताप यांनी त्यांच्या पक्षाचा राजीनामा दिला. ते पुढे कुठल्यातरी सत्तेच्या मार्गावर जातील असे बोलले गेले, पण त्यांनी खरोखरच विचारावर आधारित प्रवेश करून अजूनही विचारांचे राजकारण जिवंत आहे याचा दाखला दिला. सगळे अधिकार स्थानिक नेत्यांना दिलेत, असे खा. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. याचा अर्थ पुण्यातील निर्णय स्थानिक नेत्यांनी घेतला असा होतो. जर तसे असेल तर शहराध्यक्ष म्हणून सर्व अधिकार प्रशांत जगताप यांनाच असणार ना? मग जगताप यांना वाटलं अजित पवारांसोबत नाही जायचं, त्यांनी त्यांचा निर्णय सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना कळवला असेल. त्यानंतर त्यांचा निर्णय मान्य करायचं तर सोडाच, याउलट त्यांना त्यांच्याच पक्षकडून 'विचार' ऐकावे लागले असतील. मग सहज प्रश्न पडतो की, शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचे विचार पुरोगामी असले तरी त्यांचा पक्ष पुरोगामी कसा होऊ शकतो? प्रशांत जगताप यांच्यासारख्या नेत्याची आयुष्यातली २५ वर्षे एका विचारांवर, विवेकावर आणि नेत्याच्या शब्दावर खर्ची पडली आहे. कधीही पक्ष बदल करण्याचा मोह त्यांना आजपर्यंत झाला नाही. त्यांचा इतिहास लोकांना माहीत असल्यामुळे ते आमदार व पुण्याचे महापौर देखील झाले. एका कार्यकर्त्याला वाटणार मत त्यांनी पक्षाच्या वरिष्ठांकड मांडूनही उपयोग होत नसेल तर 'त्या' पक्षात ते थांबतीलच कसे?

राष्ट्रवादी हे आमचं कुटुंब आहे, असं पक्षाकडून सांगितले जाते. म्हणजे एकीकडं कुटुंब म्हणायचं आणि कुणीतरी तत्वावर, विचारांवर बोट ठेऊन रागावले कींवा त्यांची भूमिका मांडली तर त्याला 'हे काही घर नाही' म्हणून बाजूला सारायचं.

सगळ्यात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, २५ वर्ष पक्षाशी, शरद पवारांशी आणि विचारांशी प्रामाणिक असलेला कार्यकर्ता पक्ष सोडून जाण्याची भूमिका का घेतो याचा विचार करण्याची गरज होती. अनेकांना वाटत शरद पवार पुरोगामी विचारांचे आहेत. पण पुरोगामीपणाची शाल पांघरून राजकारण करणारे खतरनाक असतात. कारण शरद पवारांच्या राजकारणाची सुरुवातच मुळात भाजपला सोबत घेऊन झालेली आहे.


चेहरा पुरोगामीचा पण कृती मात्र प्रतिगामींची हे अनेकदा सिद्ध झाले आहे. वसंतदादा पाटील यांचं सरकार पाडून 'पुलोद'चा प्रयोग करतांना जनसंघाला सोबत घेऊनच झाला. त्यावेळी संघ विचारांचे लोक पवारांच्या मंत्रिमंडळात होतेच. उत्तमराव पाटील, हशू अडवाणी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर कार्यकर्ते होते. त्यांना पहिल्यांदा मंत्री कुणी केलं तर स्वतःला पुरोगामी म्हणणाऱ्या शरद पवारांनीच.

सरकार कुणाचं पाडलं तर एका अस्सल पुरोगामी विचारांच्या वसंतदादा पाटलांचं. म्हणजे, सत्तेची आणि लवकरात लवकर मुख्यमंत्री होण्याची



पवारांची घाई आता लक्षात घेतली पाहिजे. हा सर्व प्रकार पवारांनी तारूण्यात असतांना केला होता. ज्यांच्या राजकारणाची सुरुवातच अशी झाली असेल तर त्याचा पुढचा अंक कसा असेल याचा अंदाज केलेलाच बरा.

काँग्रेसच्या विरोधात पुलोद म्हणून निवडणूक लढवली त्यामध्येही भाजप होती. काँग्रेस त्यावेळी जिंकली, पण तेव्हाही पवारांनी पुरोगामी नावच वापरले. भाजपलाही अशावेळी कुणीही पुरेगामी चालतो. शरद पवार अनेकदा त्यांच्या बरोबर राहिले आहेत.



**थर्ड अम्पायर**

**जयंत महाजन**

**९४२०६११४२०**

आता तर महाराष्ट्रात तसं काही राहिलंच नाही. कोणत्या विचारसरणीचे लोक कोणाबरोबर जातात, याचा भाजपच्याही लोकांना अंदाज नाही. विचारांवर निवडणुका लढणाऱ्या कार्यकर्त्यांवर हे घावच असतात. प्रशांत जगताप यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करताना आपली भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले की, 'ज्या काँग्रेस पक्षाला शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आहे. तसंच गांधी आणि नेहरुंची विचारधारा आहे. त्या पक्षात मी सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काळात पुण्यामध्ये काँग्रेसला पुन्हा एक नंबरला आणून महाराष्ट्रात आणि पुण्यात भाजपनं जे काही लुटलेलं आहे त्याला विरोध करणारा प्रमुख पक्ष म्हणून काँग्रेस कसा उभा राहील यासाठी मी प्रयत्न करेन'. आता अशा व्यक्तीला पाठिंबा देण्याऐवजी त्यांना चार गोष्टी सुनावण्याचा काँग्रेसचा प्रकार पाहिल्यावर काँग्रेसची बुडती नाव लवकर वर येईल, असे वाटत नाही.

### काँग्रेस पक्ष सुधारणार तरी कधी?

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष राहिलेले प्रशांत जगताप यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करताच पुणे काँग्रेसमधील काही नेत्यांना ते अडचणीचे वाटू लागले. त्यामुळं उघडपणे जगताप यांच्याविरोधात काँग्रेसच्या नेत्यांनी भूमिका घेत त्यांच्या पक्ष प्रवेशाचं स्वागत केलं असलं तरी काहीसा विरोधाचाही सूर लावला. आपल्या नाराजी मागचं कारणही या नेत्यांनी स्पष्ट केलं आहे. काय तर म्हणे प्रदेश काँग्रेसकडून शहरातील काँग्रेस नेत्यांना विश्वासात घेतलं गेलं नाही, पक्ष प्रवेशाच्या प्रक्रिया डावलत प्रशांत जगताप यांना प्रवेश दिल्याचा आरोप काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केला. त्याचबरोबर जगताप यांनी आततायीपणे काँग्रेसमध्ये निर्णय घेऊ नये, अशा शब्दांत घरचा आहेरही त्यांनी दिला आहे. प्रशांत जगताप यांनी ज्या पद्धतीने राष्ट्रवादी पक्षाचे पद सोडले, त्याचे त्यांच्या पक्षाऐवजी काँग्रेसलाच अप्रूप वाटले. ज्या आततायी पद्धतीनं त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचं शहराध्यक्षपद सोडलं ते योग्य नाही, असे काँग्रेसवालेच म्हणू लागले. जर एखाद्या पक्षाला निर्णय सांगण्यात आपण अपयशी ठरलो, तर लगेच एखादी टोकाची भूमिका घ्यायची नसते. आपल्यामध्ये कला असली पाहिजे आपल्या नेत्याचं मन वळवण्याची. जर ती आपल्यात नसेल आणि जर आपण आततायीपणानं निर्णय घेतला तर तुम्ही कोणत्याही पक्षात गेलात तर ते अडचणीचच होणार, अशा शब्दांत स्थानिक नेते अरविंद शिंदे यांनी प्रशांत जगताप यांच्या काँग्रेस प्रवेशावर भूमिका मांडली. ज्या पक्षाचे देशभर पानिपत होत आहे, त्या पक्षात कुणीतरी येत आहे, त्याचे स्वागत करण्याऐवजी अपशकुन करण्याचा प्रकार पाहिल्यावर काँग्रेस पक्ष सुधारणार तरी कधी? असा प्रश्न सहज पडतो.

# सत्तेसाठी पक्षनिष्ठेचा खेळखंडोबा

मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका यंदा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तेसाठी मर्यादित राहिलेल्या नाहीत. या निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवे, अस्वस्थ करणारे वास्तव समोर आणले आहे, ते म्हणजे पक्षनिष्ठेचे झिजलेले स्थान आणि जिंकण्याच्या हमीने व्यापलेली राजकीय मानसिकता.

राज्याच्या इतिहासात प्रथमच महापालिका निवडणुकांना इतके राजकीय वजन आले आहे की, या लढतींनी थेट पक्षसंघटनांची ताकद, नेतृत्वाचा आत्मविश्वास आणि विचारधारेची शाश्वतता प्रश्नांकित केली आहे.

यंदाच्या निवडणुकांमध्ये जे घडले, ते अभूतपूर्व आहे. बंडखोरीच्या भीतीने सर्वच पक्षांनी उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्याऐवजी थेट एबी फॉर्म देण्याचा मार्ग स्वीकारला. बंद दरवाजामागे उमेदवारी ठरवणे, शेवटच्या क्षणापर्यंत नावं गुप्त ठेवणे हे सारे प्रकार केवळ तांत्रिक नव्हे, तर राजकीय अविश्वासाचे लक्षण आहेत. लोकशाहीत उमेदवार निवडण्यापेक्षा उमेदवार रोखणे अधिक महत्त्वाचे ठरू लागले, ही बाब चिंताजनक आहे.

पक्षप्रमुखांनी स्वीकारलेली ही पद्धत एक स्पष्ट संदेश देते–पक्षाला आता स्वतःच्या माणसांवरही पूर्ण विश्वास उरलेला नाही. तिकीट न मिळाल्यास हा बंड करेल का?, हा खरंच निवडून येईल का? या दोन प्रश्नांनी पक्षनेतृत्वाला ग्रासले आहे. यातून उमेदवाराची निष्ठा नव्हे, तर त्याची विनयशीलता आणि धोका न निर्माण करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची ठरते आहे. परिणामी, राजकारणात विचारधारेपेक्षा अंकगणिताला अग्रक्रम मिळतो आहे.

या प्रक्रियेत सर्वाधिक नुकसान झाले आहे ते निष्ठावंत कार्यकर्त्यांचे. वर्षानुवर्षे संघटन बांधणारे, पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात पुढे असणारे, मतदारांशी रोजचा संबंध ठेवणारे कार्यकर्ते अनेक ठिकाणी डावलले गेले.

त्यांच्या जागी जिंकू शकतो या एकमेव निकषावर चेहरे निवडले गेले. ही निवडणूक जिंकण्याची शहाणपणाची रणनीती असू शकते, पण पक्षसंघटनेच्या दीर्घकालीन आरोग्यासाठी ती घातक ठरते.

अधिक गंभीर बाब म्हणजे, सत्तेत असलेल्या पक्षांनाही उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्याचे धाडस झाले नाही. सत्ता हातात असूनही जर नेतृत्वाला स्वतःच्या संघटनेवर विश्वास ठेवता येत नसेल, तर ती सत्ता नेमकी कशावर उभी आहे, हा प्रश्न उभा राहतो. संघटनेची मुळे खोलवर रुजलेली असतील, तर अशा गुप्त, तातडीच्या आणि भयग्रस्त निर्णयांची गरजच भासत नाही.



**दिपक कैतके**
**मुंबई.**

यंदाच्या निवडणुकांनी स्पष्टपणे दाखवून दिले आहे की निष्ठा हरली आणि अंकगणित जिंकलं. निष्ठा, विचारधारा, पक्षासाठीची तपश्चर्या या संकल्पनांना आजच्या राजकारणात दुय्यम स्थान मिळाले आहे. त्याऐवजी विनाबंडखोरी, विनाधोका आणि जिंकण्याची शक्यता, हाच निकष उरला आहे. परिणामी, बंडखोरी वाढली, पक्षांतरांचे राजकारण वेग घेतले आणि स्थानिक पातळीवर संधीसाधूपणाला खतपाणी मिळाले.

ही लढत आता केवळ प्रभाग किंवा वॉर्ड जिंकण्यापुरती उरलेली नाही. ही निवडणूक पक्षीय आत्मविश्वासाची, संघटनात्मक टिकावाची आणि लोकशाही मूल्यांची कसोटी बनली आहे. आज बंडखोरी टाळण्यासाठी केलेल्या तडजोडी उद्या संघटना पोखरण्याचे कारण ठरू शकतात, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न उरतो तो मूलभूत, पक्ष टिकवायचा की सत्ता मिळवायची? सत्ता मिळवण्यासाठी जर पक्षनिष्ठेलाच किंमत उरणार नसेल, तर उद्याच्या राजकारणात पक्षसंघटनांचा पाया नेमका कशावर उभा राहणार? निवडणुकांचे निकाल काही दिवसांत लागतील आणि कोण जिंकले-हरले याचा तात्कालिक हिशेब मांडला जाईल. मात्र यंदाच्या महापालिका निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला दिलेला धक्का दीर्घकाळ जाणवणार आहे.

कारण यंदा लढत केवळ सत्तेसाठीची नाही, ती पक्षनिष्ठा आणि सत्तेच्या हव्यासातील संघर्षाची आहे आणि या संघर्षात सत्ता जिंकली जाऊ शकते, पण विश्वास हरवला तर राजकारणाचे भवितव्यच धोक्यात येते.... हा इशारा यंदाच्या निवडणुकांनी स्पष्टपणे दिला आहे.

# देशपातळीवर खेळाडू घडविणारे क्रीडा प्रशिक्षक सचिन कांबळे



देशामध्ये पालकांची खेळाप्रती असलेली उदासीनता आणि पाल्यांना मिळणारे अपुरे प्रोत्साहन अशा सामाजिक पार्श्वभूमीवर हॉकी या खेळाविषयी गोडी निर्माण करून त्याच्या प्रचार व प्रसारात मोठे योगदान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय पातळीवर हॉकी स्पर्धेत तीन वेळा सहभागी झालेले क्रीडा शिक्षक सचिन कांबळे यांनी केले आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात शेकडो खेळाडूंना राज्य पातळीवर, देश पातळीवर खेळविले आहे, त्यांना यश संपादन करून दिले आहे. आज राज्यातल्या टॉप असणाऱ्या दहा क्रीडा शिक्षकांमध्ये कांबळे सर यांचे अव्वल स्थान आहे.

--------------------

वडील पोलिस खात्यात असल्याने चार ऑलिंपिक आणि चार विश्वचषक जिंकलेले धनराज पिल्ले जिथून घडले, अशा पुण्यातील खडकी या गावाशी त्यांचा संपर्क आला. हॉकीचे माहेरघर असलेल्या या गावात अनेक हॉकी खेळाडू घडत होते. या पोषक वातावरणाचा सचिन कांबळे यांच्यावर प्रभाव पडला आणि त्यांच्यात या खेळाविषयी आकर्षण निर्माण झाले. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षीच त्यांनी या खेळात आयुष्य घडविण्याचे ठरविले.

भारतीय संघात खेळण्याचे स्वप्न बाळगून सचिन यांनी या खेळासाठी आवश्यक सर्व नैपुण्य आत्मसात करत कठोर मेहनत घेत १८ वर्षांखालील पुणे विद्यापीठाची देशपातळीवरील पहिली स्पर्धा जिंकली. अशा तऱ्हेने त्यांच्या कारकिर्दीची यशस्वी घोडदौड सुरू झाली.

मात्र, हा प्रवास सुरू करताना आलेला एक कटू अनुभव ते सांगतात. १४ वर्षांखालील बेंगळुरू नॅशनल हॉकी स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली होती. त्यासाठी ते रोज ४ ते ५ किलोमीटर धावायचे. खेळाचा आवश्यक अभ्यास करून त्यांनी कौशल्य प्राप्त केले होते.

पण ऐनवेळी राजकीय दबावातून त्यांचे नाव रद्द करण्यात आले. ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. त्यांच्या आईनेही खेळ सोडून अभ्यासाकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला. मात्र या खेळालाच वाहून घेण्याचा त्यांचा निर्णय ठाम होता. आज १६ ते १७ वर्षांपासून ते क्रीडा क्षेत्रात कार्यरत असून आपल्या कारकिर्दीत ते राष्ट्रीय पातळीवर तीन वेळा, तर विद्यापीठ स्पर्धांमध्ये दोन वेळा सहभागी झाले आहेत. हॉकी महाराष्ट्र असोसिएशनमध्ये त्यांनी राष्ट्रीय पंच म्हणून बारा वर्षे सेवा दिली असून सातारा जिल्हा क्रीडा विभागातही त्यांचा सहभाग आहे.

खेळासाठी संघर्ष करत असताना खेळाडूंची परिस्थिती त्यांनी जवळून अनुभवली होती. विद्यार्थ्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, याची त्यांना जाणीव होती. यातूनच उदयन्मुख खेळाडूंसाठी आपले काही देणे लागते, या प्रेरणेतून आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी त्यांनी बी.पी.एड. पूर्ण केले. पुण्यातील सैनिक शाळेपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास अखंडपणे पाचगणी येथील संजीवन विद्यालयात क्रीडा शिक्षक म्हणून सुरू आहे.

संजीवन विद्यालय ट्रस्टच्या अध्यक्ष शालिनीताई या आज वयाच्या ९३ व्या वर्षीही अपार उत्साहाने या संस्थेच्या अध्यक्षपदावर कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि प्रोत्साहनातून शाळेच्या निसर्गरम्य २२ एकर कॅम्पसमध्ये आठ एकर फुटबॉल व हॉकी मैदान, ४०० मीटर अथलेटिक्स ट्रॅक, ६०० मीटर नैसर्गिक ट्रेक, २५ मीटर स्विमिंग पूल, क्रिकेट मैदान, नेट प्रॅक्टिस क्षेत्र, जिम, बास्केटबॉल आर्टिफिशियल कोर्ट, चारशे लोकांसाठी क्रीडा वसतिगृह अशी सुसज्ज आणि पोषक क्रीडा सुविधा उभारण्यात आली आहे.

आपल्या शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध शिकवणुकीतून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नैपुण्यसमृद्धता निर्माण केली असून जिंकण्याची मनोवृत्ती रुजवली आहे. त्यांच्या या समर्पणातून १६ ते २० खेळाडू राष्ट्रीय पातळीवर व ३०० ते ३५० विद्यार्थी राज्य पातळीवर खेळले आहेत.



**माणूसपणाची पाऊलवाट**

**सुजाता बंडावार**

अक्षय कुमारच्या गोल्ड चित्रपटात त्यांचे दोन विद्यार्थी झळकल्याची गोष्ट ते अभिमानाने सांगतात. खेळात आवड असलेल्या ३५ ते ४० वयोगटातील ज्येष्ठ क्रीडाप्रेमींसाठी ते स्पर्धांचे आयोजन करतात. विभागीय, राज्य आणि शासनस्तरीय स्पर्धांमध्ये ते पंच म्हणूनही कार्य करतात.

त्यांच्या या मेहनतीची पावती म्हणून २००८ साली त्यांना लोकसेवा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००५ साली ऑल इंडिया विद्यापीठ हॉकी स्पर्धा आणि २००४ साली कुमार गट राष्ट्रीय स्पर्धा त्यांनी जिंकल्या आहेत. एनसीसी अधिकारी म्हणूनही ते कार्यरत आहेत. सचिन सर यांनी देशभरात शेकडो विद्यार्थी घडवले आहेत, ते खेळासोबत सर्वांनी प्रेमाने नाते जोडावे असे सांगितले आहे.

सचिन सर म्हणतात, खेळाविषयी पालकांमध्ये असलेली उदासीनता आता कमी होत आहे. शासन पातळीवर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रावीण्य मिळविणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये थेट नियुक्ती मिळत आहे.

ते अंतःकरणातून सांगतात की प्रत्येक खेळाडूचा पहिला गुरु हा त्याच्या शाळेतील क्रीडा शिक्षक असतो. या क्रीडा शिक्षकाने मिळणाऱ्या पगाराच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमधील खेळ कौशल्य ओळखून त्याला घडविण्यासाठी अपार मेहनत घेतली पाहिजे.

खेळामध्ये शारीरिक सुदृढतेसोबतच मजबूत मानसिकता निर्माण करण्याची गरज आहे. कारण येथे मिळणारे यश सहज नसते. अपयश आले तरी खेळ संपत नाही आणि आयुष्य थांबत नाही, हे विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून आत्मह त्ये सार ख्या विचारांपासून त्यांना परावृत्त केले पाहिजे. आज खेळाला चांगले दिवस आले असले तरी खेळ संघटना आणि होतकरू विद्यार्थ्यांना सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळण्याची गरज आहे.

देश व राज्य पातळीवर खेळण्यासाठी तयार असलेल्या विद्यार्थ्यांना त्या त्या मैदानांशी जुळवून घेण्यासाठी दीड ते दोन महिने निवासी सरावाची सुविधा द्यायला हवी. गल्लीबोळीत खेळला जाणारा क्रिकेट जसा सर्वांना उमगला, तसाच हॉकी खेळ गाव पातळीवर पोहोचण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये मैदाने तयार झाली पाहिजेत.

ज्या खेळामुळे मला अर्थसहाय्य मिळाले आणि आज माझे घर चालते, त्या खेळाप्रती कृतज्ञता व्यक्त करत ते सांगतात की लवकर निवृत्ती घेऊन होतकरू विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ कार्य करायचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाची महत्त्वाची भूमिका असून खेळामुळे त्यांच्यात जिद्द, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्ती निर्माण होते. त्यामुळे पालकांनी अभ्यासासोबतच खेळालाही महत्त्व द्यावे, असे आवाहन सचिन सर यांनी केले आहे. त्यांचा खेळाडू घडविण्याचा हा प्रवास असाच अखंडपणे सुरू राहो, यासाठी आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**सचिन कांबळे संपर्क क्र. 9860164066**

# नव्या वर्षासाठी नवा संकल्प!



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाचे स्वागत करताना आपल्यापैकी अनेक जण आत्मचिंतन करतात. सरत्या वर्षासाठी आपण कोणकोणते संकल्प केले होते, त्यापैकी किती पूर्ण झाले आणि किती शेष आहेत, केलेले संकल्प पूर्ण न होण्यामागे नक्की कोणकोणते अडथळे आले आणि त्यासोबतच येणाऱ्या वर्षात आपल्याला कोणकोणती शिखरे किती काळात गाठायची आहेत, अडचणींवर कशाप्रकारे मात करायची आहे याचे गणित मांडतात.

हे संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला काय काय प्रयत्न करावे लागणार आहेत याची जंत्री बनवतात. प्रतिवर्षी केले जाणारे हे संकल्प बऱ्याचदा व्यावहारिक स्वरूपाचे असतात. विद्यार्थी एखादी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचा संकल्प करतात, व्यावसायिक आपल्या व्यवसायात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्याचा, व्यवसाय वाढवण्याचा संकल्प करतात, कार्यालयीन कर्मचारी कार्यालयात प्रमोशन आणि वेतनवृद्धी मिळवण्याच्या दृष्टीने संकल्प करून त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची सूची बनवतात, नवीन गाडी, घर किंवा एखादी महागडी वस्तू विकत घेण्याचा संकल्प करतात, स्त्रीवर्ग येत्या वर्षात नवीन दागिना, वस्तू विकत घेण्याचा, पैसे बचतीचा संकल्प करतात. दरवर्षी केले जाणारे हे संकल्प पुढील काही दिवस आपल्या प्रयत्नांना ऊर्जा देण्याचे कार्य करतात.

आपल्यापैकी किती जण वर्षाअखेरीस आपल्यात असलेल्या आणि वर्षभरात वाढलेल्या दोषांचे चिंतन करतात आणि हे दोष घालवण्यासाठी, आपल्यात नसलेले गुण आणण्यासाठी आणि अल्प प्रमाणात असलेल्या गुणांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करतात? आपल्यामध्ये अनेक दोष आहेत. यामुळे अनेकदा नुकसान होते, चुकीचे निर्णय घेतले जातात. मात्र या दोषांची सूची बनवून येणाऱ्या वर्षात हे दोष कमी करण्यासाठी आणि सोबत आपल्यात नवनवीन गुण आणण्याच्या दृष्टीने आपण संकल्प करतो का ?

यंदा असा संकल्पही करून पाहूया. दोषासोबत आपल्याला असलेला चुकीच्या सवयी, व्यसने यांची सूची बनवूया आणि त्यासाठी कोणकोणते प्रयत्न करायला हवेत, कोणाकोणाचे साहाय्य घ्यायला हवे हेही लिहून काढू.

आपले शारिरिक आणि मानसिक आरोग्य हे सर्वस्वी समाजावर अवलंबून आहे. त्यामुळे तो निरोगी, सुदृढ आणि सशक्त असणेही तितकेच महत्वाचे आहे.

भ्रष्टाचार, गुंडगिरी, स्त्रियांवरील अत्याचार, लहान मुलांचे शोषण, जातीपातीतील तंटे, तरुणांमधील व्यसनाधीनता, प्रमुख शहरांना पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा,ऑनलाईन गेमिंग ॲप्सना बळी पडत चाललेली तरुणाई, टीव्ही आणि गेम्स आदींच्या नादात लहान मुलांचे हरवत चाललेले बालपण, फास्ट फूड-जंक फूड आदींच्या आहारी गेल्यामुळे वाढत चाललेली आजारपणे, भाज्या-फळे, धान्य, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने यांमधील भेसळ, अन्नपदार्थांत वाढत चाललेला रसायनांचा वापर, बनावट औषधाचे वाढते स्तोम, घरभेदी सिरीयल्स, अश्लील-हिंसक वेबसिरीज आणि चित्रपट, मोबाईल मध्ये गुंतत चाललेले जीवन या सर्वांचा परिणाम म्हणून हरवत चाललेला सुसंवाद, पसरत चाललेली विश्वासघातकी वृत्ती यांसारख्या अनेक समस्या भेडसावत आहेत.

यासाठी राजकीय मंडळी किंवा सरकार काही करेल ही अपेक्षा करण्यापेक्षा या सर्वांच्या निर्मूलनासाठी मीं काय करू शकतो याचा विचार सरत्या वर्षाला निरोप देताना प्रत्येकाने करायला हवा.

## वाचक लिहितात

### माणसाच्या निष्काळजीपणाचे भयावह दर्शन

नाणूस, वाळपई येथील जय श्रीराम अखिल गोमंतक गोसंवर्धन केंद्रात घडलेली घटना अंतर्मुख करणारी आहे. एका गायीच्या पोटातून तब्बल ४८ किलो ३०० ग्रॅम प्लास्टिक, पीव्हीसी पाईपचे तुकडे, चामड्याचा पट्टा, जुने रेनकोट, कापड, नायलॉन दोऱ्या व धातूची वायर शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आली. गोव्यातील अशा प्रकारची ही पहिलीच विक्रमी शस्त्रक्रिया मानली जात आहे. रस्त्यावर टाकलेला कचरा, विशेषतः प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले अन्न, गायी नकळत खातात आणि त्याचे दुष्परिणाम त्यांच्या जीवावर बेततात, याचे हे जिवंत उदाहरण आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे गायीचा जीव वाचला असला, तरी मानवी निष्काळजीपणा आणि प्लास्टिक कचऱ्याचे वाढते संकट यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

ही घटना केवळ एका गायीपुरती मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षण, कचरा व्यवस्थापन आणि मूक प्राण्यांबद्दलची आपली जबाबदारी याची जाणीव करून देणारी आहे. रस्त्यावर कचरा टाकणे थांबवणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे, हाच अशा दुर्दैवी घटनांना आळा घालण्याचा खरा मार्ग आहे.

■ **सौ.रमा देशमुख, नागपूर.**

# भिजवलेल्या तांदळाचे आरोग्यदायी फायदे



तांदूळ हे भारतीय खाद्य पदार्थातील मुख्य अन्न आहे. अनेकांना तर भाताशिवाय पोटही नसते. आपल्या आहारात तांदूळ खूप महत्त्वाचा आहे, डोसापासून रात्रीच्या जेवणापर्यंत भात आवश्यक झाला आहे.

तथापि, आजच्या काळात लोक जास्त घाईत आहेत आणि तांदूळ व्यवस्थित शिजवत नाहीत, ज्यामुळे तांदळाच्या फायद्याऐवजी शरीराचे नुकसान होऊ लागते. आपले पूर्वज स्वयंपाक करण्यापूर्वी काही काळ तांदूळ पाण्यात भिजत असत. ही केवळ चव किंवा सवयीची बाब नाही, तर हा एक स्वस्थ मार्ग आहे. आजच्या काळात अनेकांना तांदूळ धुण्याची आणि थेट शिजवण्याची घाई असते, परंतु तांदूळ पाण्यात भिजवण्यामागे अनेक गुणधर्म लपलेले असतात.

भातामध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण भरपूर असते, जे शरीराला झटपट ऊर्जा पुरवण्याचे काम करते. विशेषतः शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांसाठी भात हा ऊर्जेचा मुख्य स्रोत आहे. तांदूळ हा नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त असतो, त्यामुळे ज्यांना गव्हाची किंवा ग्लूटेनची ॲलर्जी आहे, त्यांच्यासाठी भात हा एक सुरक्षित आणि उत्तम पर्याय ठरतो.

ब्राऊन राइस आणि हातसडीचा तांदूळ हे सर्वात फायदेशीर मानले जातात.

तांदळावर जास्त प्रक्रिया केल्यामुळे त्यातील पोषक घटक आणि फायबर निघून जातात. ब्राऊन राइसवर प्रक्रिया कमी केलेली असते, यामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते, जे पचनक्रिया सुधारण्यास आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करण्यास मदत करते.

भात पचायला हलका असतो, त्यामुळे पोटाच्या तक्रारी किंवा आजारपणात डॉक्टर भात खाण्याचा सल्ला देतात. भातामधील पोषक घटक पचनसंस्था सुरळीत ठेवण्यास मदत करतात.

भातामध्ये कोलेस्टेरॉल, सोडियम आणि फॅट्सचे प्रमाण नगण्य असते, ज्यामुळे तो हृदयाच्या आरोग्यासाठी पोषक ठरतो. ब्राऊन राइस किंवा हातसडीचा तांदूळ यामध्ये फायबर आणि जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात असतात, जे वजन नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तातील साखर संतुलित राखण्यास मदत करतात.

योग्य प्रमाणात आणि योग्य वेळेत भाताचे सेवन केल्यास शरीराची चयापचय क्रिया सुधारते. तांदूळ पाण्यात भिजवून ठेवल्याने त्यात असलेल्या फायटिक ॲसिडची पातळी कमी होते. हे फायटिक ॲसिड शरीराला लोह, कॅल्शियम आणि जस्त सारख्या आवश्यक खनिजे शोषून घेण्यापासून प्रतिबंधित करते. भिजवण्याने हा अडथळा काही प्रमाणात कमी होतो.

■ ■ ■

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### नववर्ष स्वागतम्..!

रचाया उज्वल
भविष्याचा पाया
विचारांती दुरदृष्टीचे
संकल्प करू या ...!

संकल्पांना दिली, जिद्दीने
निरंतर प्रयत्नांची साथ
तर स्वप्नपुर्तीचा आनंद
मावणार नाही गगणात..!

प्रयत्नांती परमेश्वर
हे तत्व ठेवावे ध्यानी
आज नाही तर उद्या यश
मिळेल चिंता नको मनी..

# जगातील नंबर वन हेल्मेट निमार्ता स्टीलबर्ड हेल्मेट्स



■ महासागर प्रतिनिधी
नवी दिल्ली, दि. ३१:

स्टीलबर्डने एकदा पुन्हा भारत आणि जगभरातील राइडर्सचा विश्वास जिंकला आहे. मागील दोन वर्षात जगातील नंबर १ हेल्मेट उत्पादक बनल्यानंतर, स्टीलबर्ड हाय-टेक इंडिया लिमिटेड आता नव्या वर्षात ऐतिहासिक हॅटट्रिक पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे. 2025 या वर्षी कंपनीने 9.3 दशलक्ष हेल्मेट्स विकले आहेत. जानेवारी 2025 मध्ये, स्टीलबर्डला जगातील आघाडीचा हेल्मेट निमार्ता म्हणून घोषित करण्यात आले होते, त्या वेळी कंपनीने दरवर्षी 8.75 दशलक्ष हेल्मेट्स विकले होते. या मोठ्या आकडेवारीच्या मागे एक मोठा उद्देश दडलेला आहे - रस्त्यांवरील असंख्य जीव वाचवण्याचा संकल्प.

स्टीलबर्ड नेहमीच अत्याधुनिक तंत्रज्ञान, जागतिक दर्जाच्या उत्पादन प्रणाली आणि पुढील पिढीच्या सुरक्षिततेच्या नवकल्पनांमध्ये गुंतवणूक केली आहे. म्हणूनच प्रत्येक स्टीलबर्ड हेल्मेट सुरक्षा, विश्वास आणि स्टाईलचे प्रतीक बनले आहे. कंपनीने दररोज 60,000 हेल्मेट्सचे उत्पादन करण्याची योजना आखली आहे, ज्यामुळे सलग तीन वर्षांच्या उल्लेखनीय जागतिक नेतृत्वाचे ध्येय साध्य करण्याची कंपनीची गती अधिक मजबूत होत आहे.

स्टीलबर्डचे यश त्याच्या ठाम तत्त्वावर आधारित आहे. कंपनी भारतातील तिच्या नऊ आयएसओ ९००० प्रमाणित उत्पादन कारखान्यांमध्ये जवळपास प्रत्येक हेल्मेट घटक स्वतः तयार करते. प्रत्येक कारखान्यांमध्ये रोबोटिक पेंटिंग सिस्टीम, अचूक मोल्डिंग तंत्रज्ञान, ऑटोमेटेड उत्पादन लाईन्स आणि बहु-स्तरीय गुणवत्ता तपासण्या यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राजीव कपूर हे जागतिक एकमेव हेल्मेट उद्योगातील नेते आहेत ज्यांना संयुक्त राष्ट्र संघ आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय रस्ते सुरक्षा मंचावर बोलण्यासाठी दोन वेळा आमंत्रित केले गेले आहे.

फेब्रुवारी 2025 मध्ये मॅराकेचमध्ये झालेल्या चौथ्या जागतिक मंत्रिस्तरीय रस्ता सुरक्षा परिषदेत, स्टीलबर्डने मिशन सेव्ह लाइव्ह हा जागतिक उपक्रम सुरू केला.

# लाइटस्टाईल बाय पीएनजीची सारा तेंडुलकर नवीन ब्रँड ॲम्बेसेडर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:

पीएनजी ज्वेलर्सच्या समकालीन व हलक्या वजनाच्या फाईन ज्वेलरी ब्रँड लाइटस्टाईल बाय पीएनजीने सारा तेंडुलकरला आपली ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. लाइटस्टाईल बाय पीएनजीच्या या निर्णयामुळे भारतातील नवीन पिढीतील दागिनेप्रेमी असलेल्या ग्राहकांशी ब्रँडचे नाते अधिक दृढ करणे हा यामागील हेतू आहे.

या सहयोगामुळे पीएनजी ज्वेलर्सच्या वारसागत ग्राहकांपासून भविष्यातील ग्राहकांपर्यंतचा दुवा म्हणून लाइटस्टाईलची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. जवळपास दोनशे वर्षांचा विश्वास असलेल्या पीएनजी ज्वेलर्सच्या परंपरेसोबतच, लाइटस्टाईल बाय पीएनजी हा ब्रँड पुढील पिढीसाठी आधुनिक रिटेल फॉरमॅट, समकालीन डिझाइन आणि ओम्नी-चॅनल अनुभवावर आधारित जाणीवपूर्वक उभारण्यात आला आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, लाइटस्टाईल बाय पीएनजी ही आमच्या विद्यमान ग्राहकांना आणि भविष्यातील ग्राहकांना जोडण्याची दीर्घकालीन





आणि जाणीवपूर्वक आखलेली योजना आहे. पीएनजीने पिढ्यानपिढ्या विश्वास कमावला असला तरी, आजच्या तरुण ग्राहकांच्या विचारसरणी, खरेदी पद्धती आणि अभिव्यक्तीशी सुसंगत राहणे तितकेच महत्त्वाचे आहे.

लाइटस्टाईल ही केवळ पारंपरिक प्रसंगांसाठी नव्हे, तर दैनंदिन क्षणांसाठी डिझाइन केलेली आधुनिक रिटेल संकल्पना आहे. सारा तेंडुलकरची सुंदरता,आधुनिक दृष्टिकोन आणि मजबूत डिजिटल उपस्थिती ही ब्रँडच्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत आहे.

# चेस वर्ल्ड नंबर-१ कार्लसनने ९ व्यांदा ब्लिट्झ विजेतेपद जिंकल

■ महासागर प्रतिनिधी
क्रीडा डेस्क, दि. ३१:

अर्जुन एरिगैसीला कांस्यपदक





बुद्धिबळाचा सुपरस्टार मॅग्नस कार्लसनने वर्ल्ड ब्लिट्झ चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले. हे त्याचे विक्रमी नववे वर्ल्ड ब्लिट्झ विजेतेपद आहे. भारतीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगैसीने उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक जिंकले. विश्वनाथन आनंदनंतर ही कामगिरी करणारा तो भारताचा दुसरा पुरुष खेळाडू ठरला आहे.

दोहा येथे आयोजित स्पर्धेच्या अंतिम फेरीत त्याने उझबेकिस्तानच्या ग्रँडमास्टर नोदिरबेक अब्दुसत्तोरोवला 2.5 1.5 ने हरवले. कार्लसनने यापूर्वी गेल्या आठवड्यात वर्ल्ड रॅपिड चॅम्पियनशिपचे सुवर्णपदकही जिंकले होते. अशा प्रकारे दोहामध्ये त्याने रॅपिड आणि ब्लिट्झ दोन्ही विजेतेपदे पटकावली.

विजेतेपद जिंकल्यानंतर कार्लसन म्हणाला, 'ही स्पर्धा माझ्यासाठी खूप आव्हानात्मक होती. सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये परिस्थिती माझ्या विरोधात होती, पण नॉकआऊटमध्ये मी खेळाचा आनंद घेतला आणि नशिबानेही साथ दिली.'

अंतिम सामन्यात चार गेम खेळले गेले. तीन गेम नंतर स्कोअर 1.5झ1.5 असा बरोबरीत होता. चौथ्या गेममध्ये कार्लसनने ड्रॉची ऑफर नाकारली आणि निर्णायक विजय मिळवून विजेतेपद पटकावले.

भारतीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगैसीने उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक जिंकले. 22 वर्षीय एरिगैसी स्विस लीगच्या 19 फेऱ्यांमध्ये 15 गुणांसह अव्वल स्थानी राहिला. मात्र, उपांत्य फेरीत त्याला अब्दुसत्तोरोवकडून 0.5 2.5 ने पराभव पत्करावा लागला.

# रेखाबेनच्या मृत्यूमागील कादंबरीचे गडद रहस्य प्रकाशात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:



सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिका सध्या गुपिते, फसवेगिरी आणि निर्णायक क्षणाच्या कथाभागामुळे प्रेक्षकांची उत्कंठा वाढवत आहे. या मालिकेत पुष्पा (करुणा पांडे) या एका असामान्य स्त्रीची कथा सांगितली आहे, जिचा प्रवास एक गृहिणी म्हणून सुरू होऊन आता न्यायासाठी निर्भीडतेने लढणाऱ्या वकिलापर्यंत पोहोचला आहे. सध्या प्रेक्षकांची उत्कंठा आणखीनच वाढली आहे आणि मालिकेत एक मोठे गुपित लवकरच उघडकीस येणार असे दिसत आहे. आगामी भागांमध्ये, कोर्टरूम ड्रामा रंगत चालला आहे. शास्त्री (गौरव चोप्रा) कादंबरी (वृंदा त्रिवेदी) आणि तितली (भूमी रमोला) च्या डीएनए टेस्टची मागणी करतो. त्या दोघींचा डीएनए जेव्हा जुळतो, तेव्हा सगळ्यांना धक्काच बसतो. आता कोर्ट निर्णय देणार इतक्यात, इन्स्पेक्टर प्रार्थना (पूजा काटुर्डे) एक महत्त्वाचे सत्य उघड करते. ती सांगते की रेखाबेनवर जी गोळी झाडण्यात आली होती आणि जुगल (अंशुल त्रिवेदी) ला जी गोळी लागली होती, त्या दोन्ही गोळ्या एकाच बंदुकीतून निघाल्या होत्या. ते सत्य ऐकून कोर्टरूम स्तब्ध होते.

# इत्ती सी खुशीच्या सेट्सवर नेहाची बाइक राईड

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३१:



प्रसिद्ध अभिनेत्री नेहा एस. के. सोनी सबवर इत्ती सी खुशी या लोकप्रिय मालिकेत चुणचुणीत आणि बेधडक हेतलची भूमिका करत आहे. आपल्या उत्साही आणि क्रिएटिव्ह स्वभावाने ती केवळ पडद्यावरच नाही, तर पडद्याच्या मागे देखील लोकांचे मन जिंकून घेत आहे. ती प्रदीर्घ शूटिंगच्या वेळेत देखील मालिकेच्या कलाकारांसाठी सेटवरील वातावरण प्रसन्न, हलके-फुलके ठेवते.

अलीकडेच, चित्रीकरणातील विश्रांती दरम्यान, नेहाला सेटवर पार्क केलेली एक स्कूटर दिसली, नेहा त्या स्कूटरवर स्वार झाली. नेहाने थोडी प्रॅक्टिस केली, टीमकडून थोड्या टिप्स घेतल्या आणि एका झटक्यात आत्मविश्वासाने राईड करणे तिला साधले. मालिकेत बनीची भूमिका करणारा छोटा सेयांश शैलेश गुप्ता देखील तिला सामील झाला आणि मग दोघांनी मिळून एक मस्त राईड केली, त्यांना पाहताना सेटवरच्या लोकांचे चेहरे फुलले. पडद्यावर आणि पडद्याच्या मागेही आपल्या लोकांना आपलेसे करण्याची सकारात्मक क्षमता दिसली.

# जम्मू-काश्मीरमध्ये मध्ये ४६ दहशतवादी ठार,३ जवान शहीदः

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमध्ये 2025 साली सुरक्षा दलांनी 35 घटनांमध्ये 46 दहशतवाद्यांना ठार केले. यामध्ये पहलगाम हल्ल्यात सामील असलेले दहशतवादी सुलेमान शाह उर्फ हाशिम मूसा, हमजा अफगाणी आणि जिब्रान यांचाही समावेश आहे.

त्यांचा एन्काउंटर 28 जुलै रोजी करण्यात आला होता. अधिकाऱ्यांच्या मते, या वर्षी 3 जवान शहीद झाले. फेब्रुवारीमध्ये अखनूर सेक्टरमध्ये आयईडी स्फोट झाला, ज्यात 2 जवान शहीद झाले. एप्रिलमध्ये उधमपूरच्या बसंतगडमध्ये एक जवान शहीद झाला होता. काश्मीर फ्रंटियरने सांगितले की, सीमेवर घुसखोरीचे 4 वेळा प्रयत्न झाले. यात 13 दहशतवादी सामील होते, त्यापैकी 8 दहशतवादी मारले गेले. 5 दहशतवाद्यांना पिटाळून लावले.

या वर्षी जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये सर्वात मोठा दहशतवादी हल्ला झाला. 22 एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी 25 पर्यटक आणि एका स्थानिक व्यक्तीचा जीव घेतला होता.याला प्रत्युत्तर म्हणून भारताने 6-7 मे च्या रात्री 'ऑपरेशन सिंदूर' राबवले होते. यात दहशत पसरवणाऱ्या 9 दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त करण्यात आली होती. या दरम्यान 100 हून अधिक दहशतवादी मारले गेले होते.

# डेमियन मार्टिन रुग्णालयात दाखल

■ महासागर प्रतिनिधी
क्रीडा डेस्क, दि. ३१:



माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू डेमियन मार्टिन यांना मेनिंजायटिस झाल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे आणि त्यांना कृत्रिम कोमात ठेवण्यात आले आहे. त्यांच्यावर ब्रिस्बेन येथील एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत, जिथे त्यांची प्रकृती गंभीर आहे.

बॉक्सिंग डेच्या दिवशी अचानक त्यांची तब्येत बिघडली होती, त्यानंतर त्यांना तात्काळ ब्रिस्बेन येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. माजी यष्टीरक्षक गिलक्रिस्ट यांनी केली पुष्टी मार्टिन यांच्या आजाराची पुष्टी त्यांचे जवळचे मित्र आणि ऑस्ट्रेलियाचे माजी यष्टीरक्षक ॲडम गिलक्रिस्ट यांनी केली आहे.

गिलक्रिस्ट यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, मार्टिन यांना उत्कृष्ट वैद्यकीय सुविधा पुरवली जात आहे. ते म्हणाले की, डॉक्टरांची टीम त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहे. गिलक्रिस्ट यांच्या मते, मार्टिनची पत्नी अमांडा आणि त्यांचे कुटुंब या कठीण काळातून जात आहे, परंतु त्यांना जगभरातून मिळत असलेल्या प्रार्थना आणि शुभेच्छांमुळे धैर्य मिळत आहे.

डेमियन मार्टिनने ऑस्ट्रेलियासाठी 67 कसोटी आणि 208 एकदिवसीय सामने खेळताना उत्कृष्ट फलंदाजी केली आहे. याव्यतिरिक्त, तो चार टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्येही खेळला आहे. आपल्या कारकिर्दीत मार्टिनने कसोटी क्रिकेटमध्ये 4406 धावा केल्या, तर एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याच्या नावावर 5346 धावांची नोंद आहे.

2003 च्या विश्वचषक फायनलमध्ये भारतविरुद्ध त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. मार्टिनने 84 चेंडूंमध्ये नाबाद 88 धावा केल्या आणि कर्णधार रिकी पॉन्टिंगसोबत 234 धावांची भागीदारी केली. या भागीदारीमुळे ऑस्ट्रेलियाने 50 षटकांत 359/2 असा मोठा स्कोअर केला होता.

मार्टिन 2006 च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही ऑस्ट्रेलियासाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता.

# नवीन वर्षाचा जल्लोष

## दर्शनासाठी 2 किमी लांब रांगा



नवीन वर्षापूर्वी देशभरातील धार्मिक आणि पर्यटन स्थळांवर लोकांची प्रचंड गर्दी उसळली आहे. अयोध्येत रामलल्ला आणि काशीमध्ये बाबा विश्वनाथांच्या दर्शनासाठी 2-2 किमी लांब रांगा लागल्या आहेत.

उज्जैनच्या महाकाल लोकामध्ये काल वर्षाच्या पहिल्या दिवशी 10 ते 12 लाख भाविक येण्याचा अंदाज आहे. राजस्थानमधील जैसलमेरमध्ये गेल्या 10 वर्षांतील सर्वाधिक गर्दी आहे. सीकरच्या खाटूश्यामजी येथे भाविकांना 2 तासांत दर्शन घेता येत आहे.

# इंदूर...दूषित पाण्यामुळे 8 मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
इंदूर, दि. ३१:

देशातील सर्वात स्वच्छ शहर इंदूरमधील भागीरथपुरा परिसरात दूषित पाणी प्यायल्याने आणखी 3 लोकांच्या मृत्यूची माहिती समोर आली आहे. अशा प्रकारे आतापर्यंत एकूण 8 लोकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये एका पुरुषाचाही समावेश आहे.

मात्र, शासनाने केवळ तीन मृत्यूंचीच अधिकृत पुष्टी केली आहे. यामध्ये नंदराम (70), उर्मिला (60) आणि ताराबाई कोरी (70) यांचा समावेश आहे. या तिघांचा मृत्यू डायरियामुळे झाल्याचे सांगण्यात आले आहे. सध्या वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये 111 लोक दाखल आहेत. परिसरात दहशतीचे वातावरण आहे. ज्या इतर 3 लोकांचा मृत्यू झाला आहे, त्यात गोमती रावत (50), उमा कोरी (31), संतोष बिगोलिया यांचा समावेश आहे. दोन्ही महिला भाऊ गल्ली, भागीरथपुरा येथील रहिवासी होत्या. गोमती रावत यांचा मृत्यू 26 डिसेंबर रोजी झाला होता.

यापूर्वी मंगळवारी नंदलाल पाल (75), उर्मिला यादव (69), उमा कोरी (31), मंजुला पती दिगंबर (74) आणि सीमा प्रजापत (50) यांच्या मृत्यूची माहिती समोर आ दिवसभरात 5 मृत्यूंची माहिती, रात्री उशिरा आणखी 3 मृत्यूंची सूचना सोमवारी रात्री हे प्रकरण तेव्हा समोर आले, जेव्हा मंत्री कैलाश विजयवर्गीय अचानक दिल्लीहून इंदूरला पोहोचले आणि वर्मा हॉस्पिटलमध्ये गेले. 150 हून अधिक आजारी पडले आहेत.

# एआय अप्लायन्सेसच्या भावी टप्प्याचे अनावरण करणार सॅमसंग

■ महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली, दि. ३१:



सॅमसंग २०२६ मध्ये डिव्हाईस एक्सपीरिअन्स डिव्हिजनसाठी आपला दृष्टिकोन, तसेच जगातील सर्वात मोठे आयटी व होम अप्लायन्स प्रदर्शन सीईएसमध्ये नवीन एआय-संचालित ग्राहक अनुभव सादर करण्यास सज्ज आहे.

सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले, "सॅमसंग एआय अप्लायन्सेस आणखी एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचत आहेत, जे वैविध्यपूर्ण अनुभव देत आहेत, वापरकर्त्यांच्या दैनंदिन जीवनाला अधिक जाणून घेतात. लास वेगास येथे ४ जानेवारी २०२६ रोजी आयोजित 'द फर्स्ट लुक' इव्हेन्टमध्ये टीव्हीच्या मर्यादांना देखील दूर केले जाणार आहे.

## गुरुवार दि. १ जानेवारी २०२६

| कल्याण बाजार<br>पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार<br>पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| ३५० | ११९ | १६७ | २६९ | ६८९ | १६८ | २४० | १८० |
| ४६० | ३११ | ३५६ | ११५ | १६६ | ३४८ | ३६७ | २७० |
| ५५० | ६७८ | २२० | ३७७ | ४९० | २३० | ७९० | ३७९ |

| जोडी | जोडी |
|---|---|
| ०२ - १२ - ४३ - ७३ | ३९ - ५० - ६२ - ९४ |
| ०५ - १५ - ४६ - ७६ | ३१ - ५१ - ६४ - ९२ |
| ०८ - १८ - ४९ - ७९ | ३८ - ५८ - ६५ - ९० |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १ जाने. २०२६

## गुरुवार दि. १ जानेवारी २०२६

| सर्व बाजार साठी | |
|---|---|
| | ३० - ५० - ४८ - ०८ |
| | ३१ - ५१ - ४७ - ०७ |
| | ३९ - ५९ - ४६ - ०६ |
| | ४९० - २४९ - २६६ - ४७९ |
| | ५८० - ४५६ - ६११ - २४४ |
| | ६७० - ३५७ - ७७० - ११८ |

सर्व बाजारासाठी

गुरू. ते शनि. ओपन डे | गुरू. ते शनि. ओपन नाईट

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११९ | ५८१ | ५०१ | ४६० | ७११ | १२५ |
| ६६७ **९** | २७१ **८** | ३५१ **७** | ३९० **२** | ४४३ **५** | ३५० **८** |
| ३८८ | ३५० | २५० | ५७० | ११३ | ४६८ |

गुरू. ते शनि. क्लोज डे | गुरू. ते शनि. क्लोज नाईट

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२८ | ११० | १४८ | ४१० | १५० | १२४ |
| ३८० **१** | २२८ **२** | ३४६ **३** | ५८० **३** | २६८ **६** | २७८ **७** |
| ६७८ | ७३६ | ३०० | ६७० | ६६६ | ४६७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

१ २ ९ ८ ०

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## आजचे राशीभविष्य

**मेष :** आप्तांच्या [illegible] दिवस उत्तम जाईल. [illegible] नोकरीची संधी चालून येईल. [illegible] निर्णय [illegible], [illegible] होईल. [illegible] होईल.

**वृषभ :** जर तुम्ही आज प्रॅक्टिकल विचार केलात तर फायदेशीर ठरेल. तुम्हाला अधिक आर्थिक लाभ [illegible]. [illegible] सहकार्याचे [illegible]. आज नवीन लोकांशी संपर्क साधल्याने मदत होईल.

**मिथुन :** [illegible] तुमचे काम वेळेआधीच पूर्ण होऊ शकते. [illegible] व्यवसायात [illegible].

**कर्क :** आज घरात [illegible] तुमच्या भावाकडून [illegible] सहकार्य मिळेल. [illegible] तुमचे काम वेळेवर पूर्ण होईल. तुमच्या [illegible] लाभ द्या.

**सिंह :** [illegible] मिळण्याची शक्यता आहे, ज्यामुळे [illegible]. [illegible] नियंत्रित करणे आवश्यक आहे.

**कन्या :** आज तुम्ही आर्थिक [illegible] प्रयत्न [illegible] केंद्रित [illegible] सुधारण्याचा प्रयत्न करा. [illegible]

**तुळ :** महिलांना [illegible] सहकार्य मिळू शकते. [illegible] प्रतिकूल परिस्थिती [illegible].

**वृश्चिक :** ऑफिसमधील काम नेहमीप्रमाणे चांगले होईल. [illegible] निर्णय [illegible].


**धनु :** [illegible] आणि विचारपूर्वक निर्णय घेण्याची गरज आहे. तुमच्या बिझनेस [illegible] पुनर्विचार करा [illegible] निर्णय [illegible] पुढे जा.

**मकर :** आज प्रलंबित कामे पूर्ण होतील. [illegible] योग आहे. [illegible] नवीन नोकरीची संधी मिळेल. [illegible] पूर्ण [illegible].

**कुंभ :** जर तुम्ही तुमच्या [illegible] तर तुमची कामे जलद पूर्ण होतील. [illegible] तुमच्या मुलांच्या [illegible] समस्या सोडवू शकाल.

**मीन :** व्यवसायानिमित्त [illegible] लागू शकते, [illegible] फायदेशीर ठरेल. [illegible] आनंद वाढेल. [illegible] तुम्हाला एक जबाबदारीची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे, जी पूर्ण केल्यास फायदेशीर ठरेल.

## शब्दकोडे क्रमांक २३११



**आडवे शब्द :-**
१) जुनीच्या विरुद्ध
४) ढीग
६) आंबा (हिंदी)
८) राणा प्रताप सिंगांच्या घोड्याचे नाव
१०) सोन्याचा धागा
११) दरारा, भीती
१२) एक द्विदल धान्य
१३) 'जर'चा जोडीदार
१४) घर
१६) रोखलेली नजर
१८) नटणारा
२१) संपूर्ण, सगळे
२३) मर्यादा, धरबंध
२४) राजवाडा
२७) एकरूप, रममाण
२९) राख
३०) दिवस
३१) मरेपर्यंत
३३) अग्नी
३४) पराजय
३७) सोललेल्या उसाचे आडवे तुकडे
३८) खराब
३९) पर्ण
४०) च्यासाठी
४२) नवरा, कुटुंबप्रमुख (ग्रामीण)
४४) रजःकण
४५) श्रेष्ठ पुरुष
४७) श्रीरामाची चरित्रगाथा
४८) अंधरुणाची गुंडाळी
५०) आपले (हिंदी)
५१) मत देणारा
५२) लबाडीचा हेतू
५४) समस्त
५६) विटी-दांडूतील खड्डा
५७) मंत्रीमंडळ
५८) अधिक महिना
५९) सरस्वतीचे एक नाव
६१) रसाळ
६१) गाय, गोमाता

**उभे शब्द**
१) नजरेची टक्कर
२) शूर
३) जंगलाला लागलेली आग
४) कृष्णसखी
५) च्यासह
६) कुंभाराची भट्टी
७) अत्यंत मुलायम कापडप्रकार
८) जीव, प्राण, चैतन्य
९) पंजाबमधील एक प्रसिद्ध जिल्हा
१४) आश्रय
१५) चर्चेची देवाणघेवाण
१७) सत्व
१९) शिखराचे टोक
२२) पदार्थाचा सूक्ष्म भाग
२५) तरुण, सैनिक
२६) माळ, सर, पराभव
२८) विषमच्या विरुद्ध
३१) भडीमार
३२) अफवा, कंडी
३३) अवाजवी
३४) वेतन
३५) महाराष्ट्राचे कुलदैवत
३६) खानेसुमारी
३७) गीत, गाणे
३९) एक खनिज द्रव
४१) दिखाऊ, वरपांगी
४२) वस्तूचा भाग
४३) पृथ्वी
४६) एक पाताळ
४९) समीक्षक
५०) कपाट
५१) सुसर
५३) उत्तराधिकारी
५४) युद्ध
५५) मनाचा ओढा
५७) नेहमी, सदोदित

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नगराध्यक्षांकडून कचरा डेपो, जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी

## विल्हेवाट लावण्याच्या सूचना-मुख्याधिकारी अनुपस्थित

■ महासागर प्रतिनिधी, नांदगाव खंडेश्वर, दि. ३१ :
येथील नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांच्या नेतृत्वात स्थानिक नगरसेवकांनी जलशुद्धीकरण केंद्र व कचरा डेपोची पाहणी केली. तेथे आढळलेल्या अव्यवस्था दूर करण्याबाबत अधिकारी, कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचनाही देण्यात आल्या. त्यांच्या या भेटीमुळे पदभार स्वीकारण्याआधीच पदाधिकारी ॲक्शन मोडवर आल्याचे स्पष्ट झाले. या भेटीवेळी मुख्याधिकारी मात्र सुटीवर होते.



मंगळवारी सकाळी १० वाजताच नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर व नगरसेवक नगरपंचायत कार्यालयात पोहोचले.

त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला. दरम्यान विनापरवानगी गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे निर्देश दिले. त्यांच्या या नगर अचानक भेटीमुळे नगर पंचायतीच्या कर्मचाऱ्यांना धास्ती निर्माण झाली आहे. स्वतः मुख्याधिकारी सुट्टीवर असल्याने न.पं. कार्यालयातील अनेक कर्मचारी विनापरवानगी गैरहजर आढळून आले. अशा सर्व कर्मचाऱ्यांना लगेच कारणे दाखवा नोटीस देऊन योग्य कारवाईचे निर्देश दिले. लाखो रुपये खर्च करूनही कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी अद्याप जागा तयार करण्यात आली नाही. याबाबत नगराध्यक्षांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. नगर अधिकाऱ्यांना दिलेल्या माहितीनुसार प्रशासनाने डम्पिंग ग्राउंड निर्माण केले. मात्र सदर डम्पिंग ग्राउंड पूर्णपणे अस्तव्यस्त झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यावेळी आधुनिक पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट करण्याचे निर्देशही नगराध्यक्षांमार्फत देण्यात आले.

पदाधिकाऱ्यांनी यावेळी नांदगाव शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्राचीही पाहणी केली. जल शुद्धीकरण केंद्रात योग्य त्या सुधारणा करण्याचे निर्देश नगराध्यक्षांनी दिले. या भेटीदरम्यान पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य इत्यादी विभागाचा आढावा घेण्यात आला. बस स्थानक परिसरातील शौचालयाची दुर्गंधी पाहून नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी नगरसेवक प्रकाश मारोटकर, प्रीती इखार, कांता लोमटे, वासुदेव लोखंडे, राष्ट्रवादीचे मो.साजिद इत्यादी उपस्थित होते.

जलशुद्धीकरणची मशीन नादुरुस्त नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली असता पाणी स्वच्छ करणाऱ्या बहुतांश मशीन नादुरुस्त होत्या. मशीन नादुरुस्त असल्यामुळे पाणी पाहिजे तेवढ्या प्रमाणात शुद्ध होत नाही, असाही मुद्दा पुढे आला. याबाबत नगराध्यक्षांनी पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांना विचारणा केली. परंतु मुख्याधिकारीच उपस्थित नसल्याने ते निरुत्तर झाले. दरम्यान मशीनची दुरुस्ती तत्काळ करण्याचे निर्देश देण्यात आले.

## थर्टीफर्स्टच्या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्ह्यात कडेकोट बंदोबस्त

**हिंगोली** : हिंगोली शहरासह जिल्हाभरात थर्टीफर्स्टच्या पार्श्वभूमीवर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून शहरातील सर्वच चौकांमध्ये वाहनांचीत तपासणी केली जाणार आहे. या शिवाय ५४ पोलिस अधिकारी, ४५० पोलिस कर्मचाऱ्यांचा तफा रस्त्यावर उतरणार आहे. त्यांच्या मदतीला गृह रक्षक दलाचे जवान देखील तैनात केले जाणार आहेत. अनुचीत प्रकार करणाऱ्या प्रयत्न करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत. हिंगोली जिल्ह्यात थर्टीफर्स्टचे जल्लोषात स्वागत करण्याची नागरीकांकडून तयारी केली जात आहे. यावर्षी थर्टीफर्स्टच्या निमित्ताने शाकाहारी भोजनासाठी मांसाहारी भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# माजी मंत्री जगदीश गुप्ता यांचा अखेर शिवसेना शिंदे गटाला 'जय महाराष्ट्र'

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३१ :
सुमारे सात महिन्यांपूर्वीच शिवसेनेत (शिंदे गट) आलेले माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांनी मंगळवारी (दि. ३०) राजीनामा दिला आहे. त्यांच्याकडे पक्षाने पश्चिम विदर्भ संघटक प्रमुख अशी जबाबदारी दिली होती. त्यांनी पक्षाचा व आपल्या पदाचा राजीनामा पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवला आहे.



अशी माहिती जगदीश गुप्ता यांनीच पत्रकार परिषदेत दिली. जगदीश गुप्ता यांनी सांगितले कि, अलीकडे सर्व राजकीय पक्ष सारखेच झाले आहे. या पक्षामध्ये नेत्यांच्या समोर मुजरा केल्याशिवाय कोणत्याही कार्यकर्त्याचे भले होत नाही, येथेही हीच परिस्थिती बघितल्याने निराश झालो. माझ्यासोबत अनेक 'कमिटमेंट' करण्यात आल्या, त्या काही वैयक्तिक नव्हत्या. ज्या लोकांनी मला अनेक वर्षापासून साथ दिली, त्यांच्यासाठी मी या 'कमिटमेंट' स्वीकारल्या होत्या. पण, बोलणी झाल्यानंतर लगेच गोष्टी बदलत होत्या.

पक्षात प्रवेश घेतल्यापासून ते आतापर्यंत वारंवार हे होत असल्याने आपण शिवसेना पक्ष (शिंदे गट) सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

आता कोणत्याही राजकीय पक्षावर माझा विश्वास राहिलेला नाही. आता कोणत्याही पक्षात जायचे नाही, हा निर्णय मी घेतला आहे. त्या निर्णयावर मी ठाम आहे. आता अपक्ष म्हणून लढण्याची तयारी असलेल्या हिंमतबाज कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम मी करणार आहे. असे त्यांनी यावेळी सांगितले.

# ३ जानेवारीला दिसणार सुपरमून : नववर्षात अवकाश नवलाई

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३१ :
जेव्हा पृथ्वी आणि चंद्रातील अंतर सर्वात कमी असते, तेव्हा सुपरमून होतो. यामुळे चंद्र मोठा आणि उजळ दिसतो. ३ जानेवारी रोजी पौर्णिमेच्या दिवशी सुपरमून दिसणार आहे. या दिवशी पृथ्वीपासून चंद्राचे अंतर कमी राहिल. त्यामुळे चंद्र या दिवशी मोठा व प्रकाशमान दिसेल. सरासरी पृथ्वी-चंद्रे अंतर ३ लाख ८५ हजार कि.मी. असते. जेव्हा पृथ्वी-चंद्रे अंतर ३ लाख ७० हजार कि.मी.च्या आत असते त्याला सुपरमून असे म्हणतात. चंद्र पृथ्वीच्या जवळ आल्याने समुद्राच्या भरती-ओहोटीची तिव्रता वाढणे, वादळ वासारख्या घटना घडू शकतात. पृथ्वीवरुन आपण



नेहमी चंद्राचा ५९ टक्के भाग पाहता येतो. चंद्रावरुन पृथ्वी ही ९८.४ टक्के दिसू शकते. चंद्रावरुन पृथ्वीवर प्रकाशकिरण येण्यास १.३ सेकंद लागतात. चंद्राचे वय हे ४.६५ अब्ज वर्ष आहे. चंद्र हा पृथ्वीपासून दरवर्षाला ३.८ सेंटीमिटर लांब जात आहे. त्यामुळे पृथ्वीचा फिरण्याचा वेग कमी होईल व १०० वर्षानंतर दिवस हा २ मिली सेकंदने मोठा होईल. चंद्रावर ३० हजार विवरे व १२ पर्वत आहे. पर्वत व विवरे दुर्बिणीमधून अगदी चांगल्या प्रकारे पाहता येतात. ३ जानेवारीला संध्याकाळी दिसणारा सुपरमून खगोलप्रेमींनी व जिज्ञासूंनी अवश्य बघावा. नवीन वर्षातील ही पहिली संधी आहे.

हा सुपरमून अगदी साध्या डोळ्यांनी पाहता येईल, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली आहे. सुपरमून काय आहे? सुपरमून ही एक खगोलीय घटना आहे. ज्यामध्ये चंद्र त्याच्या सामान्य आकारापेक्षा मोठा दिसतो. वर्षातून तीन ते चार वेळा सुपरमून दिसतात. सुपरमून दिसण्याचे कारण खूपच रंजक आहे. या काळात, चंद्र पृथ्वीभोवती फिरत असताना त्याच्या अगदी जवळ येतो. या अवस्थेला पेरिजी म्हणतात. दरम्यान, जेव्हा चंद्र पृथ्वीपासून दूर जातो तेव्हा त्याला अपोजी म्हणतात.

ज्योतिषी रिचर्ड नोले यांनी पहिल्यांदा १९७९ मध्ये सुपरमून हा शब्द वापरला. चंद्र दर २७ दिवसांनी पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करतो. दर २९.५ दिवसांनी एकदा पौर्णिमा देखील येते. प्रत्येक पौर्णिमा हा सुपरमून नसतो, परंतु प्रत्येक सुपरमून पौर्णिमेला येतो. चंद्र पृथ्वीभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत फिरतो, म्हणून पृथ्वी आणि चंद्रातील अंतर दररोज बदलते. जुलैच्या सुपर मूनला बक मून असेही म्हणतात.

# विद्यार्थ्यांनी मानसिक, शारीरिक स्वास्थ्याकडे आवर्जून लक्ष द्यावे

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३१ : आजच्या स्पर्धेच्या व धकाधकीच्या युगात मानसिक व शारीरिक स्वास्थ्य टिकवणे सर्वांचे प्रथम कर्तव्य झाले आहे. स्पर्धेला सामोरे जातांना विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेवर परिणाम होऊ नये, तो निरोगी आणि सुदृढ रहावा. म्हणून विद्यापीठाच्या वतीने फिटनेस कॅम्पचे केलेले आयोजन आजची गरज आहे. विद्यार्थ्यांनी आपले मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सांभाळावे आणि फिटनेस कॅम्पमध्ये आपली शारीरिक तपासणी करुन घ्यावी, असे आवाहनात्मक प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. विद्यापीठातील पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने सहा दिवसीय शारीरिक कार्यक्षमता तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्याचे



### विद्यापीठात फिटनेस वीकचे उद्घाटन

उद्घाटनप्रसंगी कुलगुरू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी प्रकाश मेश्राम, फिट इंडियाचे उज्ज्वल जाधव, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. तनुजा राऊत. उपस्थित होते. यावेळी फित कापून फिटनेस वीकचे उद्घाटन झाल्याची घोषणा कुलगुरू यांनी केली. मार्गदर्शन करताना कुलगुरू पुढे म्हणाले, आजच्या युगात करिअर घडवण्याच्या आणि पैसे कमवण्याच्या मागे धावताना आरोग्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. शुगर व बी.पी.च्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या वाढीमुळे भारत भारत कॅपिटल होते की काय? अशी भीती निर्माण झाली आहे.

तरुणांमध्ये सुध्दा हे आजार पसरत असून ते चिंताजनक आहे. सर्वांनी आपले मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सुदृढ ठेवण्यासाठी अशाप्रकारच्या फिटनेस कॅम्पमध्ये आपली शारीरिक क्षमता तपासून घ्यावी.

असे आवाहन करुन त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांनी प्रत्यक्ष चाचणी केंद्राची पाहणी केली. तसेच स्वतः शारीरिक चाचणी करुन घेतली.

# जप्त केलेला १४.७९ लाखांचा मुद्देमाल तक्रारदारांना परत

■ महासागर प्रतिनिधी
हिंगोली, दि. ३१ :
हिंगोली जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला १४.७९ लाख रुपयांचा मुद्देमाल बुधवारी ता. ३१ तक्रारदारांना परत करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक निलभ रोहन यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. हिंगोली जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांतर्गत दाखल झालेले घरफोडी, चोरी, वाहन चोरीचे गुन्हे उघडकीला आणण्यासाठी पोलिस विभागाकडून स्थानिक पोलिसांसह विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत.

## 'भाबीजी घर पर है २.०' पाहायला विसरू नका, ज्यामागे आहेत ५ प्रमुख कारणे!



नागपूर, दि. ३१ : विनोद, हृदयस्पर्शी भावना आणि संस्मरणीय पात्रांचे संयोजन असलेल्या लोकप्रिय विनोदी मालिकेचे मनोरंजन देण्यासाठी प्रसिद्ध असलेले चॅनेल एण्ड टीव्ही मालिका 'भाबीजी घर पर है २.०'सह नवीन उत्साही अध्याय घेऊन येत आहे. ही मालिका २२ डिसेंबरपासून रात्री १०.३० वाजता सुरू होत आहे. प्रेक्षक या मालिकेचे स्ट्रिमिंग हिंदी झी५वर देखील पाहू शकतात. नवीन उत्साहवर्धक वातावरण, सर्वोत्तम कथानक आणि अलौकिक शक्तींसह लोकप्रिय मालिका नवीन उत्साहासह परतत आहे, जेथे जुन्या आठवणींना उजाळा देण्यासोबत नॉन-स्टॉपमनोरंजन मिळेल.

**ही मालिका पाहायला चुकवू नये यामागील पाच कारणे पुढीलप्रमाणे:**

**१ शिल्पा शिंदे १० वर्षांनंतर अंगूरी भाबीच्या भूमिकेत पुनरागमन करत आहेत.**
टेलिव्हिजनवरील सर्वात लोकप्रिय पात्र दीर्घकाळानंतर परतत आहे. ख्याचा अंगूरी भाबीच्या भूमिकेत पुनरागमन करत असलेल्या शिल्पा शिंदे निरागसता, मोहकता आणि संस्मरणीय विनोदी शैली पुन्हा घेऊन येत आहेत, ज्याचा प्रेक्षकांनी दशकापासून आनंद घेतला आहे. त्यांच्या पुनरागमनासह जुन्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत, तसेच या नवीन अध्यायामध्ये भावनिकतेची देखील भर झाली आहे.

**२. घुंघटगंजमध्ये कॉमेडीसोबत थरारक मनोरंजन**
यावेळी हास्यासोबत रहस्याचे मनोरंजन देखील मिळणार आहे. रहस?यमय घुंघटगंज नगरामध्ये परंपरेसोबत घुंघटमागील रोमांच व सिक्रेट्सचा उलगडा होणार आहे. मालिकेने उत्साही अलौकिक शक्तीसंदर्भात कथानक आणले आहे, ज्यासह त्यांच्या लोकप्रिय विनोदामध्ये नवीन उत्साहीपणा, सस्पेंस आणि अनपेक्षिततेची भर केली आहे.

**३. नवीन पात्रं नवीन ऊर्जा आणि अनपेक्षित ट्विस्ट्स घेऊन आले आहेत.**
विलक्षण नवीन चेहरे कथानकामध्ये प्रवेश करण्यासह गोंधळ अधिक वाढला आहे, ज्यामधून भरपूर मनोरंजन मिळेल. हे पात्र नवीन गतीशीलता, अचंबित करणारे परस्परसंवाद आणि सर्वोत्तम कथानक सादर करतात, ज्यामुळे प्रत्येक एपिसोड अधिक उत्साहवर्धक, सर्वसमावेशक आणि अनपेक्षित असणार आहे.

**४. भाबीजीची अदलाबदल -ओळखीचे चेहरे, नवीन धमाल**
मालिका 'भाबीजी घर पर है २.०'चे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे भाबीजींची अदलाबदल, ज्यामुळे विनोदी गोंधळ, उच्चस्तरीय ड्रामा आणि हसवून-हसवून लोटपोट करणाऱ्या क्षणांचे मनोरंजन मिळेल. पात्रांना या ट्विस्टचा सामना करताना त्यांच्यामधील नवीन केमिस्ट्री पाहायला मिळेल आणि प्रेक्षकांना आवडलेल्या कॉमेडीमधील पूर्णत: नवीन मनोरंजन मिळेल.

**५. सर्वोत्तम कौटुंबिक मनोरंजन, जे तुम्हाला उत्साहित करेल**
मालिका 'भाबीजी घर पर है २.०'मध्ये हलके-फुलके तणाव दूर करणारे विनोद आहेत. उत्साहीपणा, निरागसता व हास्यासह नवीन उत्साहवर्धक वातावरण व नवीन ऊर्जा घेऊन येत ही मालिका दीर्घकाळानंतर वेगळा अनुभव देणार आहे, जेथे कुटुंबातील सर्वांना मनमुराद मनोरंजनाचा आनंद मिळेल.

## घरकुलाच्या हप्त्याचा वाद : सेनगावात भाजप पदाधिकाऱ्याचा लाभार्थ्यांसह आत्मदहन करण्याचा इशारा

**हिंगोली:** हिंगोली जिल्ह्यात घरकुल योजनेमध्ये लाभार्थ्यांना घरकुलाच्या अनुदानाचे हप्ते मिळत नसल्याने संतप्त झालेल्या भाजपाच्या पदाधिकाऱ्याने सेनगाव पंचायत समितीमध्ये आत्मदहनाचा इशारा दिला आहे तर दुसरीकडे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी औंढा नागनाथ येथे गटविकास अधिकाऱ्यांना धारेवर धरले आहे. हिंगोली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत घरकुल योजना राबवली जात असून त्यासाठी ग्रामपंचायतस्तरावर लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यांमधून सुमारे ३ हजारपेक्षा अधिक लाभार्थ्यांची निवड झाली असून काही जणांना घरकुलाच्या अनुदानाचा १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता देण्यात आला तर काही जणांना अद्यापही अनुदानाचा हप्ता दिलाच नाही. दरम्यान, घरकुल मंजूर झाल्यामुळे लाभार्थ्यांनी त्यांची कच्ची घरे पाडून ठेवली आहेत. मात्र आता अनुदानाचा हप्ता मिळत नसल्याने लाभार्थ्यांना घराच्या बाजूने मेनकापडाच्या फाऱ्या बांधून रहावे लागत आहे. सध्या कडाक्याची थंडी सुरु असून यामुळे लाभार्थ्यांचे मोठे हाल होत आहेत. घरकुलाचे हप्ते शासनस्तरावरून ऑनलाईन लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने लाभार्थ्यांकडून बँकेत चकरा वाढू लागल्या आहेत.

दरम्यान, सेनगाव तालुक्यातील पळशी गावातील लाभार्थ्यांना घरकुलाचे अनुदानाचे हप्ते मिळाले नसल्याने भाजपाचे अनुसुचीत जाती आघाडीचे जिल्हाध्यक्ष नंदकिशोर खिल्लारे यांनी लाभार्थ्यांसह प्रभारी गटविकास अधिकारी माधव कोकाटे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. ता. ५ जानेवारी पर्यंत अनुदानाचे हप्ते न मिळाल्यास लाभार्थ्यांसह आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या शिवाय काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. सतीष पाचपुते, नंदू पाटील, ॲड. पोले, बबन डुकरे, नाईक यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी औंढा नागनाथचे गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे यांची भेट घेऊन सुमारे १५०० लाभार्थ्यांचे अनुदानाचे हप्ते का पडले नाहीत याबाबत जाब विचारला. सदर हप्ते तातडीने बँक खात्यात जमा करण्याबाबत वरिष्ठ कार्यालयास कळविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.


### जाहीरनामा

कोर्ट विद्यमान तहसिलदार, काटोल यांचे कार्यालय, काटोल
क्र प्रस्तु-२ नाव/तहका/कावि ९३३/२०२५
तहसिलदार काटोल यांचे कार्यालय, काटोल
दिनांक : १०/११/२०२५

याद्वारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री. सुधीर संपतराव घुटे, राहणार कोंढाळी ता.काटोल जि.नागपूर यांनी त्यांची मयत आई सुमनबाई संपतराव घुटे, यांचा मृत्यु नोंद करिता अर्ज सादर केला असुन ... (त्यांचा मृत्यु दिनांक ०४/०१/२०१४ रोजी कोंढाळी येथे झाला ...) [illegible] ... अर्जदाराने ... महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) अंतर्गत अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

याबाबत ज्यांना आक्षेप अथवा उजर घ्यावयाचा असल्यास जाहिरनामा प्रसिद्धीच्या दिनांकापासून ... दिवसाच्या आत तहसिल कार्यालय काटोल येथे कार्यालयीन वेळेत लेखीस्वरुपात सादर करावे. उक्त मुदतीनंतर आक्षेप / उजर स्विकारले जाणार नाही.

सदर जाहीरनामा माझी सही व शिक्यानिशी आज दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला.

दिनांक : ३१/१२/२०२५
नायब तहसीलदार
काटोल



### जाहीर सुचना

सुचित करण्यात येते की माझे पती **श्री मनोज रघुनाथ घारे** यांचे दि. ०९/०७/२०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या नावे खालील वर्णित वाहन आहे :- **4 Wheeler Maruti S-Cross, RTO Reg. No. MH31 FA6407, Chassis No. MA3FNEB1S00175703, Engine No. D13A-5566712** मी **श्रीमती राजश्री मनोज घारे (पत्नी)**, त्यांची कायदेशीर वारस असून वरील वर्णित गाडी माझे नावे करण्यात येत असून याला कोणाचीही कुठलीही हरकत किंवा आक्षेप असल्यास **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. मुदतीनंतर कुठलाही आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

नागपूर - दि. ०१/०१/२०२६
**श्रीमती राजश्री मनोज घारे**
रा. प्लॉट नं. ४९, सेंट्रल एक्साईज कॉलोनी वर्धा रोड, नागपुर. मो. 7588630165



### Change Of Name

MY OLD NAME WAS **MILINDKUMAR UDAYBHAN INDURKAR.** NOW MY NEW NAME IS **MILIND UDAYBHAN INDURKAR.** ADD: QUARTER NO.B19/147, NEAR NIT GARDEN UPPALWADI NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **PALLAVI VENIMADHAV ALIAS SURAJ BHORKAR.** NOW MY NEW NAME IS **SNEHA LAXMANRAO KSHIRSAGAR.** ADD: PLOT NO 4,FLAT NO. 4001 SHIV HEIGHTS APARTMENT, NAGPUR-440034

MY OLD NAME WAS **AMIT KUMAR SHUKLA.** NOW MY NEW NAME IS **AMIT DINBANDHU SHUKLA.** ADD: PLOT NO 102 KATOL ROAD HANUMAN MANDIR KE PICHE DARSHNA GRUH NIRMAN SOCIETY DABHA NAGPUR. 440023

MY OLD NAME WAS **KAMBLE BALASAHEB.** NOW MY NEW NAME IS **BALKRISHNA KAMBLE.** ADD: FLAT NO. 604 - A RACHANA MEGHSPARSH APARTMENT BHAMTI NAGPUR. 440025

MY OLD NAME WAS **NOOR JAHAN BEGUM WAHID KHAN.** NOW MY NEW NAME IS **NOORJAHAN ABDUL SATTAR PATHAN.** ADD: PLOT NO.132 THAKUR PLOT TAJBAG NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **FATEMA BI MOHAMMED AARIF.** NOW MY NEW NAME IS **FATMA MOHAMMAD ARIF NAGANI.** ADD: TAJ NAGAR,NEAR USMANIYA MASJID, DIGRAS, YAVATMAL - 445203

MY OLD NAME WAS **SHABANA KAUSAR MIRZA.** NOW MY NEW NAME IS **SHABANA A ARSHAD KHAN.** ADD: 24 ASI NAGAR MAIN ROAD,DR AMBEDKAR MARG, NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **TAHER ANSARI/TAHIR ANSARI.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD TAHIR RIYASAT ALI ANSARI.** ADD: PLOT NO.346 LASHKARIBAGH NAGPUR 440017

MY OLD NAME WAS **AKHILESH KUMAR NAPIT.** NOW MY NEW NAME IS **AKHILESH NAPIT.** ADD: ASHISH AGRAWAL, PLOT NO. 300 - A/2, NAGPUR-440001

MY OLD NAME WAS **NEHA THAKURDAS KHIYANI.** NOW MY NEW NAME IS **PREETI SAGAR PANJWANI.** ADD: WARD NO. 39, DEOLI ROAD, NEAR MATA MANDIR, DAYAL NAGAR, WARDHA-442001

MY OLD NAME WAS **ALFIYA MAHAREEN SHEIKH / ALFIYA SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **ALFIYA MEHREEN SHEIKH.** OLD PASSPORT NUMBER IS **J6009429** ADD: PLOT NO.42, BEHIND HIMANSHU APARTMENT, SIDDARTH NAGAR,NAGPUR 440017



### जाहीरनामा

कोर्ट विद्यमान तहसिलदार, नरखेड यांचे कार्यालय
रा.मा.क्र. १६७/एम.आर.सी.८१/२०२५-२६
तहसिलदार नरखेड याचे कार्यालय,
ता. नरखेड जि. नागपूर

याव्दारे सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री शकील अहमद इस्माइल शरीफ रा. नागपूर ता. नागपूर जि. नागपूर यांनी त्यांचा स्वताया जन्म मौजा गुमगांव तह. नरखेड, जि. नागपूर येथे दिनांक १८/०५/१९५५ रोजी झाला असून शकील अहमद इस्माइल शरीफ हया नावांने जन्माची नोंद ग्रामपंचायत खराशी तह. नरखेड जि. नागपूर येथे घेण्यात आली नाही. करीता अर्जदाराने जन्माची नोंद होण्याबाबत आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

तरी नमुद व्यक्तीच्या जन्माच्या नोंदणीयावत ज्यांना आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी दिनांक २५/१२/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास लेखी स्वरूपात सादर करावे.

उपरोक्त तारखेपूर्वी, कोणाचाही कोणताही आक्षेप उजर प्राप्त झाला नाही तर सदर जन्मनोंद आदेश मंजूर करून निबंधक जन्म व मृत्यु ग्रामपुचायत खराशी तह. नरखेड जि. नागपूर यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जाहीरनामा आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझे सही व या कार्यालयाचे शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात आला.

(दिनांक १०/१२/२०२५)
तहसिलदार, नरखेड



### जाहीरनामा

कोर्ट विद्यमान तहसिलदार, नरखेड यांचे कार्यालय
रा.मा.क्र. १६८/एम.आर.सी.८१/२०२५-२६
तहसिलदार नरखेड यांचे कार्यालय,
ता. नरखेड जि. नागपूर

याव्दारे सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती अनिसा बेगम हिदायत उल्लाखान रा. नागपूर ता. नागपूर जि. नागपूर यांनी त्यांचा स्वताचा जन्म मौजा गुमगांव तह. नरखेड, जि. नागपूर येथे दिनांक २७/१०/१९५६ रोजी झाला असून अनिसा फातेमा मोहमंद इस्माईल शरीफ हया नावांने जन्माची नोंद ग्रामपंचायत खराशी तह. नरखेड जि. नागपूर येथे घेण्यात आली नाही. करीता अर्जदाराने जन्माची नोंद होण्याबाबत आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे

तरी नमुद व्यक्तीच्या जन्माच्या नोंदणीबाबत ज्यांना आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी दिनाक २५/१२/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास लेखी स्वरूपात सादर करावे.

उपरोक्त तारखेपूर्वी, कोणाचाही कोणताही आक्षेप उजर प्राप्त झाला नाही तर सदर जन्मनोंद आदेश मंजूर करून निबंधक जन्म व मृत्यु ग्रामपंचायत खराशी तह. नरखेड जि. नागपूर यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येईल यानी नोंद घ्यावी.

जाहीरनामा आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझे सही व या कार्यालयाचे शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात आला.

(दिनांक १०/१२/२०२५)
तहसिलदार, नरखेड



### जाहिरनामा

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
Email ID : tahsildarngpcity@gmail.com
दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
प्र.क्र. ५२/प्रस्तु-३/तह. नाग (शहर)/कावि -९४१/२०२५ दि.: २३/१२/२०२५

वाचा :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च. २०२५ नुसार २. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.०३/ई-१अ.दि.१७/३/२०२५.३.मा. जिल्हा-धिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/ जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ ४. अर्जदार सागर किशोर सामनकर राह पाचपावली शंकर मंदीर जवळ डॉ. आंबेडकर मार्ग नागपूर १७ मो.नं.९१७९८६१३१६

ज्याअर्थी अर्जदार सागर किशोर सामनकर राह पाचपावली शंकर मंदीर जवळ डॉ. आंबेडकर मार्ग नागपूर १७ मो.नं. ९१७९८६१३१६ यांनी जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी नामे सागर किशोर सामनकर जन्म दिनांक ३१/१०/२००१ रोजी डागा हॉस्पिटल नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्मचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मा बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अुवा अन्य मार्गाने या



### जाहिरनामा

महसूल व वनविभाग
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर (शहर)
जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण पिनकोड-४४०००१
Email ID : tahsildarngpcity@gmail.com
दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क्र.म. सहा/प्रस्तु-२/तह. नाग (शहर)/कावि -८११/२०२५ दि.: ०९/१२/२०२५

वाचा :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च. २०२५ नुसार २. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.०३/ई-१अ.दि.१७/३/२०२५.३.मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/ जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ ४. मुमताज बेगम मो.इस्लाम रा. अजनी रेल्वे कॉलोनी नागपूर यांचा अर्ज दिनांक २१/११/२०२५

ज्याअर्थी अर्जदार मुमताज बेगम मो.इस्लाम रा. अजनी रेल्वे कॉलोनी नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू मुमताज बेगम मो.इस्लाम यांचा जन्म दिनांक २५/०९/१९७७ रोजी अजनी रेल्वे कॉलोनी नागपूर राहत्या घरी झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्मचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मा बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.



RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३**

# आता रात्री उशिराही खुले राहणार सर्वोच्च न्यायालय

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली,, दि. ३१ :



भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी न्यायप्रणाली अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. कायदेशीर आणीबाणीचा सामना करणारे नागरिक, तसेच रात्री उशिरा तपास संस्थांकडून अटक होण्याची शक्यता असलेले लोक आपल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी मध्यरात्रीसुद्धा सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयांचे दार ठोठावू शकतील, असे त्यांनी सांगितले. अशा आपत्कालीन परिस्थितीत कामकाजाच्या वेळेपुरते मर्यादित न राहता, गरज भासल्यास कोणत्याही वेळी न्यायालयात अपील करता येईल, अशी व्यवस्था उभारण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रलंबित घटनात्मक याचिकांचा निपटारा वेगाने करण्यासाठी अधिकाधिक घटनात्मक खंडपीठे स्थापन करणे हे आपले प्राधान्य असल्याचेही सरन्यायाधीशांनी नमूद केले. या याचिकांमध्ये अनेक महत्त्वाचे घटनात्मक प्रश्न उपस्थित झाले असून, त्यात बिहारमध्ये सुरू झालेल्या आणि आता अनेक राज्यांमध्ये राबवण्यात येत असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रियेच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांचाही समावेश आहे. धार्मिक स्वातंत्र्य आणि महिलांच्या हक्कांमधील संघर्षाशी संबंधित प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी नऊ न्यायाधीशांचे खंडपीठ स्थापन करता येईल का, याचाही विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायालयीन कामकाज अधिक शिस्तबद्ध करण्याच्या दृष्टीने वकिलांना युक्तिवादासाठी अमर्याद वेळ देण्याची पद्धत बंद करण्याचा निर्णयही त्यांनी घेतला आहे.

यापुढे युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी कठोर वेळमर्यादा लागू केल्या जातील. अंबानी बंधूंमधील वादासारखा, ज्यामध्ये तब्बल २६ दिवस युक्तिवाद झाले, तसा प्रकार पुन्हा घडू नये, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

गरिब याचिकाकर्त्यांना केवळ मोफत कायदेशीर मदत मिळणे पुरेसे नाही, तर त्यांच्या प्रकरणांना देखील न्यायालयात समान वेळ आणि महत्त्व मिळाले पाहिजे, यावर सरन्यायाधीशांनी भर दिला. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना कलम ३७०, देशद्रोह कायदा आणि पेगासस प्रकरण यांसारख्या अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये निर्णायक भूमिका बजावली आहे. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांनी भारताचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली असून, त्यांचा कार्यकाळ ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहणार आहे.

# खाटूश्याम मंदिर ७२ तास दर्शनासाठी सुरु

■ वृत्तसंस्था, जयपूर, दि. ३१ :



राजस्थानमधील खाटूश्याम जी मंदिरात नववर्ष मेळा जोरात सुरू आहे. देश-विदेशातून लाखो भाविक बाबा श्यामाचे दर्शन घेण्यासाठी आले असून, मंदिर समितीने भाविकांसाठी विशेष व्यवस्था केली आहे. मेळ्यादरम्यान मंदिर २४ तास खुले राहील आणि भाविक सलग ७२ तास दर्शन घेऊ शकतील. व्हीआयपी दर्शनाची व्यवस्था सध्या रद्द असून, सर्व भाविक सामान्य पद्धतीने दर्शन घेत आहेत.

सुरक्षा, गर्दी नियंत्रण आणि पार्किंगसाठी प्रशासनाने व्यापक तरतूद केली आहे. रिंगस-खाटू मार्ग वाहनांसाठी बंद राहणार असून, सुरक्षित आणि सुव्यवस्थित दर्शनासाठी स्वतंत्र प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहेत. मंदिरातील सजावट देश-विदेशातून आणलेल्या फुलांनी केली असून, भक्तांचा उत्साह पाहण्यासारखा आहे. श्री श्याम मंदिर समितीचे मंत्री मानवेंद्र सिंह चौहान म्हणाले की, मंगळवारपासून गुरुवारपर्यंत तीन दिवस मंदिर सतत खुलं राहील. या कालावधीत दररोज पाच आरत्या पार पाडल्या जातील, तसेच रात्री दोन तास वगळता मंदिर दर्शनासाठी खुले राहणार आहे. भाविक व्यवस्थित पद्धतीने मंदिरात जाऊन नववर्षाचा आनंद घेऊ शकतील.

सामान्य दिवसांमध्ये मंदिर सोमवार ते शुक्रवार दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत आणि शयन आरतीनंतर रात्री बंद असते. मात्र, मेळ्यादरम्यान अपेक्षित गर्दी आणि भक्तांची श्रद्धा लक्षात घेऊन मंदिर समितीने दिवस आणि रात्र खुले ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अंदाजे ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी दरम्यान ६,००,००० भाविक दर्शनासाठी येतील. गर्दी व्यवस्थापनासाठी रिंगस-खाटू रस्ता पूर्णपणे वाहन-मुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे.

# चालत्या कारमध्ये विवाहितेवर गँगरेप

■ वृत्तसंस्था, फरीदाबाद, दि. ३१ :

हरियाणातील फरीदाबादमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दोन तरुणांनी चालत्या गाडीत २५ वर्षीय विवाहित महिलेवर सामूहिक बलात्कार केला. तिने प्रतिकार केला तेव्हा त्यांनी तिला बेदम मारहाण केली आणि नंतर तिला रस्त्याच्या कडेला फेकून दिले, ज्यामुळे ती अडकून पडली. गंभीर अवस्थेत महिलेला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पीडितेच्या बहिणीच्या म्हणण्यानुसार, महिला रात्री १२:०० वाजता घरी जाण्यासाठी गाडीची वाट पाहत होती. दोन तरुणांना घेऊन जाणारी मारुती सुझुकी इको व्हॅन थांबली तेव्हा त्यांनी तिला लिफ्ट देऊ केली. ती चढताच व्हॅन गुरुग्राम-फरीदाबाद रस्त्याच्या दिशेने वेगाने निघाली. असा आरोप आहे की दोघांनी तिच्यावर गाडीत बलात्कार केला आणि सुमारे दोन तास तिला फिरवले. पीडितेच्या बहिणीच्या म्हणण्यानुसार, महिलेने प्रतिकार केला, परंतु त्यांनी तिला मारहाण केली. पहाटे ३:०० वाजताच्या सुमारास त्यांनी तिला चालत्या व्हॅनमधून फेकून दिले. तिच्या चेहऱ्यावर आणि डोक्यावर गंभीर दुखापत झाली, ज्यामुळे डॉक्टरांना तिचा चेहऱ्यावर टाके लावावे लागले.

जखमी महिलेने तिच्या बहिणीला मदतीसाठी बोलावले. ती घटनास्थळी पोहोचली आणि तिला रुग्णालयात घेऊन गेली. सुरुवातीला तिला फरीदाबाद सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, नंतर तिची प्रकृती बिघडल्याने एका खाजगी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. डॉक्टरांनी तिला साक्ष देण्यास अयोग्य घोषित केले. बहिणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(ड) (सामूहिक बलात्कार), ३२३ (हल्ला) आणि ३४ (सामान्य हेतू) अंतर्गत आरोप ठेवण्यात आले आहेत. गुन्हे शाखेने दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले आहे आणि व्हॅन जप्त केली आहे.

# चमोलीमध्ये बोगद्यात दोन लोको ट्रेनची टक्कर, ७० जण जखमी

■ वृत्तसंस्था, चमोली, दि. ३१ :

उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात एक मोठा अपघात झाला आहे. पिपलकोटी येथील टिहरी हायड्रो डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या बोगद्यात कामगारांना घेऊन जाणाऱ्या दोन लोको ट्रेन एकमेकांवर आदळल्या. या अपघातात सत्तर कामगार जखमी झाले. मंगळवारी रात्री १० वाजता शिफ्ट बदलताना हा अपघात झाला. दोन्ही ट्रेनमध्ये १०८ कामगार होते.

तांत्रिक बिघाडामुळे मागून एक ट्रेन दुसऱ्या ट्रेनवर आदळल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आत असलेले कामगार स्वतःवर नियंत्रण ठेवू शकले नाहीत आणि अनेक जण आत फेकले गेले. या धडकेमुळे बोगद्यात ओरड आणि घबराट पसरली, कामगारांना बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नव्हता. अधिकारी सध्या घटनास्थळाची पाहणी करत आहेत आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अपघाताची माहिती मिळताच प्रकल्प व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मदत आणि बचाव कार्य सुरू केले. जखमींना रुग्णवाहिका आणि इतर वाहनांनी गोपेश्वर जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले की, बहुतेक कामगारांना किरकोळ दुखापत झाली आहे, तर काहींना गंभीर दुखापतींमुळे विशेष निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. जखमी झालेल्या ४२ कामगारांवर गोपेश्वर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## २०२५ च्या अखेरीस भारताची मोठी झेप
# जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला भारत

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३१ :

भारताच्या विकासप्रवासात २०२५ हे वर्ष निर्णायक ठरले आहे. या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेला बळ मिळाले, रोजगारस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली, महागाईचा दबाव कमी झाला आणि निर्यातीला स्थैर्य लाभले. या सकारात्मक घडामोडींमुळे भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले आहे.



चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात ८.२ टक्के वाढ नोंदवण्यात आली. ही वाढ प्रामुख्याने मजबूत देशांतर्गत मागणीमुळे शक्य झाली. नोव्हेंबर २०२५ मध्ये बेरोजगारीचा दर घटून ४.७ टक्क्यांवर आला. विशेषतः महिलांच्या बेरोजगारीत झालेली मोठी घट यामागील महत्त्वाची कारणे ठरली. याच काळात व्यापार आणि निर्यात क्षेत्रातही सकारात्मक वातावरण दिसून आले. नोव्हेंबर २०२५ मध्ये भारताची निर्यात ३८ अब्ज डॉलर्सच्या पुढे गेली, जी जानेवारी महिन्यात सुमारे ३६ अब्ज डॉलर्स इतकी होती. २०२५ दरम्यान ब्रिटन, ओमान आणि न्यूझीलंड यांसारख्या देशांशी व्यापार भागीदारी अधिक मजबूत करण्यात आली, त्यामुळे जागतिक बाजारपेठेत भारताची उपस्थिती वाढली असून नव्या आणि उदयोन्मुख बाजारपेठांपर्यंत पोहोच सुलभ झाली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळणारा सातत्यपूर्ण विश्वास, भक्कम देशांतर्गत मागणी, घटती बेरोजगारी आणि नियंत्रणात येत असलेली महागाई यामुळे भारत २०४७ पर्यंतच्या विकास उद्दिष्टांच्या दिशेने स्थिर आणि भक्कम वाटचाल करण्याच्या स्थितीत पोहोचला आहे.

२०२५ मध्ये देशाच्या सुधारणांबद्दलच्या एका सरकारी प्रकाशनात म्हटले आहे - "४.१८ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या सकल देशांतर्गत उत्पादनासह (जीडीपी) भारताने जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली आहे आणि पुढील २.५ ते ३ वर्षांत जर्मनीला तिसऱ्या स्थानावरून मागे टाकून २०३० पर्यंत ७.३ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या अंदाजे जीडीपीसह ते स्थान मिळवण्यास सज्ज आहे."

# जम्मू-काश्मीरमध्ये हाय अलर्ट

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. ३१ :

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षा यंत्रणा कमालीच्या सतर्कतेत ठेवण्यात आल्या आहेत. नियंत्रण रेषेवर वाढत्या हालचाली लक्षात घेता संपूर्ण ७४० किलोमीटर लांबीच्या एलओसीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार सीमेपलीकडील सुमारे ६० लाँचपॅडवरून शंभरहून अधिक दहशतवादी घुसखोरीच्या तयारीत असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ही घुसखोरी नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला होण्याची शक्यता असल्याने भारतीय लष्कर आणि सीमा सुरक्षा दलांनी सुरक्षा व्यवस्था अधिकच कडक केली आहे. डोंगराळ आणि अत्यंत कठीण भूप्रदेशात, सुमारे १३ हजार फूट उंचीवरही अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला असून बीएसएफचे जवान दिवसरात्र पहारा देत आहेत.

# आर्थिक देणग्यांमुळे निकोप लोकशाहीचे व कायद्यांचे अस्तित्व धोक्यात?

सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी २०२४ मध्ये निवडणूक रोखे योजनेला नियम बाह्य ठरवून ती योजना खारिज केली. तरीही भाजपच्या निधी संकलनात लक्षणीय वाढ झालेली आढळून आली आहे. निवडणूक रोखेद्वारे देणग्या देण्याची योजना रद्द झाल्यानंतर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात लोकसभेच्या निवडणुका झाल्या. त्याच वर्षात भाजपला ६०८८ कोटी रूपयांच्या देणग्या प्राप्त झाल्या. ही रक्कम २०२३-२४ मध्ये मिळालेल्या ३९६७ कोटी रूपयांच्या देणग्यांपेक्षा सुमारे ५३ टक्क्यांनी जास्त आहेत. भाजपला मिळालेल्या देणग्या बाबतची नोंद पक्षाच्या २०२४-२५ वर्षीच्या देणग्या विषयक अहवालात नमुद करण्यात आली आहे.



मिलिंद गड्डमवार, राजुरा
मो.क्र. ९५११२१५२००

बीजेपीच्या तुलनेत काँग्रेस पक्षाला ५२२ कोटी रुपए मिळाले आहे.सन २०२३-२४ मध्ये मिळालेल्या ११२९.६६ कोटी रूपयांच्या रकमेपेक्षा अर्ध्याहून कमी आहे. ही पक्षाच्या देणगी मध्ये झालेली लक्षणीय घट आहे. काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या योगदान अहवालानुसार ५२२.१३ कोटींपैकी ६० टक्के म्हणजे ३१३.७६ कोटी रुपए इतकी रक्कम निवडणूक रोख्यांमधून प्राप्त झाली आहे.

सन २०२४-२५ मध्ये निवडणूक रोख्यांद्वारे मिळालेल्या देणगीतील निम्म्याहून अधिक रक्कम ही टाटा, ओ पी जिंदाल समुह, एल अँड टी, मेघा इंजिनिअरिंग, अशोक लेलँड, डीएलएफ, महिंद्रा या कंपन्यांनी दिली आहे. या आर्थिक वर्षात राजकीय पक्षांना एकूण ३८११.३७ कोटी रुपए देणगी देण्यात आली . या कंपन्यांनी मिळून २१०७ कोटींची देणगी दिली. केंद्राने निवडणूक रोख्यांतून मिळालेल्या रकमेची माहिती ही आरटीआय-९५ कायद्या अंतर्गत मिळणार नाही याची तरतूद करून ठेवली होती. येथेच शंकेची पाल चुकचुकली होती. जनता यापासून अनभिज्ञ नव्हती. परंतु कायद्याने जनतेचे हात बांधले गेले होते. यांस सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने छेद दिला गेला. तरीही रोपूट बाकडे ते बाकडेच राहिलेले दिसून येते आहे. या प्रकारामुळे लोकशाही ही भांडवलशाहीच्या दावणीला बांधली गेली आहे. असे लक्षात येते आहे. केंद्र सरकार शेतक-यांबाबत का दुजाभाव करते आहे? याचे उत्तर यात दडलेले आहे. हे यावरून कळून येते आहे. कुठलेही शेतकरी हे निवडणूक बॉण्ड खरेदी करीत नाहीत. कारण त्यांना याची गरज पडत नाही. कृषी व्यवहाराला कुठलाही कर लागत नाही.

शेतक-यांचा व्यवसाय हा नंबर दोनचा नाही. शेतीचे पीक हे आआआण ५२ कशी सोने असते. यात मुळतः कुठलीही भेसळ नसते. यात नंतर भेसळ करून व्यापारी बारमाप किंमत आकारतात ही बाब वेगळी. त्यांना त्यांच्या वस्तूची विक्री किंमत ठरवता येते. परंतु शेतक-यांना स्वतःच्या मालाची किंमत ठरविता येत नाही. ही विडंबना केंव्हा दूर होणार आहे? व्यावसायिक, उद्योगपती यांचे पक्षीय निधी बरेच योगदान असते. कुठलेही धंदेवाईक, उद्योगपती हे बोर देऊन आवळा काढण्यात पटाईत असतात. ते सरकारकडून सरकारी जमीन हडपतात. यावर आपले उद्योग उभारतात. मोठ मोठे कर्ज घेतात आणि स्वतः जवळील पैसा खर्च न करता सरकारी अनुदानातून आपला उद्योग उभारतात. जेणेकरून उद्याला उद्योग डबघाईला गेला तरी आपल्याला याची झळ पोहचणार नाही याची काळजी घेतात. पक्षीय देणग्यांमुळे राज्यकर्ते त्यांच्या धोरणाविरोधात सहसा जात नाहीत. याचा फटका सामान्य जनतेला बसतो आहे. गडचिरोली सारख्या भागात पेसा कायदा गुंडाळून ठेवून कामे होत आहेत. उद्योजक आपले उद्योग उभारताना पर्यावरणाविरोधात भूमिका घेतात. तरीही केंद्र व राज्य सरकार त्यांना वाटेल ती मदत करण्यास तयार असतात. याच कारणाने लोकशाहीतील कायदे हे पायदळी तुडवले जात आहेत. पक्षीय फंडाचा वापर करून जनतेची मते ही निवडणुकीत खरेदी केली जात आहेत.

पैशातून सत्ता अन सत्तेतून पैसा या विचाराचा पगडा यामुळेच प्रबल झाला आहे. ही लोकशाही प्रक्रियेला लागलेली कीड आहे. यामुळे लोकशाही प्रक्रीया धोक्यात आली आहे. निवडणुकीचा खर्च लाखांमध्ये, करोडोंमध्ये केला जातो आहे. मग सामान्य व गरीब जनता हा पैसा कुठून आणणार? यासाठी तीला कुठल्यातरी पक्षाचाच आधार हा घ्यावा लागतो आहे. हा प्रश्न सर्वांना पडला पाहिजे. हे न पटेल. याचा विचार कोण करणार आहे? यामध्ये बदल घडवून आणण्याचे आव्हान आजच्या तरुणाईने स्विकारले पाहिजे. तरच भारतीय लोकशाही जीवंत असणार आहे. अन्यथा ती भांडवलदारांच्या हातचे बाहुले बनणार आहे. हे विसरून कसे चालेल.

# भीमा कोरेगाव शौर्य दिन
## सामाजिक समतेच्या संघर्षाची प्रेरणागाथा

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना केवळ लष्करी विजय किंवा पराभव म्हणून मर्यादित राहत नाहीत, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या, आत्मसन्मानाच्या आणि समानतेच्या संघर्षाचे प्रतीक बनतात. १ जानेवारी रोजी साजरा होणारा भीमा कोरेगाव शौर्यदिन ही अशीच एक ऐतिहासिक घटना आहे. १८१८ साली भीमा नदीच्या काठावर घडलेली भीमा कोरेगावची लढाई ही केवळ इंग्रज आणि पेशवाई यांच्यातील संघर्ष नव्हता, तर तो तत्कालीन सामाजिक विषमतेविरुद्ध उभा राहिलेल्या शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या आत्मसन्मानाचा लढा होता. म्हणूनच हा दिवस केवळ इतिहासातील एक पान नसून, आजही सामाजिक समतेच्या संघर्षाला दिशा देणारा प्रेरणास्तंभ आहे.




पेशवाईच्या काळात भारतीय समाजावर कडव्या जातिव्यवस्थेचे जाचक ओझे होते. विशेषतः महार, मांग, चांभार यांसारख्या दलित समाजघटकांवर अमानवी निर्बंध लादले गेले होते. सार्वजनिक विहिरी, मंदिरे, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानवी हक्क यांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले होते. अशा स्थितीत पेशवाईविरोधात उभे ठाकलेले महार समाजातील सैनिक इंग्रज सैन्यात सहभागी झाले आणि त्यांनी भीमा कोरेगावच्या रणांगणावर पराक्रम गाजवला. संख्येने कमी असूनही त्यांनी पेशव्यांच्या बलाढ्य सैन्याला रोखले. या विजयाने दलित समाजाला केवळ लष्करी यश मिळाले नाही, तर त्यांनी सामाजिक अपमानाच्या इतिहासाला छेद दिला.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भीमा कोरेगावची लढाई ही सत्ता, जात आणि प्रतिष्ठा यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. तत्कालीन सामाजिक रचना ही सत्ताधारी उच्चवर्णीयांच्या बाजूने झुकलेली होती. पेशवाई ही केवळ राजकीय सत्ता नव्हती, तर ती धार्मिक-सामाजिक वर्चस्वाचीही प्रतिनिधी होती. अशा व्यवस्थेविरुद्ध उभा राहणे म्हणजे केवळ युद्ध जिंकणे नव्हे, तर सामाजिक मानसिकतेला आव्हान देणे होते. महार सैनिकांनी हे आव्हान स्वीकारले आणि इतिहासात आपले नाव कोरले.

या घटनेचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला मानवंदना दिली. त्या दिवसापासून भीमा कोरेगाव शौर्यदिनाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. डॉ. आंबेडकरांसाठी हा विजय ब्रिटिशांच्या बाजूने मिळालेला लष्करी यश नव्हता, तर तो अस्पृश्यतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या आत्मसन्मानाचा विजय होता. त्यांनी या घटनेचा उपयोग दलित समाजात स्वाभिमान, संघटन आणि संघर्षाची चेतना निर्माण करण्यासाठी केला.

भीमा कोरेगाव शौर्यदिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व समजून घेताना स्मृती-राजकारण या संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणता इतिहास सांगितला जातो, कोणता दडपला जातो आणि कोणाच्या स्मृती जपल्या जातात, यावर समाजाची दिशा ठरते. पारंपरिक इतिहास लेखनात दलित, स्त्रिया आणि वंचित समाजघटकांचे योगदान दुर्लक्षित राहिले. भीमा कोरेगावची आठवण ही या दुर्लक्षित इतिहासाला केंद्रस्थानी आणणारी आहे. म्हणूनच हा दिवस केवळ भूतकाळाची आठवण नाही, तर इतिहास पुन्हा मांडण्याचा सामाजिक प्रयत्न आहे.

आज भीमा कोरेगाव शौर्यदिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. देशभरातून लाखो लोक या ठिकाणी एकत्र येतात. ही केवळ श्रद्धांजली नसून, ती एक सामाजिक जाणीव आहे. या एकत्र येण्यामागे समानतेची आकांक्षा, संविधानिक मूल्यांची निष्ठा आणि अन्यायाविरुद्धचा आवाज दडलेला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा मेळावा सामूहिक ओळख निर्माण करतो. जात, वर्ग, प्रदेश यापलीकडे जाऊन लोक एकमेकांशी जोडले जातात.

मात्र, भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या संदर्भात उद्भवणारे वाद आणि संघर्षही समाजशास्त्रीय विश्लेषणाची मागणी करतात. काही घटकांना हा दिवस अस्वस्थ करतो, कारण तो पारंपरिक सत्तासंरचनांना प्रश्न विचारतो. इतिहासाचे वेगवेगळे अर्थ लावले जातात आणि स्मृतींवर अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष होतो. या पार्श्वभूमीवर, समाजात संवाद, समज आणि सहअस्तित्वाची गरज अधोरेखित होते. भीमा कोरेगावची प्रेरणा संघर्षाची असली, तरी तो संघर्ष मानवी मूल्यांसाठी आहे, द्वेषासाठी नव्हे.

आजच्या काळात, जेव्हा संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि लोकशाहीवर विविध प्रकारचे आव्हाने येत आहेत, तेव्हा भीमा कोरेगाव शौर्यदिन अधिकच महत्त्वाचा ठरतो. हा दिवस आपल्याला सांगतो की अधिकार सहज मिळत नाहीत; त्यासाठी संघटित संघर्ष करावा लागतो. दलित समाजाचा हा इतिहास केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण भारतीय लोकशाहीच्या प्रवासाचा भाग आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत आजही असमानता दिसून येते. भीमा कोरेगावची आठवण ही या असमानतेविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देते. समाजशास्त्रीय दृष्टीने, हा दिवस सामाजिक गतिशीलतेचा संदेश देतो. इतिहासात दडपल्या गेलेल्या समाजघटकांनी शिक्षण, चळवळ आणि संविधानाच्या माध्यमातून आपले स्थान बदलू शकते, हे भीमा कोरेगावचे प्रतीक आहे.

म्हणूनच, भीमा कोरेगाव शौर्यदिन साजरा करताना केवळ भूतकाळाचा गौरव न करता वर्तमान आणि भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. जातीय द्वेष, सामाजिक बहिष्कार आणि असमानता यांना नकार देत, समतेवर आधारित समाज उभारण्याचा संकल्प करण्याची ही वेळ आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक मूल्यांच्या चौकटीत राहून, लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची प्रेरणा भीमा कोरेगाव आपल्याला देते. अखेरीस असे म्हणता येईल की, भीमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ एका लढाईचा स्मृतिदिन नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या दीर्घ संघर्षाचा प्रतीकात्मक उत्सव आहे. हा दिवस आपल्याला इतिहासातून शिकवतो की, अन्याय कितीही खोल रुजलेला असला, तरी संघटित इच्छाशक्ती, आत्मसन्मान आणि समानतेची जाणीव त्याला आव्हान देऊ शकते. म्हणूनच १ जानेवारी हा दिवस शौर्याचा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या अखंड प्रवासाचा साक्षीदार ठरतो.

# जर्मनीच्या बँकेतून २९० कोटींची चोरी

■ वृत्तसंस्था, बर्लिन, दि. ३१ :


जर्मनीतील गेल्सेंकिर्चेन शहरात असलेल्या स्पार्कस बँकेत २९० कोटी रुपयांची चोरी झाली. चोरांनी बँकेच्या पार्किंग गॅरेजच्या भिंतीला मोठे भगदाड पाडले आणि थेट तिजोरीपर्यंत पोहोचले. त्यानंतर त्यांनी ३,२५० हून अधिक सेफ डिपॉझिट लॉकर तोडले आणि त्यातील रोकड व मौल्यवान दागिने घेऊन पळ काढला. पोलिसांनुसार, चोरांनी ही चोरी ख्रिसमसच्या सुट्ट्यांमध्ये केली, जेव्हा बहुतेक दुकाने आणि कार्यालये बंद होती. असे मानले जात आहे की, गुन्हेगारांनी हा काळ जाणूनबुजून निवडला जेणेकरून कोणालाही संशय येऊ नये आणि परिसरात लोकांची वर्दळही कमी असावी.

# भीमा कोरेगावची शौर्यगाथा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

१ जानेवारी १८१८ रोजी पुण्याजवळील भीमा कोरेगाव येथे घडलेली लढाई ही केवळ दोन सैन्यांमधील संघर्ष नव्हता, तर ती सामाजिक अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या शोषितांच्या आत्मसन्मानाची ऐतिहासिक साक्ष आहे. पेशवाईच्या अन्यायी, जातीय वर्चस्वशाही व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्या महार सैनिकांनी दाखवलेले शौर्य आजही सामाजिक समतेच्या लढ्याचे प्रेरणास्थान आहे.



या युद्धात ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यातील महार समाजातील सैनिकांनी पेशव्यांच्या प्रचंड सैन्याचा पराभव केला. संख्येने कमी असूनही त्यांनी दाखवलेले धैर्य, शिस्त आणि आत्मविश्वास हा इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. पेशवाईच्या काळात ज्यांना अस्पृश्यतेचे, अन्यायाचे आणि अपमानाचे जीवन जगावे लागले, त्याच समाजाने रणांगणावर विजय मिळवून अन्यायाच्या व्यवस्थेला आव्हान दिले.हीच शौर्यगाथा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नव्या अर्थाने समाजासमोर मांडली.



प्रमोद जांभूळकर
९८२३९६९०९७

बाबासाहेबांनी भीमा कोरेगावचा इतिहास केवळ गौरवासाठी नव्हे, तर स्वाभिमान, समानता आणि हक्कांच्या संघर्षाचे प्रतीक म्हणून मांडला. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी विजयस्तंभाला भेट देऊन या लढाईला सामाजिक क्रांतीचे अधिष्ठान दिले. डॉ. आंबेडकरांचे विचार स्पष्ट होते, इतिहास हा केवळ राजे-महाराजांचा नसतो, तर तो शोषित-वंचितांच्या संघर्षाचाही असतो. भीमा कोरेगावची गाथा ही बाबासाहेबांच्या विचारांशी पूर्णतः सुसंगत आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये त्यांच्या विचारांचा गाभा होता. सामाजिक गुलामगिरी, जातीय अन्याय आणि मानवी प्रतिष्ठेचा अपमान याविरुद्ध लढण्यासाठी बाबासाहेबांनी संविधानाचा मार्ग दिला. भीमा कोरेगावचा विजय हा त्या संघर्षाचा ऐतिहासिक आरंभ मानला जातो.

आज भीमा कोरेगाव हे केवळ एक युद्धस्थळ राहिलेले नाही, तर ते दलित अस्मितेचे, आत्मसन्मानाचे आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक बनले आहे. दरवर्षी लाखो अनुयायी येथे येऊन शहीदांना अभिवादन करतात. मात्र, या ऐतिहासिक स्मृतीभोवती वाद, हिंसा आणि राजकीय गैरवापर होण्याचे प्रकार घडत आहेत. हे प्रकार भीमा कोरेगावच्या मूळ आशयाला छेद देणारे आहेत.

आजच्या काळात गरज आहे ती बाबासाहेबांच्या विचारांकडे गांभीर्याने पाहण्याची. भीमा कोरेगावचा संदेश द्वेषाचा नसून समतेचा, न्यायाचा आणि संविधानिक मूल्यांचा आहे. इतिहासातून प्रेरणा घेऊन समाजात एकोपा, बंधुता आणि सामाजिक सलोखा निर्माण करणे हीच खरी आदरांजली ठरेल. भीमा कोरेगावची शौर्यगाथा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे एकमेकांना पूरक आहेत. शौर्याला विचारांची दिशा मिळाली आणि विचारांना इतिहासाचे बळ मिळाले. या दोन्हींचा संगम म्हणजेच समताधिष्ठित, न्यायपूर्ण आणि लोकशाही भारताच्या उभारणीचा मार्ग आहे.

# अनेक निष्ठावंतांचा भाजपाला रामराम

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :** शिस्तप्रिय पक्ष अशी ओळख असलेल्या भारतीय जनता पक्षासमोर महापालिका निवडणुकीत बंडखोरांचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. तिकीट न मिळाल्याने अनेक नाराज इच्छुकांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला तर काहींनी अन्य पक्षांकडून अर्ज दाखल केला.

महापालिका निवडणुकीमध्ये उमेदवारी मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. १६५० इच्छुकांनी भाजपकडे अर्ज करून मुलाखती दिल्या होत्या. यातून भाजपने ३०० उमेदवारांची निवड करण्यात आली. त्यातून १५१ उमेदवारांची निवड करण्यात आली.

अनेक इच्छुकांना उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे काहींनी छोट्या पक्षांकडून उमेदवारी अर्ज केले. तर काहींनी पक्षाकडून आणि अपक्ष असे दोन अर्ज भरले. बंडखोरांमध्ये भाजपचे नेते आणि माजी नगरसेवक राजू नागुलवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून उमेदवारी अर्ज भरला. याशिवाय भाजपचे हरीश दिकोंडवार, कमल मेहता, माजी नगरसेविका स्नेहल गिहारे यांनीही अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे बंडखोरांची समजूत काढणे हे आव्हान राहणार आहे.

**राजीनामा सत्र**

भाजप आणि शिवसेना शिंदे गटामध्ये युती झाली असली तरी नाराजांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे अनेक भागातील पदाधिकारी राजीनामे देत आहेत. भाजपचे आमदार कृष्णा खोपडे यांचा मुलगा रोहित खोपडे यांनी देवदत्त डेहनकर यांनी पक्षाने उमेदवारी नाकारल्याने पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. डेहनकर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटस्थ मानले जातात. माजी महापौर अर्चना डेहनकर यांना उमेदवारी नाकारल्याने त्या नाराज होत्या.

## शॉक देऊन वाघिणीची शिकार

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ३१ :** हिंगणघाट तालुक्यातील सेलू मुरपड ग्रामपंचायत अंतर्गत वैजापूर येथे धरणाच्या कालव्यात आज एक वाघ मृतावस्थेत आढळून आला. एका शेतकऱ्यास ते दिसून येताच त्याने वन विभागास याची सूचना दिली. हा पट्टेदार वाघ नसून वाघीण असल्याचे स्पष्ट झाले आहे. पशु वैद्यकीय डॉक्टर व वन अधिकारी तसेच वन्यजीव संरक्षण समिती सदस्य यांच्या उपस्थितीत मृतदेहाचे शव विच्छेदन करण्यात आले आहे.

वाघिनीचा मृतदेह दिसून येताच बघ्यांची तोबा गर्दी उसळली. त्यामुळे वन अधिकारी यांनी घटनास्थळी पोहचून मृतदेह ताब्यात घेतला. ही वाघीण वर्धा वन क्षेत्रातील नसल्याचे स्पष्ट झाले आहे. घटनास्थळ सेलू मुरपड हे चंद्रपूर पासून तीन किलो मिटर अंतरावर आहे.

त्यामुळे वाघीण त्याच परिसरात ठार झाली आणि मृतदेह या कालव्यात आणून टाकल्याची शंका व्यक्त होते. वाघीण या गावालागत आल्यानंतर परिसरातील शेताच्या कुंपनातील विद्युत प्रवाहाचा झटका लागल्याने वाघीण ठार झाली असावी, असेही म्हटले जाते. हरित लवादचे सदस्य व वन्यजीव रक्षक आशिष गोस्वामी यांनी सांगितले की ही तीन वर्षाची वाघीण आहे. करंट लागून मृत्यू झाला. बहुतेक अन्यत्र ठार झाल्यानंतर मृतदेह भीतीपोटी या ठिकाणी आणून टाकला असावा.

वाघिण आजारी असल्याने पाण्यात बुडून मृत झाल्याची प्राथमिक शंका आता दूर झाली आहे. संबंधित वन अधिकारी श्रीमती भलावी यांच्याशी संपर्क होवू शकला नाही. याप्रकरणी वनविभागाने तपास सुरू केला आहे.






















महासागर
नागपूर वृत्तसागर
▪ गुरुवार, दि.०१ जानेवारी २०२६ ▪





# संकल्पांची चेकलिस्ट 2026

या वर्षी मी फक्त दागिने खरेदी करणार नाही, तर अधिक चांगली निवड करणार.

- ☑ मी रोकडे ज्वेलर्स मधूनच दागिने खरेदी करणार, कारण इथून घेतलेले दागिने दीर्घकाळ टिकणारी समृद्धी देतात आणि येथील विवाह दागिने वैवाहिक नातं कायम मजबूत आणि अटूट ठेवतात.
- ☑ मी रोकडे ज्वेलर्स निवडणार, कारण येथे स्पष्ट दर असतात आणि बिलमध्ये प्रत्येक वस्तूचा स्वतंत्र तपशील दिलेला असतो. त्यामुळे पूर्ण पारदर्शकता मिळते.
- ☑ मी रोकडे ज्वेलर्स कडून BIS हॉलमार्क आणि HUID नंबर असलेले दागिने खरेदी करणार, ज्यामुळे शुद्धता, अस्सलपणा तसेच आयुष्यभर ट्रेसबिलिटी व पडताळणीची हमी मिळते.
- ☑ मी रोकडे ज्वेलर्सकडील दागिन्यांमध्ये गुंतवणूक करणार, कारण त्यांच्या सोने व हिऱ्यांच्या दागिन्यांवर आजीवन बायबॅकची गॅरेंटी आहे.
- ☑ मी माझं सोनं फक्त रोकडे ज्वेलर्सकडेच एक्सचेंज करणार, जिथे चालू बाजारभावानुसार सर्वोत्तम किंमत मिळते.
- ☑ आत्मविश्वासाने आणि योग्य माहितीच्या आधारे, दागिन्यांची खरेदी करण्यासाठी, मी रोकडे ज्वेलर्सच्या अनुभवी आणि सल्लागार टीमवर विश्वास ठेवणार.
- ☑ माझ्या डिझाइन कल्पनांना माझ्या अनोख्या शैलीनुसार साकार करण्यासाठी मी रोकडे ज्वेलर्सकडून कस्टम-मेड दागिने तयार करून घेणार.
- ☑ मी रोकडे ज्वेलर्स कडून खात्रीशीर आजीवन सर्व्हिस असलेले दागिने खरेदी करणार.
- ☑ मी रोकडे ज्वेलर्स कडून डायमंड दागिने खरेदी करणार कारण येथे मिळणारे हिरे नैसर्गिक आणि अस्सल आहेत.
- ☑ मी माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी खरे रत्ने रोकडे ज्वेलर्स कडून खरेदी करणार, जिथे तज्ञ ज्योतिष सल्ला मोफत दिला जातो.

**वर्षाची सुरुवात, वाढणाऱ्या मूल्यांसह खास!**
**थेट 25% सूट : गोल्ड सेव्हिंग प्लान 10+1**
**: डायमंड डिलाइट प्लान 10+2**
T&C APPLY*

ही ऑफर केवळ पहिल्या इंस्टॉलमेंटवर लागू असून, 1 जानेवारी 2026 रोजीच वैध आहे.

नागपूर : लक्ष्मीनगर | महाल | इतवारी | एअरपोर्ट | कोराडी | हिंगणा रोड. | आउटस्टेशन: भंडारा | गोंदिया
लवकरच: गडचिरोली | चंद्रपूर | यवतमाळ | टोल फ्री क्रमांक: 1800 268 1010

## काटोल बस स्टँडजवळील बाजार समितीची मोक्याची जागा विक्रीस काढण्याचा डाव

# ई-निविदा रद्द न झाल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ३१ :
येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोक्याच्या मालमत्तेची विक्री करण्याचा प्रकार उघडकीस येताच संतापाची लाट उसळली आहे. काटोल बस स्टँडलगत, शहरातील मुख्य रस्त्यावर असलेली भूमापन क्रमांक ३४११, क्षेत्रफळ ४२७५ चौरस फूट जागा ई-निविदेद्वारे विक्रीस काढण्यात आली असून, हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या हक्कांवर घाला घालण्याचा थेट प्रयत्न असल्याचा आरोप कृषी उत्पन्न बाजार समिती बचाव कृती समितीने केला आहे.



ही जागा भविष्यात शेतकऱ्यांसाठी शेतकरी भवन, वसतिगृह व अन्य सोयीसुविधांसाठी अत्यंत उपयुक्त असताना, विद्यमान संचालक मंडळाने केवळ कर्जाचे कारण पुढे करून जाणीवपूर्वक बाजार समितीची मालमत्ता विकण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप कृती समितीने केला आहे. बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न १.५० ते २ कोटी रुपये असताना शासनाकडून मिळालेल्या २० वर्ष मुदतीत कर्जाची परतफेड सहज शक्य आहे, तरीही ही जागा विक्रीस काढण्याचा घाट बाजार समितीने घातला आहे. या बाजार समितीत काटोल, नरखेड, हिंगणा, कारंजा, आर्वी तसेच मध्यप्रदेशातील सौसर, मुलताई, पांढुर्णा येथील हजारो शेतकरी अवलंबून असून बाहेर गावच्या शेतकऱ्यांच्या निवासाकरिता शेतकरी भवन व विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह होणे गरजेचे आहे मात्र काही ठराविक लोकांच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांची सामूहिक मालमत्ता विकण्याचा घृणास्पद डाव आखण्यात आल्याचा आरोप होत आहे.

या गंभीर प्रकरणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी, काटोल यांच्यामार्फत सविनय तक्रार देण्यात आली असून, सदर ई-निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करण्याची ठाम मागणी कृती समितीने केलेली आहे. मागणी मान्य न झाल्यास बाजार समिती बचाव कृती समितीच्या वतीने भविष्यात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी निवेदनातून देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांची मालमत्तेची लूट सहन केली जाणार नाही, असा इशारा देत हा निर्णय मागे घेतल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, अशी भूमिका कृती समितीने घेतली. यावेळी तारकेश्वर शेळके, दिगांबर डोंगरे, गणेश चन्ने, महेश चांडक, विजय कडू, अमित काकडे, दिनेश निंबाळकर, अजय लाडसे, नरेंद्र राऊत, डॉ. अनिल ठाकरे, वैशाली टालाटुले, दिनकर बाविस्कर, माधवराव अनवाने, दिपक पोहकर, अभिनय सातपुते, रमेश फिस्के, शिल्पकार सोमकुवर, निळकंठ गजभिये, एकनाथ डोबले, कौशल शेळके आदींनी घेतली आहे.

# वेदनेशिवाय सुख शक्य नाही : डॉ. नंदू मूलमुले

■ महासागर प्रतिनिधी
सावरगाव, दि. ३१ :
जीवनात दुःख आणि वेदना नसतील तर खऱ्या अर्थाने सुखाची निर्मिती होऊ शकत नाही, असे परखड मत प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. नंदू मूलमुले यांनी व्यक्त केले. बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, काटोल येथे आयोजित स्नेहसंमेलनाच्या विशेष सत्रात सुखाचा शोध या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन बनारसीदास रुईया हायस्कूल कमेटी, काटोल यांनी केले होते.



पाल्यांना अती सुविधा देण्याऐवजी त्यांना जीवनातील संघर्षांना सामोरे जाण्यास सक्षम बनवणे आवश्यक असल्याचे सांगत डॉ. मूलमुले म्हणाले की, अति सवलती आणि सुविधा देऊन आपण मुलांना मानसिकदृष्ट्या अपंग बनवत आहोत. प्रत्येक अडचणीवर मात करण्याची मानसिक तयारी आणि खडतर रस्त्यावर चालण्याची क्षमता निर्माण करणे हेच खऱ्या यशाचे सूत्र आहे.

आपल्या क्षमतेनुसार महत्त्वाकांक्षा ठेवणे, अस्तित्वाने दिलेल्या जीवनाचा स्वीकार करणे, इतरांच्या चुका मोठ्या मनाने क्षमा करणे आणि निसर्गनियमांचे पालन करणे, हाच खऱ्या सुखाचा मार्ग असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक यांच्या हस्ते डॉ. मूलमुले यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अजय खडसे यांनी केले. वक्त्यांचा परिचय सहसचिवसंकेत चांडक यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक हिरामण सोमकुंवर यांनी केले.

या वेळी माजी अध्यक्ष डॉ. गोविंद भुतडा, माजी सचिव जवाहरलाल चांडक, उपाध्यक्ष अशोक भुतडा, सचिव प्रकाश नबीरा, कोषाध्यक्ष डॉ. ओमप्रकाश अग्रवाल, प्राचार्या वंदना काळे, आय.एम.ए.चे डॉक्टर तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## किन्ही-शिवणी परिसरात वाघाचा धुमाकूळ

# बैल व गोऱ्ह्याची शिकार

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ३१ :
किन्ही गावालगत शेतशिवारात रविवारी (२८ डिसेंबर) पहाटेच्या सुमारास वाघाने एका बैलासह गोऱ्ह्याची शिकार केल्याची घटना घडली.



शेतकरी रामभाऊ निंबार्ते असे पशु मालकाचे नाव आहे. ते नेहमीच दोन बैल व गोरे शेतात बांधून ठेवायचे. नेहमीप्रमाणे आदल्या दिवशी सायंकाळी बैल व गोऱ्याला चारापाणी करून ते घरी परतले. पहाटेच्या सुमारास दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला चढविला. वाघाने या हल्ल्यात एक बैल व एका गोऱ्याला लक्ष्य केले. सकाळी शेतात पोहोचल्यावर जनावरे रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळून आली. घटनास्थळी पावलांच्या ठशांवरून हा हल्ला वाघाने केल्याची पुष्टी झाली.

शेतीकामासाठी महत्त्वाचे बैल व गोहे गमावल्यामुळे संबंधित शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

अगोदरच निसर्गाने त्रस्त शेतकरी, आर्थिक परिस्थितीने त्रस्त व त्यावर वाघाच्या हल्ल्यामुळे बैल व गोरा मृत झाल्याने शेती काम करायचे कसे ? हा प्रश्न सदर शेतकऱ्यासमोर आवासून उभा आहे. वन विभागाने दोन्ही हात वर करीत, तुमचं तुम्ही बघून घ्या अशी भूमिका स्पष्टपणे अगोदरच घेतलेली दिसून येते आहे. शासनाने पण यावर पाठ फिरविल्याचे चित्र सुस्पष्टरित्या शेतकऱ्यांना दिसून येते आहे.

थोडक्यात, तालुक्यामध्ये वाघांच्या वाढत्या वावरामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, वन विभागाकडून ठोस कारवाईची अपेक्षा आहे. परिसरात वाघाचा वाढता वावर पाहता नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# इंदिरा गांधी मगासवर्गीय मुलांचे वसतिगृहात वृक्षारोपण



■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. ३१ :
सहारा हेल्प फॉर यू फाउंडेशनच्या वतीने रविवार (दि.३०) डिसेंबर रोजी इंदिरा गांधी मगासवर्गीय मुलांचे वसतिगृह कन्हान येथे पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

वृक्ष लावा, पर्यावरण वाचवा या संदेशासह आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विविध प्रकारची वृक्ष लावण्यात आली. वाढते प्रदूषण, हवामान बदल व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षरोपण हे अत्यंत आवश्यक असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या उपक्रमात सहारा हेल्प फॉर यू फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला . लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी केला. कार्यक्रमाला वसतीगृहाचे अधिक्षक मनीष शंभरकर, प्रविण गोड्डे, राजेश गांजवे, सोनू खोबरागडे, योगेश मोहोड, संजय रंगारी, निखिल पाटिल, योगेश गड्डे, संदीप गजभिए, किशोर राऊत, सतीश उके यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विषयी मार्गदर्शन केले .

## श्री सद्गुरु दत्त कॉलेज ऑफ फार्मसी येथे औषधीय वनस्पतीचे वृक्षारोपण



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ३१ :
श्री सद्गुरु दत्त कॉलेज ऑफ फार्मसी कुही व रोटरी क्लब नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने फार्मसी कॉलेजच्या परिसरात औषधीय वनस्पतीचे वृक्षारोपण करण्यात आले. प्रसंगी उमरेड विधानसभा आमदार संजय मेश्राम, रोटरी क्लब चे साना पंडित, कॉलेजचे अध्यक्ष नितीन देशमुख, सचिव सचिन देशमुख, प्राचार्य दिनेश साखरकर, प्राचार्य अनिल धावडे, तसेच दिनेश देशमुख यांनी विविध प्रकारचे औषधीयुक्त वनस्पती चे वृक्षारोपण करून त्याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## निधन वार्ता

## सुगंधा कोचरे



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३१ :
येथील आदर्श नगर मधील सुगंधाबाई दमडुजी कोचरे यांचे निधन झाले. त्या ८० वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर टेकडी वाडी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आला.पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

## सौम्या दडमल नॅशनल डान्स चॅम्पियन

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ३१ :
महात्मा गांधी इंग्लिश मिडीयम हायस्कूल, वानाडोंगरी येथील विद्यार्थिनी सौम्या रामहरी दडमल हिने इंडियाज डान्स जनरेशन तर्फे आयोजित राष्ट्रीय सोलो नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. ही सर्धा स्कॉर्पिओन्स डान्स अकॅडमी तर्फे सागर मामिद्वार यांच्या मार्गदर्शनाखाली भद्रावती (जि. चंद्रपूर) येथे पार पडली.



सौम्याने यापूर्वीही अनेक मंचांवर आपल्या नृत्यकलेची छाप उमटवली आहे. तिने दिल्ली पब्लिक स्कूल, मिहान येथे बालगटात नृत्य कलाभूषण पुरस्कार तसेच सर्वश्रेष्ठ नर्तकीचा पुरस्कार मिळविला आहे. याशिवाय लोकप्रिय दूरचित्रवाणी वाहिन्यांवर प्रसारित होणाऱ्या डान्स दिवाने व सुपर डान्सर चॅप्टर ४ या स्पर्धांमध्ये मुंबई ऑडिशनपर्यंत पोहोचण्याचा मान तिने पटकावला आहे.

सौम्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे प्राचार्य धर्मेंद्र पारशिवनीकर, उपप्राचार्य दीपाली कोठे तसेच शिक्षकवृंद प्रीती धमगाये, माधवी वांधे, रामचंद्र वाणी, मंगला कठाणे, श्रद्धा इरतवार, माधुरी पवार, शालिनी सहारे, रुची पांडे, दीपिका नाटके, संध्या चवरे, माधुरी ताजने, ज्योती जेना, नाजुका मैस्कर, उमेश लोणारे, सुरज कृष्णन, नीरज माथंकर, प्रदीप कोहळे, मनीषा भुते, अंकिता झलके, मंजू वैरागडे, अनिता चौधरी, संगीता घुमारे, रोहिणी परील, सविता पाटील, सुजाता मेश्राम, कल्याणी बारेकर, मीनाक्षी मरसकोल्हे, वैष्णवी डागे आदींनी तिचे अभिनंदन केले.

## मालवाहतुकीतून कोटी रुपयांचे उत्पन्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :
मध्य नागपूर विभागाने अन्नधान्य, साखर, सिमेंट, लोहा, कोळसा आदींच्या मालवाहतुकीतून कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवून दिले आहे. याशिवाय नागपूर विभागाने बटाटा उत्पादकांना आकर्षित करण्याचे प्रयत्न चालविले असून त्यास यश मिळाले आहे. हिरदागड जंक्शनवरून ४२ बीसीएनची एक रेक सांकराईल (हावडा) गुड्स शेडकडे रवाना झाली. ११९८ किलोमीटर अंतरावर ही पहिली खेप पोहचली आणि मध्य रेल्वेला एकाच खेपमधून २८ लाखांचे भाडे मिळाले आहे.

रेल्वे प्रशासनाने आपल्या कार्यक्षेत्रातील विविध प्रकारच्या उत्पादनावर नजर रोखली आहे. यातून मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यात येणाऱ्या हिरदागड रेल्वे स्थानकाच्या आसपासच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात बटाट्याचे उत्पादन होत असल्याने या बटाट्याला पश्चिम बंगालसह पूर्वेकडील राज्यात मागणी वाढली आहे. अन्य वाहनांनी बटाटा रवाना जात असल्याने खर्च अधिक येतो, तर रेल्वेच्या माध्यमातून कमी खर्च येतो. मात्र वेगवेगळ्या कारणांमुळे बटाटे रेल्वेकडे पाठ फिरवून वेगवेगळ्या वाहनांनी वेगवेगळ्या प्रांतात जात होते. यंदा मात्र रेल्वे प्रशासनाने कसोशीने प्रयत्न केल्याने बटाटा उत्पादक रेल्वेतून माल वाहतूक करण्यास राजी झाले.

# पारशिवनी तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिवस उत्साहात साजरा



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ३१ :
पारशिवनी तहसील कार्यालय येथे राष्ट्रीय ग्राहक दिन ग्राहक पंचायत महाराष्ट्र व अन्न नागरी पुरवठा विभाग पारशिवनी यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार (दि.२९) डिसेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

नानांच्या (बिंदू माधव जोशी ) प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्राहक पंचायत महाराष्ट्र शाखा पारशिवनीचे अध्यक्ष सुनीता मानकर यांनी केले. ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या कार्याचा परिचय प्रस्ताविकातून सांगण्यात आले.

ग्राहक संरक्षण परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर सदस्य सौ.कांचनमाला मोरेश्वर माकडे यांनी ग्राहक फसवणुकीचे अनेक प्रकार, तक्रार निवारणाचे उपयोजना, ग्राहक आयोगाविषयी माहिती. ग्राहक संरक्षण कायदा २०१९ व या वर्षीच्या थीम नुसार मार्गदर्शन केले.

पारशिवनी तहसीलचे नायब तहसीलदार अमोल कांबळे यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना बिल घेतल्याशिवाय खरेदी करू नये. बिलाचा आग्रह धरावा तेव्हाच तक्रार दाखल करून निवारण करता येईल असे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन कर्मचारी उबाळे यांनी केले आणि आभार प्रदर्शन पुरवठा निरीक्षक स्नेहल देशमुख यांनी केले.

या प्रसंगी ग्राहक पंचायत महाराष्ट्र सचिव नागपूर जिल्हा ग्रामीण नथुजी वांढरे, अध्यक्ष मीना इंदुरकर, स्वस्त राशन दुकानदार व संघटना अध्यक्ष रुपेश बोंदे, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामपंचायत कर भरण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, सावरगाव, दि. ३१ :
राज्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या थकीत व चालू कर भरण्याची अंतिम तारीख सध्या ३१ डिसेंबर २०२५ अशी निश्चित करण्यात आली आहे. या कालावधीत कर भरल्यास नागरिकांना ५० टक्के सवलत देण्यात येत असली, तरी ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग सध्या तीव्र आर्थिक अडचणीत सापडलेला असल्याने कर भरणे शक्य होत नाही आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कर भरण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ व शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.

> राज्य सरकारने ग्रामपंचायत करावर ५० टक्के सूट देण्याचा निर्णय चांगला घेतला आहे. मात्र ग्रामीण भागातील शेतकरी सध्या आर्थिक अडचणीत असल्यामुळे कर भरण्याची मुदत वाढविणे गरजेचे आहे. मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढविल्यास अधिकाधिक नागरिकांना या सवलतीचा लाभ घेता येईल.
> **राजू गिरडकर**
> **माजी उपसरपंच,**
> **ग्राम पंचायत, सावरगाव**

ग्रामीण भागातील बहुतांश नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. यंदा अनेक ठिकाणी अपुरा पाऊस, वाढलेला उत्पादन खर्च, खत-बियाण्यांच्या वाढलेल्या किंमती, बाजारभावातील घसरण यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यातच सणासुदीचा खर्च, शालेय फी, घरगुती गरजा आणि कर्जाचे हप्ते यामुळे अनेक कुटुंबांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

अशा परिस्थितीत ग्रामपंचायत कर एकरकमी भरणे ग्रामीण भागातील शेतकरी व मजूर वर्गाला कठीण जात आहे. शासनाने जरी ५० टक्के करसवलत जाहीर केली असली, तरी मुदत कमी असल्याने अनेक गरजू नागरिक या सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. कर न भरल्यास नोटीस, दंडात्मक कारवाई किंवा शासकीय सेवा बंद होण्याची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा कर असला, तरी कर वसुली करताना ग्रामीण भागातील आर्थिक वास्तव लक्षात घेणे आवश्यक असल्याचे मत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. पुढील काही महिन्यांत रब्बी हंगामातील पीक हातात आल्यानंतर कर भरणे नागरिकांना अधिक सुलभ होईल, असे शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे.

त्यामुळे शासनाने संवेदनशील भूमिका घेत ग्रामपंचायत कर भरण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवावी, तसेच तोपर्यंत कोणतीही दंडात्मक कारवाई करू नये, अशी मागणी होत आहे. मुदतवाढ दिल्यास नागरिकांवरील आर्थिक ताण कमी होईल आणि कर वसुलीही अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्यावतिने नव्याने कार्यकारिणी निवड

■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. ३१ :
द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा संस्थापक बोधिसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रीय अध्यक्षा आदरणीय मीराताई यशवंत आंबेडकर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ.भीमराव यशवंत आंबेडकर व ट्रस्टी चेअरमन डॉ. हरिष रावलीया यांच्या निर्देशांच्या अनुशंगाने नागपूर जिल्हा पश्चिम शाखेची कार्यकारणी निवड/पुनर्गठन बैठक त्रिरत्न बुध्द विहार, हुडको कॉलनी कळमेश्वर येथे भारतीय बौद्ध महासभेचे ट्रस्टी तथा स्टाफ ऑफिसर केंद्रीय कार्यालय प्रमुख मुंबई एड. एस. के.भंडारे यांच्या मार्गदर्शनात आणि अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शाखा यु. जी. बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच केंद्रीय संघटक, इंजि. पद्माकर गणवीर, राज्य संघटक भीमराव फुसे, महिला शाखा पश्चिम अध्यक्षा इंदुताई रामटेके, महिला शाखा पूर्व पपिता खोब्रागडे, यांच्या प्रमुख उपस्थिती भारतीय बौद्ध महासभा नागपूर जिल्हा पश्चिम शाखा कार्यकारणीची निवड/पुनर्गठन सभा आयोजित करण्यात आली.



नवीन कार्यकारणी निवड करिता इच्छुकांचे आवेदन अर्ज भरून घेऊन निवड समितीच्या द्वारे मुलाखती घेवून रीतसर भारतीय बौद्ध महासभेची कार्य कारिणीची नियुक्ती केली. या बैठकी मध्ये सवानुमते भारतीय बौद्ध महासभा नागपूर जिल्हा पश्चिम शाखेच्या अध्यक्ष पदी सुधाकर सीताराम मेश्राम राहणार माळणी नगर नागपूर तर भारतीय बौद्ध महासभेचे नागपूर जिल्हा पश्चिम शाखा सरचिटणीस पदी प्रबोधनकार सतीश राजकुमार सोमकुवर राहणार इसासनी नागपूर यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच भारतीय बौद्ध महासभा नागपूर जिल्हा पश्चिम शाखा कोषाध्यक्ष म्हणून विलास उंदिरवाडे, उपाध्यक्ष (संस्कार) राहुल लक्ष्मण वानखेडे, उपाध्यक्ष (प्रचार व पर्यटन) आनंदराव हरिभाऊ सायरे, हिशोब तपासनी भीमराव चिंधुजी बोरकर, सचिव (प्रचार व पर्यटन) युवराज पिलाजी मेश्राम, सचिव (संरक्षण) यशवंत महादेव तामगाडगे, संघटक अशोक किसनाजी झामरे, संघटक परसराम मनिराम तभाने यांची सवानुमते निवड समिती द्वारे नियुक्ती करण्यात आली.

बैठकीला नागपूर जिल्हा पश्चिम शाखा तालुक्यातील- नागपूर ग्रामीण व बुट्टीबोरी, हिंगणा, कळमेश्वर, सावनेर, कोटोल, नरखेड येथील बौद्धाचार्य तुलाराम रामटेके, तालुका अध्यक्ष सिद्धार्थ शंभरकर, दिनेश पाटील, दीपक रामटेके, सुनील नगराळे, उद्धवजी बडगे, दिनेश पाटील, हरिदास गजभिये, चंद्रभान गायकवाड, प्रकाश आखरे, सिद्धार्थ वाघमारे, सुधाकर लोखंडे, सिद्धार्थ गोंडाने, ओमराज वासनिक, जयमाला तभाने, वंदना गजभिये, इंदिरा उंदिरवाडे, सुधा मेश्राम, अर्चना तागडे, अनंतराव सायरे, दिलीप उके, राजानंद मेश्राम, युवराज मेश्राम, शामराव बागडे, सुनील बागडे, बी. हिवराडे, अरुण वाहने, इंद्रकुमार तागडे, मोनाली तागडे, शारदा सोमकुवर, सुनीता देशभ्रतार, राजपाल बनसोड, विजय मेश्राम, शुद्धपाल गजभिये, भूषण वाघमारे आदी भारतीय बौद्ध महासभेचे सर्व पदाधिकारी संघटक, केंद्रीय शिक्षक/शिक्षिका बौद्धाचार्य प्रामुख्याने उपस्थित होते. नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकारी व संघटकांचे निवड समितीच्या वतीने स्वागत तथा अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# नियम आणि न्यायालयीन आदेश दुर्लक्षित?

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३१ :

खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक ९(४)(ब) व त्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी खाजगी शाळा शिक्षक संघटनेने केली आहे.

इसराईलखान पठाण, सहाय्यक शिक्षक, आदर्श विद्यालय सिहोरा, ता. तुमसर यांच्या पत्नी शारेकाफरहीन इसराईलखान पठाण यांना अनुकंपा तत्त्वावर शिक्षण सेवक पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावाबत खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक ९(४)(ब) तसेच उच्च न्यायालय याचिका क्रमांक ५७११/२०२३ अंतर्गत ६ नोव्हेंबर २०२३ व ९ नोव्हेंबर २०२३ रोजी दिलेल्या निर्णयाचा संदर्भ देण्यात आला. सदर निर्णयात खाजगी शाळांमध्ये शिक्षक नियुक्तीसाठी वयोमर्यादेचे बंधन लागू नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

हा निर्णय भंडारा जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंधित असून, त्यामध्ये नियम क्रमांक ९(४)(ब) चे स्पष्ट स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. त्यामुळे हा निर्णय वैयक्तिक स्वरूपाचा नसून सर्वसाधारणपणे लागू होतो, असे संघटनेचे म्हणणे आहे. यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मनीषा गजभिये यांनी श्रीमती पठाण यांच्या शिक्षण सेवक पदास मान्यता देताना सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. तसेच अनुकंपा नियुक्ती ही निवडणूक आचारसंहितेतून वगळण्यात आलेली असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या शिष्टमंडळात केंद्रीय सहसचिव प्रेमलाल मलेवार, जयंत पंचबुदधे, होमचंद्र वंजारी, रत्नदीप सिंग तोमर, असद शेख व प्रमोद रेवतकर उपस्थित होते.



## खाजगी शाळा शिक्षक संघाची मागणी

## श्रीराम मंदिरांमध्ये भक्तीचा जागर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

भाजपा आध्यात्मिक आघाडी नागपूर महानगर द्वारे प्रतिष्ठाद्वादशी व नववर्षाचे औचित्याने गुरुवार दि १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजेपासून नागपुरातील १३ श्रीराम मंदिरांमध्ये श्रीरामभक्तीचा जागर भाविकांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे. यानंतर क्रमशः सकाळी ९.४५ - शिरपूरकर श्रीराम मंदिर, सकाळी १०.१५ वा - श्रीराम मंदिर संघ बिल्डिंग महाल, सकाळी १०.४५- छत्तीसगढी श्रीराम मंदिर - नाईकवाडी नाईक तलाव , सकाळी ११.१५ - श्रीराम मंदिर, चिटणवीस पुरा, सकाळी ११.४५- श्रीराम मंदिर- नाईक रोड, दुपारी १२.१५ - श्रीराम मंदिर चंदन नगर, दुपारी १२.४५- श्रीराम मंदिर अयोध्या नगर, संध्या ४.३० - श्रीराम मंदिर धन्तोली, संध्या ५.१५ वाजता- श्रीराम मंदिर सीता नगर, राजीवनगर, तसेच समारोप संध्या ६.४५ - श्रीराम मंदिर, रामनगर येथे करण्यात येईल.

# रस्त्याची खड्डयांशी गट्टी, अधिकाऱ्यांची डोळयांवर पट्टी.....

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ३१ :



शासनाकडून दरवर्षी ग्रामीण भागातील रस्त्याच्या दुरुस्तीवर रस्ते दुरुस्तीचे ढोल बडविले जातात. कोट्यवधी रुपयांचा खर्चही दाखविण्यात येतो. पण प्रत्यक्षात मात्र नागरिकांना मिळते ती फक्त धूळ, चिखल आणि खड्यांनी भरलेली देली वाटचाल. तालुक्यात प्रवेश करणारे ग्रामीण रस्ते आजही शेवटच्या यातना भोगत असताना काही काही रस्त्यांची अवदसा पाहून लाज वाटते, ग्रामीण भागातील अनेक रस्ते वा अंतर्गत रस्ते. सर्वत्र मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. प्रशासकीय यंत्रणेतील टक्केवारीचे भोग मात्र नागरिकांनाच सहन करावे लागत आहेत. हे रस्ते आहेत की खड्यांचे जाळे? असा प्रश्न वाहनधारकांना पडत आहे.

मौदा तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांची खड्डेमय अवस्था दिवसेंदिवस अधिकच भयावह बनत असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शासनाकडून खड्डेमुक्त रस्त्यांची आश्वासने दिली जात असली तरी प्रत्यक्षात गावोगावी जाणारे रस्ते मोठ्या प्रमाणात खड्ड्यांनी भरलेले आहेत. त्यामुळे पायाभूत सुविधांचा प्रश्न लोकप्रतिनिधी कधी गांभीयाने घेणार, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. सध्या ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. काही गावांतील रस्ते वषार्नुवर्षे दुरुस्तीअभावी फुटलेल्या स्थितीत आहेत. तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रमुख रस्तेही धोकादायक बनले असून, या मुख्य रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. काही ठिकाणी नुकतेच केलेल्या डांबरीकरणावर मोठे खड्डे पडल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तालुक्यातील बोरगाव. चिंचोली. निमखेडा, विरशी, आष्टी. शिवणी, खात. पांजरा, आणि विविध प्रमुख रस्त्यावर थातूरमातूर दुरुस्ती करण्यात आली असताना निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

काही काही रस्त्यांची अवदसा पाहून रस्त्यावरून वाहतूक करताना आपला जीव मुठीत घेऊन मार्गक्रम करतांना तारेवरची कसरत करावी लागते, तालुक्यातील अनेक रस्ते गेल्या एक वषार्पासून अत्यंत खड्डेमय झाले आहेत, या रस्त्यावरून पायी चालणेही कठीण झाले आहे. याच रस्त्याने दररोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी आपला शेतमाल वाहतूक करतात. रात्रीच्या वेळी खड्डे चुकविताना अनेक अपघात झाले असून, काही नागरिकांचे हात-पाय मोडले तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे.

### निवेदनांना 'खो'...!!

मौदा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येत असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी नागरिकांनी वेळोवेळी आंदोलने करून निवेदने दिली आहेत; लाखो खर्च करून डागडूजी करण्यात आली पुन्हा खड्डयांचे चित्र दिसत आहेत. काही रस्त्यांचे मात्र अद्यापही काम सुरू न झाल्याने गावकरी कमालीचे वैतागले असून, येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत लोकप्रतिनिधींना जाब विचारण्याच्या तयारीत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# रामराज कॉटनने सादर केली अभिजात व्हाइट कॉटन फॅब्रिक कलेक्शन्स

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

रामराज कॉटन ही भारतातील पारंपारिक मेन्सरवेअर टेक्टात्रोइल्सामधील आघाडीची कंपनी परंपरा, खासियत आणि प्रीमियम आकर्षकतेचे प्रतीक असलेल्या पांढरा रंगाच्या कालातीत अपीलला प्रशंसित करत आहे. अद्वितीय शुभ्रतेसाठी ओळखले जाणारे रामराज व्हाइट बाजारपेठेत अग्रस्थानी आहे, जेथे या सिग्नेतचर तेजस्वी व्हाइटने ब्रँडच्या प्रसिद्धीला अधिक दृढ केले आहे.

रामराज कॉटनला इतरांपेक्षा वरचढ ठरवणारी बाब म्हणजे वषार्नुवर्षे तोच तेजस्वी पांढरा रंगसादरकरण्याची त्यांची क्षमता रंग, दर्जा व फिनिशिंगबाबत कोणतीही तडजोड न



करता ब्रँड उद्योगामध्यो सर्वात व्याणपक व्हाइट फॅब्रिक पोर्टफोलिओ देतो, ज्यातमध्येत १०० टक्के कॉटन, गिझा ब्लेजण्ड्स, लिनेन कॉटन, पॉलिसी विस्कोस, १०० टक्के टगिझा कॉटन, आकर्षक लिनेन, पेपर फिनिशिंग असलेले कॉटन आणि १०० टक्के सुपिमा कॉटनमधील ५०० हून अधिक कापड प्रकारांचा समावेश आहे.

या नवीन फॅब्रिक कलेक्श नबाबत मत व्यनक्त५ करत रामराज कॉटनचे संस्थोपक व अध्यलक्ष श्री. के. आर. नागराजन म्ह णाले, "रामराज कॉटनमध्येत आम्हीा नेहमी पारंपारिक वस्त्रोयद्योग कारागिरीला प्राधान्यल दिले आहे, तसेच प्रीमियम व जागतिक स्तमरावर प्रशंसित कॉटन प्रकारांसह आमच्याी ऑफरिंग्जव सतत वाढवत आहोत. व्यचक्तीा आकर्षक कॉटन किंवा व्हाटइट फॅब्रिक्स बाबत विचार करतात तेव्हात त्याच्यिाा मनात आपोआप रामराजचे नाव येते. आमच्याग ४,००० हून अधिक धोती प्रकारांसह या व्हातइट फॅब्रिक्सवमधून आम्हीा निर्माण केलेला वारसा कायम राहिला आहे, जेथे प्रत्ये क विणकामामधून आमच्या कर्मचाऱ्यांचा अभिमान, आमच्याण विणकरांचे कौशल्या आणि रामराजला नव्या उंचीवर घेऊन जाणारी खासियत दिसून येते."

कलेक्शतनमधील प्रत्यूेक श्रेणीची वैशिष्ट्यपूर्ण विशिष्टता आहे. उच्चय दर्जाच्यात कॉटनपासून बनवण्यात आलेले सेलिब्रिटी व्हाराइट कोमल व स्टार्च फिनिशिंगसह आरामदायीपणा देते, ज्याउला पूरक आकर्षक डिझाइन्सल आहेत. पेपर कॉटन आकर्षक लुक देते, ज्याममध्यो घट्ट ड्रेप, सौम्य चमक आणि कापडावर सुरकुत्याआ न येण्यालची क्षमता आहे. इजिप्शियन गिझा कॉटनपासून डिझाइन करण्याधत आलेले गिझा व्हापइट्स अपवादात्मिक कोमलता, मजबूती आणि नैसर्गिक चमकमुळे इतरांपेक्षा लक्षवेधक ठरते.

# वारकरी भवनचे निर्माण कार्य प्रगतीपथावर



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ३१ :

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या विशेष निधीतून, दक्षिण नागपूर विधानसभा मतदार संघाचे आमदार मोहन मते यांच्या विशेष पुढाकाराने, नागपुरातील व विदर्भातील वारकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचा, प्रत्येक वारकऱ्याला अभिमान वाटावा असा बहुप्रतीक्षित, अद्यावत सुविधा असणाऱ्या वारकरी भवनाचा प्रकल्प दक्षिण नागपूर परिसरातील सोमवारी क्वार्टर, बुधवार बाजार येथे नागपूर सुधार प्रन्यास द्वारा हाती घेण्यात आला आहे. वारकरी भवनाच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाने १८ कोटी मंजूर केले असून विश्व वारकरी सेवा संस्थेच्या मार्गदर्शनाखाली वारकरी भवन चा आरखडा तयार करण्यात आला आहे. १६२९६ चौरस फूट असलेल्या प्रशस्त जागेत पार्किंग सह चार मजली भव्य दिव्य इमारत अशी वारकरी भवनची रचना असणार आहे.

सदर वारकरी भवन च्या तळमजल्यावर स्लॅबचे निर्माण कार्य आमदार मोहन मते, नागपूर सुधार प्रन्यास यांचे अधिकारी वर्ग, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, एम. बी. मालेवार डिझाइन प्रा. ली. यांचे प्रतिनिधी व विश्व वारकरी सेवा संस्था यांचे प्रतिनिधी जिवलग कोहळे, रमेश वनकर, दिनकर कडू, नामदेव राऊत, संदीप ठाकरे राजेंद्र निशाणे, संदीप जथे, प्रवीण वानखेडे, नितीन वानखेडे, प्रमोद महाराज ठाकरे, यांच्या उपस्थितीत विधिवत पूजा करून सुरु झाले. विश्व वारकरी सेवा संस्थेच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या सुधारित आराखड्यानुसार बांधकाम सुरु असून, २०२६ या वर्षात वारकरी भवनचे लोकार्पण अपेक्षित आहे.

## तिकीट तपासणीमूळे रेल्वेत चोर जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या सतर्क आणि तत्काळ कारवाईचे एक प्रशंसनीय उदाहरण समोर आले आहे. नियमित तिकीट तपासणी दरम्यान एक प्रवासी वैध तिकीटा शिवाय प्रवास करत असल्याचे आढळून आले. त्याचवेळी त्याच डब्यातील एका प्रवाशाने आपले कपडे व रोख रक्कम चोरीस गेल्याची तक्रार नोंदवली.

तत्काळ तपासणी व झडती घेतल्यानंतर चोरीस गेलेले साहित्य व रोख रक्कम तिकीट नसलेल्या प्रवाशाच्या ताब्यातून जप्त करण्यात आली. संबंधित रेल्वे कर्मचाऱ्यांनी त्वरित नियंत्रण कक्षाला माहिती दिली व आवश्यक मेमो तयार करून आरोपीला रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात देण्यात आले. पुढील तपासात आरोपीकडून त्याच डब्यातील आणखी एका प्रवाशाचा चोरीस गेलेला ब्रीफकेसही जप्त करण्यात आला. या त्वरित व सतर्क कारवाईमुळे एका चोरास जेरबंद करण्यात यश आले असून प्रवाशांचे चोरीस गेलेले साहित्य सुरक्षितपणे परत मिळाले.

# मावळत्या सूर्याच्या साक्षीने नव्या वर्षाचे स्वप्नरंजन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३१ :

३१ डिसेंबर वर्षाचा शेवट, सुर्य मावळतीला गेला, ३१ डिसेंबर रोजी वर्षाच्या अखेरच्या दिवशी मावळतीला जाणारा सूर्य एका वर्षाच्या आठवणींना निरोप देत नव्या वर्षाच्या स्वागताची चाहूल देत आहे. मावळत्या सूर्याच्या साक्षीने जुने वर्ष संपून नव्या आशा, स्वप्नं आणि संकल्पांसह नवे वर्ष उगवणार आहे.सूर्यास्त म्हणजे साक्षीदार आजच्या जाणिवांचा... नवीन वषार्तील स्वप्नांचा.

# नगराध्यक्ष अजय अग्रवालचे स्वागत



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ३१ :

कामठी व कन्हान येथील माहेश्वरी समाजातील सर्व सदस्यांनी कामठी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अजय अग्रवाल यांचे शाल, नारळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सदस्य रमण गांधी, वीरेंद्र कलंत्री, संतोष लखोटिया, बृजरतन लखोटिया, राजेश राठी, राकेश मुंधडा, गजानन राठी, प्रेमरतन लखोटिया, राजा कलंत्री, राजेश गांधी, आशिष राठी, अंकित मुंधडा, प्रेमलता लखोटिया, अलका रुठिया, डॉ. कलंत्री, लखोटिया, डॉ. संध्या मुंधडा, मनीष लखोटिया आदी उपस्थित होते.

## पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांना आदरांजली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अत्यंत विश्वासू सहकारी रिपब्लिकन पक्ष दीक्षाभूमीचे अध्यक्ष राज्यसभेचे खासदार पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा संघर्ष शोषित पिढीतांच्या भाकरीसाठी भूमीहिनांना भुमी मिळावी. याकरिता जगाने ज्याची नोंद घेतली तो भूमीहिनांच्या सत्याग्रहाचे प्रेणते बाबासाहेबांनी नाशिकचे चवदार तळे मुक्ती आंदोलन काळाराम मंदिर गोलमेज परिषदेत भारतीय दलितांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आहेत असे टेलिग्राम ब्रिटिश शासनाला पाठविणारे ज्यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन बलाढ्य होता पक्षाचे खासदार, लोकसभा, राज्यसभा तसेच विधिमंडळात आमदार संपूर्ण देशभरात होते.

काँग्रेस रिपब्लिकन युतीचे जनक आणि ज्याचाशिवाय माझे जीवन चरित्र पूर्ण होऊ शकत नाही. यावरून दादासाहेबांचा संघर्ष दलित आणि आंबेडकरी चळवळीला पूरक होता असे उद्गार विश्वस्त विलास गजघाटे यांनी आपली आदरांजली व्यक्त करताना केली.

# नववर्षाचे दणक्यात स्वागत

## एमटीडीसी व खासगी हॉटेल्स झाले हाऊसफुल्ल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

नववर्ष २०26 चे दणक्यात स्वागत करण्यासाठी नागपूर शहरासह लगतच्या पर्यटनस्थळांवर पर्यटकांचा मोठा ओघ बघायला मिळला. नाताळ व ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी)च्या सर्व रिसॉर्ट्स १०० टक्के हाऊसफुल्ल झाले तर खासगी रिसॉर्ट्समध्येही ८० टक्क्यांहून अधिक बुकिंग झाले.. निलेश गटणे, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली एमटीडीसीच्या पर्यटक निवासस्थळांवर नववर्षाच्या स्वागतासाठी भव्य विद्युत रोषणाई करण्यात आली. यासोबतच, महाराष्ट्रीयन व मराठवाडी खाद्यपदार्थांची खास मेजवानी पर्यटकांसाठी सज्ज करण्यात आली. डिजे, लाईव्ह ऑर्केस्ट्रा, जादूचे प्रयोग तसेच विविध मनोरंजक खेळ अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विदर्भात नॅशनल पार्क्स, वाइल्ड लाईफ सॅंक्चुरीज, किल्ले, धबधबे, गरम पाण्याचे झरे तसेच तलाव व धरणे अशी अनेक पर्यटनस्थळे आहेत.

सरत्या वर्षाला निरोप देत नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटक ताडोबा व्याघ्र प्रकल्प, पेंच-सिल्लारी नॅशनल पार्क, नवेगाव-नागझिरा, नवेगावबांध, बोदलकसा, चांदपूर आदी पर्यटनस्थळांना भेट देत आहेत. यावर्षी सर्व रिसॉर्ट्स पूर्णपणे भरले असतानाही पर्यटकांकडून चौकशीसाठी सातत्याने फोन येत असल्याची माहिती एमटीडीसीचे वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक दिनेश पाटील यांनी दिली.

# जीआरई रिन्यू एनरटेक लिमिटेडला प्रस्तावित आयपीओसाठी बीएसई एसएमई कडून मंजुरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

जीआरई रिन्यू एनरटेक लिमिटेड (जीआरई) ने आज जाहीर केले की त्यांच्या प्रस्तावित प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्रीस (आयपीओ) बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) कडून तत्त्वतः (इन-प्रिन्सिपल) मंजुरी मिळाली आहे.

कंपनीने सप्टेंबर 2025 मध्ये बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर आयपीओ सादर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे दाखल केली होती. ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) नुसार, कंपनी रुपये 10 दर्शनी मूल्याचे एकूण 37,68,000 इक्विटी शेअर्स जारी करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. नियामक मंजुरीच्या अधीन राहून, अद्ययावत माहितीसह रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (आरएचपी) सादर करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. मेहसाणा येथे मुख्यालय असलेली ही कंपनी व्यावसायिक, औद्योगिक (सी ॲण्ड आय) तसेच संस्थात्मक ग्राहकांसाठी ऑन-साइट सौरऊर्जा उपाय प्रदान करते. जीआरई ईपीसी आणि आरईएससीओ मॉडेल अंतर्गत सौर प्रकल्पांची अंमलबजावणी करते, ज्यामध्ये आवश्यकतेनुसार सामायिक पायाभूत सुविधांवर आधारित ग्राउंड-माउंटेड सोलर प्रकल्पांचा समावेश असतो.

डीआरएचपी नुसार, आयपीओ मधून उभारण्यात येणाऱ्या निधीपैकी काही भाग आरईएससीओ मॉडेल अंतर्गत 7.2 मेगावॅट एसी क्षमतेच्या ग्राउंड-माउंटेड सौर ऊर्जा प्रकल्पाच्या विकासासाठी वापरण्यात येणार आहे.

## आपल्या फ्लॅशबॅक उपक्रमांतर्गत देशभरातील

# ज्येष्ठ नागरिक ग्राहकांचा सन्मान

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३१ :



भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक असलेल्या ॲक्सिस बँकेने, बँकेच्या ज्येष्ठ नागरिक ग्राहकांसाठी म्हणून खास 'फ्लॅशबॅक' मोहीम तयार केली आहे. या अनोख्या उपक्रमाचा एक भाग म्हणून, ॲक्सिस बँकेने आपल्या ज्येष्ठ ग्राहकांसाठी जुन्या काळातील काही अप्रतिम चित्रपटांचे विशेष प्रदर्शन आयोजित केले.

या माध्यमातून आपल्या ज्येष्ठ ग्राहकांशी संवाद साधण्याचे आणि त्यांना जोडण्याचे बँकेचे उद्दिष्ट आहे. महत्त्वाचे म्हणजे, बँकेने या ज्येष्ठांना ६० आणि ७० च्या दशकातील कालातीत चित्रपट पाहण्याचा आनंद दिला. यंदा या उपक्रमात त्या त्या राज्यांसाठी प्रादेशिक भाषांमधील चित्रपट दाखवण्यात आले.

यात कन्नड, तेलगू, मल्याळम आणि तमिळ अशा प्रादेशिक भाषांमधील चित्रपटांचा समावेश होता. यामुळे स्थानिकांशी अधिक सखोल सांस्कृतिक बंध निर्माण झाला. दिल्ली-एनसीआर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, कोलकाता, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, लुधियाना, जयपूर, लखनौ, चंदीगड, पाटणा, रांची, वडोदरा, इंदूर, नागपूर, सुरत, कोची, मंगलोर, कोईम्बतूर आणि डेहराडून या 22 शहरांमध्ये हे स्क्रीनिंग आयोजित करण्यात आले होते. अमर अकबर अँथनी (हिंदी), चुपके चुपके (हिंदी), गंधडा गुडी (कन्नड), मायाबाजार (तेलुगू), मनिचित्रथाझू (मल्याळम) आणि मुथल मरियथाई (तामिळ) यासारख्या सर्वकालीन लोकप्रिय चित्रपटांसाठी बँकेने पीव्हीआर, सेनको, व्हाइब्स आणि मर्झी सोबत भागीदारी केली होती.

हा उपक्रम म्हणजे त्यांच्याशी असलेल्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. या उपक्रमाद्वारे, हे बंध अधिक दृढ करण्याचा आणि त्यांच्यासोबत केलेल्या प्रवासाचा आनंद साजरा करण्याचा आमचा मानस आहे. कालातीत अभिजात कलाकृतींच्या माध्यमातून गोड आठवणींना उजाळा देऊन, आम्ही आमच्या ज्येष्ठ नागरिक ग्राहकांसाठी एक नॉस्टॅल्जिक आणि आनंददायक अनुभव निर्माण करण्याचे ध्येय ठेवले आहे.

# संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेत १२४ लाभार्थ्यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३१ :

दिनांक २९ डिसेंबरला सोमवार ला पारशिवनी तहसील कार्यालयात संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेचे तालुका अध्यक्ष राजु भोस्कर यांच्या अध्यक्षतेमध्ये व उपस्थित संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे सदस्य प्रेमजी भोंडेकर, माधुरी बावनकुळे, रोशन पिंपरामुळे, आशिष धोटे,संजय गांधी व श्रावणबाळ योजना विभागा मध्ये संजय गांधी निराधार श्रावणबाळ योजनेत पात्र - अपात्र लाभार्थ्यांची निवड करून शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याकरिता सभा घेण्यात आली. यामध्ये ६९ श्रावणबाळ योजनेच्या पात्र लाभार्थी निवड करण्यात आली. संजय गांधी निराधार योजनेचे एकूण पात्र ५५ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. श्रावणबाळ योजनेचे तात्पुरते( कागदपत्रांची कमी असल्यामुळे) अपात्र ९ लाभार्थ्यांना करण्यात आले. व श्रावणबाळ योजनेचे ४ लाभार्थींना अपात्र करण्यात आले. लवकरच पात्र - अपात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार आपण पात्र - अपात्र व तात्पुरते अपात्र लाभार्थी



तहसील कार्यालयात संपर्क करून लाभ मिळवून देणार असल्याचे श्रावण बाळ समितीचे अध्यक्ष राजु कागदपत्रांची पूर्तता करून शासकीय पारशिवनी संजय गांधी निराधार व भोस्कर यांनी सांगितले.

## मतदान जनजागृतीकरिता मनपा विविध उपक्रम राबविणार

# आज मतदार सेल्फी पॉईंटचे उद्घाटन

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर तरुणाई यांच्यासह सर्व मतदारांमध्ये मतदानासाठी जनजागृती करण्याकरिता स्वीप अभियानांतर्गत महानगरपालिकेतर्फे शहरात १ ते १३ जानेवारीपर्यंत विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. यात सेल्फी पॉईंट, मतदान अधिकार रथ, कॅम्पस कनेक्ट प्रोग्राम, वॉक विथ व्होटर, मतदार जागरुकता बाईक रॅली, मानवी साखळी व मकर संक्रांतीनिमित्त शहरात विविध ठिकाणी बलून फेस्टीवलचे आयोजित करून मतदारांमध्ये जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहे.

सेल्फी पॉईंट उपक्रमाचा शुभारंभ फुटाळा तलाव परिसर येथे 1 जानेवारी रोजी सायंकाळी 5 वाजता महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते होणार आहे. मनपाच्या अतिरिक्त आयुक्तवसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. स्वीप प्रमुख तथा उपायुक्त (स.वि.वि) डॉ. रंजना लाडे, शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्या मार्गदर्शनात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारा सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात स्वीप कार्यक्रमांतर्गत मनपा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान करण्यासाठी मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते स्वीप उपक्रमाचा प्रारंभ तत्पुर्वी नाताळ सणाचे औचित्य साधून करण्यात आला. यावेळी शहरातील ४० ठिकाणी सांताक्लॉजच्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबविला. या उपक्रमाला भरभरून ठिकठिकाणी नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

मनपा सार्वत्रिक निवडणुकीत तरुणाईसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती वाढावी, आणि लोकशाही पर्वात सहभाग वाढावा याकरिता रेशीमबाग चौक (मध्य नागपूर), आंबेडकर उद्यान (पूर्व नागपूर), विवेकानंद स्मारक (दक्षिण-पश्चिम नागपूर), फुटाळा तलाव (पश्चिम नागपूर), झुलेलाल पार्क (उत्तर नागपूर), गांधीबाग उद्यान (मध्य नागपूर) येथे हे सेल्फी पॉईंट तयार करण्यात येत आहे. मतदारांनी या आकर्षक सेल्फी पॉईंटला भेट देऊन आपले फोटो काढावेत. आणि ते फोटो सोशल मीडियावर शेअर करताना नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलला टॅग करा असे आवाहनही मनपातर्फे करण्यात येत आहे.

**मतदान अधिकार रथ**

याचबरोबर स्वीप कार्यक्रमांतर्गत 5 जानेवारी रोजी मतदारामध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यासाठी मनपा मुख्यालयातून मतदान अधिकार रथ यात्रेची सुरुवात करण्यात येणार आहे. ही रथ यात्रा मनपाच्या दहाही झोन मध्ये फिरणार आहे. शिवाय ज्या भागात मतदानाची टक्केवारी कमी आहे त्या भागात मतदारांना मतदानाकरिता जनजागृत करणार आहे.

त्याशिवाय 7 जानेवारी रोजी शहरातील सर्व प्राचार्याची विद्यापीठाच्या सहकार्याने रेशीमबाग चौक येथील सुरेश भट सभागृहात बैठकआयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत महाविद्यालयात मतदान जनजागृती कार्यक्रमाची सुरुवात केली जाईल. शहरातील सर्व महाविद्यालयात मतदानासाठी शपथ देणे व संवाद कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मतदानासाठी जागृत करण्यात येणार आहे. येत्या 10 जानेवारी रोजी मनपाच्या सर्व झोनमध्ये ह्वॉक विथ वोटर इन लो वोटर एरीया हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. 11 जानेवारी रोजी मतदार जागरुक बाईक रॅली काढली जाईल.

## गौरव कारडाचाही उपचारादरम्यान मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**

**खिसमस पार्टीनंतरच्या हिंसाचाराचा दुसरा बळी**

शहरातील डाबो क्लबमध्ये खिसमस पार्टीनंतर उसळलेल्या हिंसाचारातील मृतांची संख्या दोन झाली आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेला गौरव ब्रिजलाल कारडा (३४) याचा खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान मंगळवारी, ३० डिसेंबर रोजी मृत्यू झाला. यापूर्वी याच हाणामारीत प्रणय नरेश ननवरे (२८) याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे या प्रकरणातील मृतांचा आकडा दोनवर पोहोचला आहे. ही घटना शुक्रवार, २६ डिसेंबर रोजी पहाटे सुमारे ४ वाजताच्या सुमारास वर्धा रोडवर हॉटेज प्राइडजवळील डाबो क्लब परिसरात घडली होती.

पोलिसांच्या माहितीनुसार, खिसमसच्या निमित्ताने अनेक तरुण डाबो क्लबमध्ये पार्टीसाठी जमले होते. या दरम्यान तरुणीशी गैरवर्तन केल्यावरून दोन गट आमोरा-समोर आले. पार्टी संपल्यानंतर वाद आणखी चिघळला. बाचाबाचीचे रुपांतर हाणामारीत झाले. या दरम्यान आरोपी मेहुल रहाटे याने महाल परिसरात प्रणय ननवरे तसेच कलमना रोडवरील चिखली डिप्टी सिग्नलजवळील देवयोग अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या गौरव कारडा यांच्यावर हल्ला केला. तीक्ष्ण हत्यारे, लोखंडी रॉड आणि विटांचा वापर करून दोघांनाही बरगडीच्या भागावर जबर मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले.

## विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची प्रधान सचिवपदी पदोन्नती

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**



विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची आज प्रधान सचिव म्हणून सध्याच्याच नागपूर विभागीय आयुक्त पदावर स्थानापन्न पदोन्नती देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्हि.राधा यांच्या स्वाक्षरीने निघालेल्या शासकीय आदेशात विजयलक्ष्मी बिदरी यांचे सध्याचेपद भारतीय प्रशासन सेवेच्या प्रधान सचिव श्रेणीत उन्नत करून सध्याच्याच पदावर स्थानापन्न पदोन्नती देण्यात आल्याचे निर्देशित करण्यात आले.




## श्री खंडोबा देवस्थानात खंडोबा-म्हाळसा विवाहसोहळा ३ जानेवारीला

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**

भारतातील अनेक जाती-धर्मांच्या लोकांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेल्या श्री खंडोबा देवाचा विवाहसोहळा शनिवार, ३ जानेवारी रोजी नागपुरात होणार आहे. सुभाष रोड, कॉटन मार्केट येथील ३७३ वर्षे जुन्या भोसलेकालीन श्री खंडोबा देवस्थानात यासोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ ते १० या वेळेत देवाची पूजाअर्चा, अभिषेक पार पडेल. दुपारी १२ ते ३ या वेळेत विदभार्तील नामवंत गोंधळींचा कार्यक्रम सादर केला जाईल.

दुपारी ३ वाजता मंदिरातून श्रींची वरात निघेल. ही वरात कॉटन मार्केट चौक, आग्याराम देवी चौक, गणेशपेठ पोलीस स्टेशन, मॉडेल मिल चौकमार्गे पुन्हा मंदिरात येईल. वरातीमध्ये खंडोबा, म्हाळसा आणि बानाई यांच्या वेशभूषेतील मुले आकर्षण ठरतील. सायंकाळी ६ वाजता मंदिरात देवाचे लग्न लावले जाईल, त्यानंतर महाआरती व महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.

मागील अनेक वर्षांपासून या परंपरेचे जतन श्री खंडोबा देवस्थान कमिटीमार्फत केले जात आहे. या सोहळ्याला उपस्थित राहून दर्शनाचा लाभघ्यावा, असे आवाहन कमिटीचे अध्यक्ष मनोहर कबले, सचिव संजय सावंत, विश्वस्त मनोज साबळे, मोहन जाधव, हेमंत शिर्के, राजे जयसिंह भोसले, राजकुमार शिर्के यांनी केले. यशस्वितेसाठी मिलिंद साबळे, संजय साखरकर, देवेंद्र पुणेकर, मल्हार बोरकर, प्रकाश बोरकर, जाधव, रंजन दंडिगे, घुमरे, प्रकाश चव्हाण, हेमंत भोसले व भक्तगण प्रयत्नरत आहे.



















